E-BOOK

सुपर डुपर हिट्स्

- दिलीप ठाकूर



"ई साहित्य प्रतिष्ठान"

सादर करीत आहे

"श्री. दिलीप ठाकूर"

लिखित

सुपर डुपर हिट्स

(भाग ४)

© - "श्री. दिलीप ठाकूर" (जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)

glam.thakurdilip@gmail.com 9870616216

"सुपर डुपर हिट्स" (भाग 4)

© लेखक : दिलीप ठाकूर

प्रकाशन : १४ जून २०२६

© esahity Pratishthan®2026

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com **esahity@gmail.com**

ई साहित्य प्रतिष्ठान : Whatsapp - 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे "ई बुक" वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी "ई साहित्य प्रतिष्ठान" ची लेखी परवानगी आवश्यक!

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!

फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

https://www.esahity.com

(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)

तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.

आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफ़ू !

लक्षात घ्या. हे बोलके "ई बुक" आहे. या "ई बुक" मधील प्रत्येक "फोटो"वर तसेच "निळ्या रंगातील मजकूर", यावर सुद्धा "लिंक्स" दिलेल्या आहेत. फक्त "क्लिक" करा, आणि त्यावरील "ऑडिओ व व्हिडिओज" चा मनसोक्त आनंद घ्या.

♥ लेखकांविषयी थोडेसे ♥

दिलीप ठाकूर
(जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)
जन्म २० एप्रिल १९६०

अलिबाग तालुक्यातील चौल गावात जन्म झालेल्या "दिलीप ठाकूर" यांचे बालपण, शालेय आणि महाविद्यालयीन जीवन मुंबईत गिरगावातील खोताची वाडीतील अवघ्या दहा बाय दहाच्या खोलीत घडताना एकीकडे दक्षिण मुंबईतील अनेक चित्रपटगृहात स्टॉलच्या तिकीटात सतत नवे जुने चित्रपट पाहणे आणि त्या काळातील अनेक साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक वाचणे यात घडले. शिवाय गल्ली क्रिकेट आणि गल्ली चित्रपट यातून जनसामान्यांशी नाळ जुळली होतीच. त्यांनी गिरगावातील हिंद विद्यालय हायस्कूलमध्ये शालेय तर चौपाटीच्या भवन्स कॉलेज मध्ये उच्च शिक्षण घेतले. यातूनच विद्यार्थी दशेतच त्यांनी

विविध नियतकालिकांमधून वृत्तपत्र लेखन सुरु केले. एकाद्या लेखावरचे मत अथवा एकाद्या ताज्या घडामोडीवरचे आपले मत 'वाचकांच्या पत्रा'तून प्रसिद्ध होत आहेत या त्यांच्यासाठी खूपच मोठा उत्साहाचा भाग होता. मार्मिक, रसरंग, चित्रानंद, सोबत, लोकप्रभा, क्रीडांगण, मनोहर अशा साप्ताहिकातून आपली पत्रे तर कधी लेखही प्रसिद्ध होत असल्याने त्यांचा लेखनातील कल वाढला. १९८२ साली त्यांनी नवशक्ती दैनिकात प्रूफ रिडर म्हणून रुजू झाले आणि त्याबरोबरच रविवार नवशक्तीत चित्रपटविषयक सदरही लिहायला मिळाले. १९८६ साली त्यांना संपादकीय विभागात बढती देण्यात आली. तेव्हापासूनचा त्यांचा प्रवास खूप वळणा वळणाचा आहे. एकीकडे हॅन्ड कंपोझ (म्हणजे हाताने खिळे लावणे) ते डिजिटल मिडिया अशी तर दुसरीकडे सिंगल स्क्रीन थिएटर्स ते ओटीटी प्लॅटफॉर्म अशी त्यांची वाटचाल आहे. ऐशी आणि नव्वदच्या दशकात त्यांनी खूपच मोठ्या प्रमाणावर अनेक दैनिके आणि साप्ताहिकात विविध टोपणनावाने चित्रपटविषयक सदर लेखन केले. "राजा दिलीप", "स्पॉटबॉय", "पिक्चरवाला", "सिनेमावाला", "राजा

चौलकर", "राजा फिल्मीस्तानी" वगैरे टोपणनावानी खूपच मोठ्या प्रमाणावर लेखन केले. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रत्यक्षात शूटिंग रिपोर्टींगसाठी सेटवर जाणे, चौफेर निरीक्षण आणि लहान मोठ्या स्टार्ससह अनेक प्रकारचे तंत्रज्ञ आणि कामगार, चित्रपट वितरक व प्रदर्शक यांच्याशी संवाद साधणे यातून त्यांच्याकडे वेगळी माहिती, संदर्भ, तपशील, आठवणी यांची जमा होत गेली. याचीच पुढची पायरी म्हणून २००३ सालापासून त्यांचे चित्रपटविषयक लेख संग्रह प्रसिद्ध होत आहेत. आतापर्यंत त्यांची पंचेचाळीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यात "स्थित्यंतरातील सिनेमा", "क्लॅप", "पैसा वसूल", "यादगार पल", "फर्स्ट डे फर्स्ट शो", "कॉर्नर सीट", "सिनेमा घर", "ओपन थिएटर", "बारा ते तीन तीन ते सहा", "गल्ला पेटी", "सिनेमा मसाला मिक्स", "आऊट फोकस", 'थिएटरातील टाळ्या शिट्ट्या', 'यश हेच चलनी नाणे' अशी अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या अनघा प्रकाशन (ठाणे) यांच्या वतीने "टॉकीजची गोष्ट" हे दक्षिण मुंबईतील जुन्या सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या आठवणी सांगणारे पुस्तक जुन्या

आठवणीत नेते. त्यात आता खाणाखुणाही शिल्लक नसलेल्या मॅजेस्टीक, रेक्स, रेडियो अशा चित्रपटगृहांवरही फोकस टाकण्यात आला आहे. इट्स मज्जा या यू ट्यूब चॅनेलसाठीचा त्यांचा 'ठाकूर विचारणार' हा मुलाखतींचा शो अतिशय लोकप्रिय आहे. अशोक सराफ, रणजीत, बाळ धुरी, विजय पाटकर, सुकन्या कुलकर्णी, अशोक समर्थ, उपेंद्र लिमये, वर्षा उसगांवकर, अश्विनी भावे आदींच्या त्यांच्या मुलाखतींची चित्रपटसृष्टीत बरीच चर्चा होत आहे. २००९ सालापासून ते मुक्त पत्रकार आणि लेखक म्हणून कार्यरत आहेत. जनसामान्य रसिकांना समजतो आणि आवडतो अशाच पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटांवर आणि त्या विश्वावर त्यांनी कायमच फोकस ठेवला. आणि त्यातूनच त्यांच्या मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत सर्व स्तरांवर खूप ओळखी झाल्या. इसाक मुजावर आणि शिरीष कणेकर हे त्यांचे विशेष आवडते लेखक आहेत. शिरीष कणेकर यांच्या नाविन्य प्रकाशन (पुणे) यांनी प्रकाशित केलेल्या "निवडक शिरीष कणेकर" या ग्रंथातील लेखांची निवड व संपादन दिलीप ठाकूर यांनी केली आहे. विशेष

म्हणजे, चित्रपती व्ही. शांताराम फाऊंडेशनच्या 'शतक महोत्सवी मराठी चित्रपट' या शंभर वर्षातील मराठी चित्रपटांची तपशीलवार माहिती दिलेल्या सूचीच्या संपादनाची संधी त्यांना मिळाली. चित्रपटविषयक माहिती आणि अनुभवाचा त्यांना जवळपास सर्वच मराठी तसेच काही हिंदी वृत्तवाहिन्यांवर प्रतिक्रिया देताना, एकाद्या चर्चेत सहभाग घेताना कायमच फायदा होत असल्याचे दिसतेय. TIMES OF INDIA इत्यादी इंग्रजी वृत्तपत्रातही त्यांची चित्रपटसृष्टीतील एकाद्या घटनेवर दशकभरापासून अधिक काळ सातत्याने प्रतिक्रिया येत आहे. त्यांना या वाटचालीत अनेक पुरस्कार प्राप्त होत आहेत. विशेष उल्लेखनीय पुरस्कार म्हणजे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या वतीने देण्यात आलेला चित्रकर्मी पुरस्कार, मराठी पत्रकार संघाच्या वतीने जयहिंद पुरस्कार आणि प्रमोद नवलकर स्मृती पुरस्कार, संस्कृती कलादर्पणच्या वतीने उल्लेखनीय पत्रकार पुरस्कार, इंडिवूड मिडिया एक्सलन्स ॲवॉर्ड, शिवसेना गिरगाव शाखा पुरस्कार, 'मी गिरगावकर' दक्षिण मुंबई शिवसेना शाखा पुरस्कार, थर्ड बेल एन्टरटेन्मेन्ट

कलातीर्थ पुरस्कार, बालगंधर्व सन्मान चिन्ह (पुणे) इत्यादी अनेक पुरस्कारांचा समावेश होतो. जवळपास रोजच तारीखवार जुन्या काळातील चित्रपटांबाबत सोशल मिडियात पोस्ट करणे यात त्यांनी सातत्य ठेवले आहे. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट काळातील चित्रपटापासूनच्या फोटो आणि बुकलेटचा त्यांच्याकडे उत्तम संग्रह आहे.

दिलिप ठाकूर यांना शुभेच्छा.
#संजीव_वेलणकर पुणे. ९४२२३०१७३३
♥

"मनोगत"

"शो हाऊसफुल्ल आहे... "

मला हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पिक्चर एन्जॉय करायला आवडते. कारण गिरगावातील खोताची वाडीत लहानाचा मोठा होताना अशाच एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्समथ्ये हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पडद्यावरील डायलॉगला मनसोक्त मनमुराद टाळ्या व शिट्ट्या देत मी वाढलो. १९८२ साली मिडियात आलो, चित्रपट समीक्षक व पत्रकार म्हणून चौफेर व खणखणीत वाटचाल सुरू

केली. मी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत भटकंती, लहान मोठ्या भेटीगाठी व निरीक्षण असे करत करत वाटचाल सुरू ठेवल्याने मला पुस्तकाबाहेरचे आणि गुगलबाहेरचे चित्रपटाचे जग माहीत होतं होत गेले. इतकेच नव्हे तर मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत मला ओळखणारा खूपच मोठा वर्ग आहे हे विशेष उल्लेखनीय आहे. या प्रवासात चित्रपट विश्लेषक अशी प्रगती केली. या सगळ्यात माझ्यातील चित्रपट रसिक कायम राहीला. जनसामान्य प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा चित्रपट तोच माझा चित्रपट. अशा सर्वज्ञात चित्रपटावर लिहिणे, बोलणे जास्त आव्हानात्मक असते. कारण संदर्भ, माहिती, तपशील अजिबात चुकुन चालत नाही. अशाच काही सुपर डुपर हिट चित्रपटावरचे माझे ई बुक. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीत रसिकांची आवडनिवड ही अतिशय महत्त्वाची गोष्ट. त्यांच्या संवेदनशीलतेवर मी कायमच विश्वास ठेवला आणि मी त्यांच्यातीलच एक आहे अशी भावना जपली. आजही मल्टीप्लेक्समध्ये चित्रपट एन्जॉय करतांना एखाद्या डायलॉगला मनापासून दाद देतो. आपण चित्रपट समीक्षक आहोत तेव्हा

आपण गंभीरच असावे असे मी वागण्या बोलण्यात का आणू? आपण जनसामान्याचे प्रतिनिधी आहोत, त्यातून आलो आहोत हे विसरत नाही. म्हणून त्यांना आपलेसे वाटतील असे माझे विषय असतात.... आणि सुपर डुपर हिट ही खूपच मोठी गोष्ट. त्यामुळे सामाजिक सांस्कृतिक माध्यम आणि आर्थिक वातावरण बदलून जाते. अनेक यशोगाथा जन्माला येतात. गॉसिप, ग्लॅमर, फिल्मी गप्पा, गल्ला पेटी अशी सगळीकडे त्या यशाची चर्चा रंगते. सेलिब्रिटीजचा आत्मविश्वास वाढतो. त्यांच्या कारकिर्दीला गती येते. त्याला इमेज मिळते. एक सुपर डुपर हिट मंगता है यार असे उगाच म्हटले जात नाही. अशा अनेक गोष्टी यशात असतात. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न म्हणजेच हे पुस्तक सुपर डुपर हिट....

माझा अनेक वर्षांपासूनचा जिवलग मित्र डॉ. अनंत पावसकर यांनी काही महिन्यांपूर्वी अतिशय प्रेमाने पुढाकार घेऊन माझे "शोले पन्नास वर्षे" हे पहिले "ई बुक" प्रकाशित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली! ई साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने ते पुस्तक प्रकाशित झाले. भरपूर माहिती व मनोरंजन असलेल्या त्या ई बुकला रसिक वाचकांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद

मिळाला, आजही मिळतोय. त्यामुळे अधिक उत्साहाने हे पुस्तक आपल्या समोर आणत आहे. या पुस्तकातील लेख तात्कालिक आहेत. पण चित्रपट सर्वकालीन सुपरहिट आहेत. हे पुस्तक जुन्या काळातील चित्रपट रसिकांना एक उत्तम फ्लॅशबॅक आहे तर आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला हे चित्रपट पहावेसे वाटतील. ई बुक हे जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचत असते आणि आपले पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचावे ही लेखकाची मनोमन इच्छा असतेच असते. चित्रपट आणि चित्रपटसृष्टी यावर माझी मुद्रित माध्यमापासून माझी आतापर्यंत चव्वेचाळीस (४४) पुस्तके प्रकाशित झाली आहेत. चित्रपटसृष्टीतील मोठ्या सेलिब्रिटींज पासून सेटवरील कामगारांपर्यत आणि चित्रपट वितरकापासून कला दिग्दर्शकापर्यत अशा सर्वच स्तरातून मी सातत्याने काम करताना ही चित्रपटसृष्टी अधिकाधिक प्रमाणात जाणून घ्यायला मी कायमच उत्साह दाखवला. चित्रीकरणासाठीचे स्टुडिओ ते मिनी थिएटर्स असा माझा प्रवास सुरू आहे हे माझ्या अनेक पुस्तकांतून आपणास लक्षात येईलच वा आले असेल. मुद्रित

माध्यमे, वृत्त वाहिन्या व डिजिटल युग असा माध्यमे स्वीकारत ही वाटचाल सुरू आहे आणि त्याच वाटचालीत हे "सुपर डुपर हिट" हे पुस्तक! आपण याही पुस्तकाचे नक्कीच स्वागत कराल याचा नक्कीच विश्वास आहे. अर्थात, इतकी वर्षे सतत काम करीत असतानाही आजही नवीन गोष्टी शिकण्याची व जाणून घेण्याची माझी इच्छा कायम आहे! मी आजही विद्यार्थी म्हणून वावरतोय....!

दिलीप ठाकूर
(ज्येष्ठ पत्रकार आणि चित्रपट विश्लेषक)

♥

<u>सादर करीत आहे.. "श्री. दिलीप ठाकूर" लिखित</u>
<u>"सुपर डुपर हिट्स" (भाग ५)</u>

♥

"सुपर डुपर हिट्स" (भाग ५)♥© दिलीप ठाकूर

अनुक्रमणिका

७४. "शराबी" @ ४२ (१८)
७५. "नया दिन नयी रात" @ ५२ (३२)
७६. "बरसात" @ ७७ (४३)
७७. "मनोरंजन" @ ५२ (५६)
७८. "बॉम्बे टू गोवा" @ ५४ (७२)
७९. "हिरा पन्ना" @ ५२ (८८)
८०. "तलाश" @ ५६ (१०४)
८१. "पिक्चर हिट तो.. " (११५)
८२. "कुली" @ ४२ (१२६)
८३. "मल्टिप्लेक्स - क्रिकेट?" (१४२)
८४. "पिक्चरच्या गाण्यावर नाचो.." (१६०)
८५. "पिक्चर हाऊसफुल गर्दीत.." (१७०)
८६. "रामसे ब्रदर्स – हॉरर.." (१८८)
८७. "श्रावण - भाद्रपद भक्ती.." (२०८)
८८. "हेमामालिनी - बहुस्तरीय.." (२२०)
८९. "न दिसलेला देव आनंद.." (२४०)
९०. "सिनेमा आणि मैत्री.." (२५२)

("ई -बुकचा" सहावा भाग लवकरच..!)

लेख क्र. ७४

"शराबी"@४२ वर्षे!
अमिताभचा चक्क "वन मॅन शो!"



"मुंछे हो तो नत्थूलाल जैसी हो! वरना नहीं हो!"

"कलाकार सिर्फ तारीफ का भूखा होता है, पैसे का नहीं"!,

"मै एक कलाकार हूं, मक्कार नही!"

"हमारी जिंदगी का तंबू तीन बम्बुओं पर खडा हुआ है, शायरी, शबाब और आप!"

"तोहफा देने वाली की नियत देखी जाती है, तोहफे की किमत नही!"

"जिसने पी नही व्हिस्की, किस्मत फूट गयी उसकी!.. ",

...प्रकाश मेहराच्या दिग्दर्शनातील "शराबी" (मुंबई रिलीज १८ मे १९८४) हे अमिताभ बच्चनने आपल्या शैलीत साकारलेले हे संवाद पडद्यावर आले रे आले की "थेटरातील टाळ्या शिट्ट्या" हमखास उमटणारच! या सुपर हिट पिक्चरच्या मुंबईतील प्रदर्शनास बेचाळीस वर्ष झाली देखील! तरी आज 'यू ट्यूब'वर "शराबी" एन्जॉय करताना तीच रंगत!

चित्रपटाच्या पडद्यावरील 'शराबी' (दारुड्या शब्द अगदीच सुमार वाटतो!) म्हटलं तरी अमिया चक्रवर्ती दिग्दर्शित 'दाग', बिमल रॉय दिग्दर्शित 'देवदास' यापासून अनेक पिक्चर आहेत! आणि अनेक गाण्यातही 'शराबी'पण आहेच. 'ये जो मोहब्बत है..' (कटी पतंग), 'जाम मे डूब रही यारों मेरी जीवन की हर शाम..' (नमक हराम) वगैरे अनेक! फिल्मी पार्टीतील 'दारुकाम' म्हटलं तरी राज कपूरच्या पार्ट्यांचे अनेक किस्से, कथा, दंतकथा कायमच चघळून सांगितल्या जातात!

पिक्चरचं नावच "शराबी" हे एकदम थेटच सांगते की ही 'गोष्ट' दारुचं भारीच व्यसन लागलेल्या माणसाची आहे! ही सुचली कशी यामागेही एक गोष्ट आहे! मनमोहन देसाई दिग्दर्शित 'कुली' च्या बंगलोर येथील मारहाणीच्या दृश्यात

'पुनीत इस्सार'चा ठोसा चुकवण्याच्या प्रयत्नात टेबलाचा कोपरा पोटात लागल्याने जखमी आणि मग आजारी झालेल्या अमिताभने १९८३च्या जानेवारीपासून पुन्हा शूटिंगला सुरुवात केली! काही महिन्यांतच चित्रपटसृष्टीतील काही स्टार, निर्माते, दिग्दर्शक, गायक, संगीतकार असा समूह विदेशात स्टेज शोसाठी (मेगा इव्हेंट) गेला! त्यात न्यूयॉर्क ते त्रिनिदाद टोबॅगो अशा विमान प्रवासात प्रकाश मेहरा अमिताभच्या शेजारी येऊन बसला! आणि गप्पांच्या ओघात म्हणाला, 'आपण एक पिता व पुत्र यांच्या नात्यावर' एक चित्रपट बनवूया! आपल्या बिझनेसमध्ये कमालीचा बिझी असलेल्या उद्योगपतीचा मुलगा आपल्या श्रीमंत घरातील मुन्शीच्या सहवासात राहून मोठा होतो पण 'घरातच प्रेम' मिळत नाही म्हणून कमालीचा दारुच्या आहारी जातो. या नात्यातील तणाव, संघर्ष यांची गोष्ट. चित्रपटाचे नाव "शराबी"!

'अटलांटा महासागरातून' पस्तीस हजार फूटांवरुन विमान जात असताना ठरलं, "शराबी'ची निर्मिती करायची! ही गोष्ट खुद्द अमिताभनेच एका मुलाखतीत रंगवून खुलवून सांगितलीय!

'प्रकाश मेहरा' सिनेमात पुरता मुरलेला माणूस! माझ्या आवडत्या दिग्दर्शकांतील एक! गीतकार बनायला तो चित्रपटसृष्टीत आला, मग दिग्दर्शक झाला! अन्य निर्मात्यांचे चित्रपट दिग्दर्शित करीत असतानाच स्वत: "जंजीर" (१९७३) पासून निर्माताही झाला! 'समाधी'च्या दिग्दर्शनात मग्न असतानाच धर्मेंद्रच्या तारखांचा काही मेळ लागेना. त्यात त्याची दुहेरी भूमिका! आशा पारेख व जया भादुरी या दोन नायिका. अशातच एक अल्पावधीत एक चित्रपट बनवू असा विचार करत 'जंजीर' बनवायचे ठरले! जयानेच प्रकाश मेहरांना अमिताभचे नाव सुचवले आणि पटकथाकार सलीम जावेद जोडीतील जावेद अख्तर यांनी एस. रामनाथन दिग्दर्शित 'बॉम्बे टू गोवा' (१९७२) पाहून अमिताभचे नाव निश्चित करण्याचा सल्ला दिला. पुढचा इतिहास सर्वज्ञात आहे! अमिताभच्या चित्रपटांच्या दिग्दर्शकांत मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा माझे जास्त आवडते! मेहरांनी तर अमिताभला विविध रुपात पडद्यावर आणले. 'जंजीर' नंतर 'हेरा फेरी' (१९७६), 'मुकद्दर का सिकंदर' (१९७८), 'लावारीस' (१९८१), 'नमक हलाल' (१९८२), 'शराबी' (१९८४), 'जादुगर' (१९८९) हे या जोडीचे चित्रपट! 'खून पसिना' (१९७७) चे निर्माते प्रकाश मेहराच होते, त्यांनी आपला

सहाय्यक दिग्दर्शक राकेशकुमारला स्वतंत्रपणे चित्रपट दिग्दर्शनाची संधी दिली! या जोडीचे यशाचे प्रगती पुस्तक भारी गुणांचे आहे. फक्त 'जादुगर' दाणकन आपटला आणि ही जोडी कायमची फुटली. त्याची सुरुवात 'शराबी ' पूर्ण होत असतानाच सुरु झाली..!

आजारपणातून बरे झाल्यावर अमिताभचे लक्ष आता सेटवर गेलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'शराबी' आणि टी. रामाराव दिग्दर्शित 'इन्कलाब' या चित्रपटांवर होते! वक्तशीर, मेहनती, व्यावसायिक व कामाची योग्य नियोजन करणाऱ्या अमिताभने सगळी आखणी करेपर्यंत 'शराबी'ची पटकथा लक्ष्मीकांत शर्मा यांनी लिहिली! कादर खानने संवाद लिहिले. निर्माते सत्येन पाल चौधरी यांनी भरभर सगळी आखणी केली. प्रकाश मेहरा अन्य कलाकारांच्या निवडीत गुंतले. राकेश रोशन निर्मित व के. विश्वनाथ दिग्दर्शित 'कामचोर' (१९८२)च्या यशानंतर जयाप्रदाला मोठ्याच प्रमाणावर हिंदीत ऑफर होती. तिने 'शराबी' साईन तर केला पण तारखांची समस्या निर्माण झाल्याने राकेश रोशन निर्मित व के. विश्वनाथ दिग्दर्शित 'जाग उठा इन्सान' सोडावा लागला. तो श्रीदेवीला मिळाला. ही साईड स्टोरी!

'शराबी' विक्की कपूर अमिताभ हे निश्चित होतेच! जयाप्रदाही ठरली! विक्कीच्या पित्याच्या अमर नाथ यांच्या भूमिकेत प्राण, तसेच ओम प्रकाश (मुनशी फूलचंद), रणजित, भारत भूषण (मास्टरजी), यासह चंद्रशेखर, आशालता, जानकीदास, सत्येन कप्पू, दीपक पराशर, ए. के. हनगल आणि विशिष्ट पद्धतीच्या मिशीत मुकरी!

तब्बल दोन तास छप्पन मिनिटे या अवधीच्या "शराबी"त 'बिझी उद्योगपती पिता' आणि त्यामुळेच दारुच्या आहारी गेलेला पुत्र! ("शराब की बोतल पर अगर मै लेबल की तरह चिपक गया हू, तो उस लेबल को चिपकानेवाले आप है"! हा संवाद बरेच काही सांगतो. "यह इंसान नही है, यह तो मशीन है! ऐसी मशीन जो सिर्फ नोट छापती है और नोट खाती है" अशी या पुत्राची खंत!) पिता बिझी म्हणून घरातील मुख्य नोकर या मुलाला सांभाळतो. त्याला नायिकेकडून प्रेम मिळते. ("जिनका अपना दिल तुटा होता है, वो दुसरों का दिल नही तोडा करते!"), पटकथेत अनेक गोष्टी घडत घडत रंगत वाढते! आणि त्यात मनोरंजनाची भट्टी आणि पट्टी जमते ती गीत संगीत व नृत्याने! संगीत बप्पी लाहिरीचे आहे. प्रकाश मेहरा यांनी "जहाँ चार यार मिल.." (किशोरकुमार व अमिताभ), "इंतहा हो गयी.." (आशा भोसले व

किशोरकुमार) ही गाणी लिहिली. अंजान यांनी "मुझे नौलखा मंगवा दे.." (आशा भोसले व किशोरकुमार), "मंझिले अपनी जगह है.." (किशोरकुमार), "लोग कहते है.." (आशा भोसले व किशोरकुमार), "दे दे प्यार दे प्यार दे.." (किशोरकुमार तसेच आशा भोसले सुद्धा!) ("दे दे प्यार दे.." हे गाणे आधी "रूना लैला"च्या "सुपर रूना" मधून आले होते.) ही गाणी लिहिली! ही गाणी लांबलचक असूनही कंटाळा येत नाही. (संगीत संयोजक : अनिल-अरूण यांना माझा कडक सॅल्यूट!) "जहाँ चार यार मिल.." गाण्यात एका कडव्यात महाराष्ट्रीय रुपात स्मिता पाटील आहे. ("नमक हलाल"साठी शूटिंग केलेला हा भाग यात वापरला! हेतू एकच, चित्रपट रसिकांचे मनोरंजन मनोरंजन मनोरंजन!). "इंतेहा हो गई.." हे गाणे अमेरिकेत गाणे "द रनर" यावर बेतलयं. या चित्रपटाचे संवादही लांबलचक होते! ते कायम ठेवले तर पिक्चर पाच तासांचा होईल अशी अमिताभने व्यक्त केलेली भीती मेहरा यांनी स्वीकारली! सगळं कसं आकार घेत होते असे तुम्हाला वाटेल. तसे अनेकदा नसतेच. अशातच दिवाळी आली. आणि आपल्या प्रतिक्षा बंगल्यावर फटाके फोडत असतानाच अमिताभच्या डाव्या हाताला जखम झाली. आता शूटिंग रखडणार हे उघड होते. पण अमिताभ थांबायला तयार

नव्हता. त्याने एक मार्ग काढला. डावा हात शर्ट अथवा कोटाच्या खिशात ठेवून शूटिंग सुरु केले. तो 'शराबी' असल्याने तो असे करु शकतो हे त्यामागचे लॉजिक. पण चक्क ते फळले. ती जणू स्टाईल वाटली! त्या काळात मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा यांच्यात भारीच तू तू मै मै चालायचं. मनजी मेहराना खिजवत म्हणाले, 'एक शराबी ही शराबी फिल्म ही बना सकता है, असली मर्द ही मर्द फिल्म बना सकता है..! ' प्रकाश मेहरा काही कमी नव्हते. त्यांनीही तेवढेच टोकदार उत्तर दिले, 'एक कुली ही कुली फिल्म बना सकता है, इतनी उंची बाते कर सकता है...!' हा शाब्दिक हल्ला प्रतिहल्ला त्या काळात खूपच गाजला. मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा यांच्यातील वाद सर्वश्रुत! या दोघांच्याही चित्रपटात दोन जण कॉमन असत.

अमिताभ व कादर खान! (कालांतराने अमिताभने कादर खानला दूर केले ती गोष्ट वेगळीच!). अमिताभने 'इंडिया टुडे'च्या मुखपृष्ठासाठी आपण, मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा असा अतिशय दुर्मिळ योग जुळवून आणला. फार गाजलं हो ते फोटो सेशन! 'शराबी' रिलीजसाठी तयार होता होता चित्रपटाचे पार्श्वसंगीत वगैरेवरुन अमिताभ व प्रकाश मेहरांमध्ये तू तू मै मै सुरु झाली! चित्रपट रिलीज होवून 'सुपरहिट'ही झाला. मेहरांना वाटलं, बस्स झाला अमिताभ! त्यांनी शत्रुघ्न सिन्हाला घेऊन 'ज्वालामुखी' तर राजकुमारला घेऊन 'मोहब्बत के दुश्मन' व 'मुकद्दर का फैसला' बनवले. फ्लॉपची हॅटट्रिक झाली की हो! मेहरा परत अमिताभकडे आले! आता अमिताभचा सल्ला महत्वाचा होता. 'जादुगर' चा उत्तरार्ध त्याने बराच बदलून घेतला यावर गॉसिप्स

मॅगझिनमधून बरेच उलटसुलट आले. पिक्चर मात्र फ्लॉप झाले नि ही जोडी कायमची फुटली! अमिताभच्या 'साठी'च्या निमित्ताने मुंबईतील एका मराठी वृत्तपत्राच्या रविवार पुरवणीसाठी प्रकाश मेहरा यांच्या मुलाखतीचा योग आला असता, 'जंजीर' साठी अमिताभला कसा निवडला हे अतिशय मनापासून सांगितले. (ते याच लेखात वर दिलेय) आताही आपल्याकडे अमिताभसाठी एक चांगली पटकथा आहे. भेटीसाठी कधी वेळ देतोय याची वाट पहातोय, मेहरांच्या बोलण्यात आत्मविश्वास कमी पण उसने अवसान जास्त होते... अर्थात हा योग जुळून आलाच नाही. या जोडीने भरपूर मनोरंजन दिले. 'शराबी' त्यातील धमाकेदार!

© दिलीप ठाकूर

(राम प्रहर - झूम प्रहर)

♥

लेख क्र. ७५

'नया दिन नयी रात' @५२ वर्षे
संजीवकुमारची 'नऊ रुपे' केवढी तरी कौतुकाची!

माणसाच्या आयुष्यातील नवरस आपणासही माहित आहेत. आश्चर्य अथवा अद्‌भूत, भयानक, करुणा, क्रोध, रौद्र, बिभत्स, शृंगार, वीरता आणि आनंद वा हास्य. त्या त्या प्रसंगानुरुप ते भाव व्यक्त होत असतात. आणि याच सर्व भाव भावनाना एकाद्या कथा व पटकथेत गुंफले तर? चित्रपट कशावरही असू शकतो. ही मूळ कल्पना दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटातील! तेथे १९६६ साली "नवरात्री' या नावाने तेलगू व तमिळ अशा दोन भाषेतील चित्रपट प्रदर्शित झाले! आणि त्यावरुनच हिंदीत दिग्दर्शक ए.

भीमसिंग यांनी "नया दिन नयी रात" (मुंबईत प्रदर्शित १० मे १९७४!) पडद्यावर आणला त्याला बावन्न वर्षे पूर्ण झाली देखील..! एव्हाना रसिकांची एक पिढी 'फ्लॅशबॅक'मध्ये रमलीही असेल. चित्रपट व क्रिकेट अनेक भारतीयांना हमखास जुन्या आठवणीत नेतेच. त्या काळात नवीन चित्रपटाचे 'पोस्टर' ही त्याची पहिली ओळख असे. ते पाहून चित्रपट रसिकांचे विचारचक्र सुरु होई, या चित्रपटात काय बरे पाह्यला मिळेल. याची गोष्ट काय असेल? सामाजिक असेल की सस्पेन्स? की आणखीन एकादी. 'नया दिन नयी रात'च्या पोस्टरवरील संजीवकुमारची एक दोन नव्हे तर चक्क नऊ रुपे (विविध मुखवटे) पाहून माझ्यासारख्या अनेक चित्रपट रसिकांच्या मनात प्रश्न आला, एकाद्या

"सुपर डुपर हिट्स" (भाग ५)♥© दिलीप ठाकूर

हीरोच्या डबल रोलच्या चित्रपटांची पोस्टर पाहिली (चाणक्य दिग्दर्शित "राम और श्याम' मधील दिलीपकुमार, मनमोहन देसाई दिग्दर्शित "सच्चा झूठा" वगैरे), अगदी नायकाच्या तिहेरी भूमिकेचे पोस्टर पाहिले (असित सेन दिग्दर्शित "बैराग" मधील दिलीपकुमार) पण नऊ रुपातील संजीवकुमार आणि जोडीला जया भादुरी? काय असेल बरं या चित्रपटात?

रस्त्यावरची पोस्टर्स, होर्डींग्स, रेडिओ विविध भारतीवर या चित्रपटाचा रेडिओ कार्यक्रम यातून चित्रपट जवळ येत होता आणि आता 'नऊ भूमिकेत संजीवकुमार' हे चित्र स्पष्ट झाल्याने मुद्रित माध्यमातील बातम्यात वगैरे हा चित्रपट चर्चेत आणि म्हणूनच तर विशेष कुतूहल! विजय आनंद दिग्दर्शित "जॉनी मेरा नाम" (१९७०) आय. एस. जोहरची धमाल तिहेरी भूमिका. रामन्ना दिग्दर्शित 'हमजोली' (१९७०) मधील मेहमूदने पृथ्वीराज कपूर, राज कपूर व रणधीर कपूर या तीन पिढ्यांची धमाल नक्कल करत रसिकांचे केलेले मनोरंजन! ही वेगळीच तिहेरी भूमिका असे काही संदर्भ समोर येत गेले. पण चक्क 'नऊ' भूमिका?

मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर शालिमार

ला थिएटर डेकोरेशनवर ही नऊ रुपे लक्ष वेधून घेणारी होती! (त्या काळात असे थिएटर डेकोरेशन पाहत पाहत एक प्रकारचे 'थिएटर पर्यटन' हा देखील आनंदाचा भाग असे. अशाच लहान लहान गोष्टीतील आनंदाने आपल्या देशात अगदी खालच्या माणसांपर्यंत चित्रपट नेला आणि रुजवला. त्यांची आठवण हवीच!)

'नया दिन...' ची मूळ गोष्ट ए. पी. नागराजन यांची, त्यावर ए. भीमसिंग यांनी पटकथेत माणसाच्या आयुष्यातील नवरस मांडलेत. नायिका सुषमा (जया बच्चन) हिच्या आयुष्यातील एकेका अडथळ्यात विविध रुपात तिला एकेक जण मदत करतो. त्या विविध व्यक्तीरेखा म्हणजेच संजीवकुमारची नऊ रुपे. त्यात वेडा डॉक्टर, रंगभूमीवरील कलाकार, कुष्ठरोगी, आपल्या भावाच्या खुनाचा बदला घेणारा डाकू अशी ती विविध रुपे आहेत. यांची नावे आनंद, स्वामी रहस्यानंद, सारंग, सेठ धनराज, शेरसिंग फुलकुमार वगैरे! संजीवकुमार कायमच अष्टपैलू व मेहनती कलाकार म्हणून ओळखला गेला. त्याला हा चित्रपट म्हणजे आपल्यातील गुणवत्ता दाखवायची खूपच मोठी संधीच मिळाली! खरं तर सुरुवातीस दिलीपकुमारला हा चित्रपट ऑफर झाला होता! दिलीपकुमारने एस. एच. रवैल दिग्दर्शित "संघर्ष" (१९६७)

मध्ये संजीवकुमार सोबत भूमिका साकारताना त्याच्या गुणवत्तेचा अनुभव घेतला होता, आणि त्याच कामाची जणू शाबासकी म्हणून दिलीपकुमारने 'नया दिन नयी रात' साठी संजीवकुमारचे नाव सुचवले. आणि या चित्रपटाच्या सुरुवातीस आपल्या नेहमीच्या शैलीत निवेदनही दिले. (यश चोप्रा दिग्दर्शित "त्रिशूल", नासिर हुसेन दिग्दर्शित "जबरदस्त" हेही चित्रपट सुरुवातीस दिलीपकुमारलाच ऑफर झाले होते! त्याच्या नकारानंतर संजीवकुमारला त्या व्यक्तीरेखा साकारायला मिळाल्या. एकाची भूमिका दुसऱ्याला, कधी तिसऱ्यालाच हे होतच असते. ती एक वेगळी रंगत!) 'नया दिन नयी रात' दिलीपकुमारने साकारला असता तर नायिका कोण? बहुतेक सायरा बानूच असती. नायिकेच्या अडचणीच्या प्रवासात विविध ठिकाणी नायक नवीन रुपात मदत करतो हे या 'थीम'मध्ये ही जोडी फिट्ट बसली असती.

संजीवकुमार व जया भादुरी (ती नंतर बच्चन झाली हो!) यांनी भिन्न नात्यांतील व्यक्तीरेखा साकारलीय. गुलजार दिग्दर्शित 'परिचय' मध्ये वृध्द पिता व त्यांची मुलगी, गुलजार दिग्दर्शित 'कोशिश' मध्ये पती व पत्नी, रघुनाथ झालानी दिग्दर्शित 'अनामिका' मध्ये प्रियकर व प्रेयसी (तरी तिची चार रुपे), रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले'मध्ये वृध्द सासरे व सून!

ईस्माईल मेमन दिग्दर्शित 'नौकर" मध्ये नायक व नायिका! यश चोप्रा दिग्दर्शित "सिलसिला" मध्ये संजीवकुमार डॉक्टर असून रेखाला त्याच्याशी लग्न करावे लागते. याचं कारण, पतीचे (शशी कपूर) विमान अपघातात निधन झाल्यानंतर त्याच्या पत्नीला (जया बच्चन) आपल्या दीरासोबत (अमिताभ बच्चन) लग्न करावे लागते त्यातून हा दीर व त्याची प्रेयसी (रेखा) दुखावतात आणि दुरावतात! संजीवकुमार व जया बच्चन यांचा एकत्र काम करण्याचा रुपेरी पडद्यावरील प्रवास असा विविध नातेसंबंधाचा! 'नया दिन नयी रात' मध्ये अखेरीस ते विवाहबद्ध होतात तेव्हा संजीवकुमारची सहा रुपे या लग्नात हजर असतात. या चित्रपटात फरिदा जलाल, सुंदर, ललिता पवार, टूनटून, मनोरमा, श्यामा, डेव्हिड, नाझनीन व ओम प्रकाश यांच्याही भूमिका. चित्रपटाचे छायाचित्रणकार जी. विठ्ठल राव, तर आनंद बक्षी यांच्या गीतांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत!

'नऊ' या आकड्यास खूप महत्व आहे. नवरात्रीत देवीची नऊ रुपे तर आईच्या पोटात मुलं मोठे होण्यास नऊ महिने लागतात. आणि त्यात 'नया दिन नयी रात' ची ही बहुचर्चित नऊ रुपे. या कॉमेडीच्या अंगाने खुललेल्या 'नया दिन नयी रात'ला सर्वसाधारण स्वरुपाचे यश लाभले.

त्यापेक्षा जास्त रंजक चर्चा संजीवकुमारच्या नऊ भिन्न मुखवटा आणि व्यक्तीरेखांची झाली..! तेच तर महत्वाचे असते! संजीवकुमार कधी नायक तर कधी सहनायक रंगवत रंगवत वाटचाल करत होता. महेश भट्ट दिग्दर्शित 'विश्वासघात' मधील पिता व पुत्र या दुहेरी भूमिकेतील टेलिफोनवरील संभाषणाचे दृश्य त्याच्या अभिनय वाटचालीतील सर्वात बहुचर्चित व सर्वोत्कृष्टही! संजीवकुमार स्टार नव्हे तर ॲक्टर! वयाची पर्वा न करता अनेक प्रकारच्या व्यक्तीरेखा साकारल्यात..! मॅटीनी शो, मग व्हिडिओ, त्यानंतर मनोरंजन उपग्रह वाहिनी, आता 'यू ट्यूब'वर 'नया दिन नयी रात'चा प्रवास सुरु आहेच. पण एकदा 'एन्जॉय' करु शकता. एकाच चित्रपटात एक नायक नऊ भूमिकेत असे मोहन सैगल दिग्दर्शित "वो मै नहीं" (१९७४) मध्येही होता (आचार्य अत्रे लिखित 'तो मी नव्हेच ' या बहुचर्चित नाटकाचे हे माध्यमांतर..! अर्थात न जमलेले) यात नवीन निश्चल अशीच नऊ रुपे घेतो.

पण त्यात रंगत नव्हती. तेथे संजीवकुमारच हवा. उगाच नाही हो 'नया दिन नयी रात' मधील संजीवकुमारची आजही उगाच चर्चा करीत नाहीत..! आज बावन्न वर्षे पूर्ण होऊन देखील! संजीवकुमारची नऊ रुपे कौतुकास प्राप्त होताहेत हे उल्लेखनीय! नाही का ?!

© दिलीप ठाकूर

(राम प्रहर - झूम प्रहर)

♥

लेख क्र. ७६

'बरसात' @ ७७ वर्षे
'बरसात में हमसे मिले तुम...!'

'बरसात' असं म्हणताक्षणीच आर. के. फिल्मचा सुपरिचित म्हणा वा रसिकांच्या किमान तीन पिढ्यांच्या माईंडमध्ये सेट झालेला म्हणा 'ट्रेड सिम्बॉल' डोळ्यासमोर येणारच! डाव्या हातात गिटार घेतलेला नीली आँखोवाला राज कपूर व त्याच्या उजव्या हातावर विश्वासाने मंत्रमुग्ध झालेली नर्गिस..! एकाद्या चित्रपट निर्मिती संस्थेच्या अशा 'लोगो'ला स्वतःची ओळख असणे, त्याला 'ग्लॅमर' असणे,

त्यामुळे त्या 'बॅनर'चे चित्रपट अथवा चित्रपटांमुळे अनेक वर्ष ओळखले जात असलेले अनेक चित्रपट हेदेखील मोठे यशच..! हा लोगो आर. के. फिल्मचे कला दिग्दर्शक एम. आर. आचरेकर यांचे रेखाटन आहे! मूळ कृष्ण धवल असलेले हे रेखाटन कालांतराने रंगीत झाले ते जागतिक ख्यातीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांच्या कुंचल्यातून! आर. के. फिल्मचा पहिला रंगीत चित्रपट राज कपूर दिग्दर्शित 'संगम' (१९६४) च्या वेळेस हा योग आला! हा संदर्भ सर्वप्रथम समजला तो बाळासाहेबांच्या निधनाच्या वेळेस (१७ नोव्हेंबर २०१२) मनोजकुमारने एका इंग्रजी वृत्तपत्राला मुलाखत देताना हे सांगितले.

काही वर्षातच दिग्दर्शक राहुल रवैल यांच्या आत्मचरित्रातही हा तपशील आहे.

'बरसात' असा अनेक संदर्भात वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट! २१ एप्रिल १९४९ रोजी प्रदर्शित झालेल्या या क्लासिक

चित्रपटाला ७७ वर्षे पूर्ण होत आहेत आणि अशा मोठ्या यशस्वी प्रवासानंतरही हा चित्रपट आपली ओळख देतो! त्यानंतरही राजकुमार संतोषी दिग्दर्शित 'बरसात' (१९९५) आणि सुनील दर्शन दिग्दर्शित 'बरसात' (२००५) या नावाचे चित्रपट आले! (दोन्हीत बॉबी देओल हीरो! राजकुमार संतोषी दिग्दर्शित 'बरसात' च्या वेळेस बॉबी देओलच्या पहिल्या चित्रपटासाठी ते नाव आपल्या 'विजयता फिल्मस' या बॅनरखालील चित्रपटाला मिळावे म्हणून धर्मेंद्रने रणधीर कपूरशी संवाद केल्याचा किस्सा गाजला!) तरी 'बरसात' म्हटलं की आर. के. फिल्म बॅनर, आर. के. स्टुडिओ निर्मिती संस्था, राज कपूर व नर्गिस ही लोकप्रिय जोडी आणि त्यातील सर्वच्या सर्व दहा सुपरहिट गाणी हेच आठवते!

'बरसात' चा मुहूर्त १९४७ च्या दसऱ्याच्या दिवशी झाला! आपल्या चित्रपटाचा मुहूर्त गाण्यांनी करायचा ही राज कपूर पध्दत! यावेळी दोन गाण्यांचे रेकॉर्डिंग करण्यात आले!

संगीतकार शंकर सूर्यवंशी आणि जयकिशन पांचाळ! अर्थात शंकर जयकिशन! (तेव्हा ते पृथ्वीराज कपूर यांच्या पृथ्वी थिएटर्स या नाट्यसंस्थेच्या रंगपटात रात्री रंगमंचासमोरच्या जागेत बसून लाईव्ह वाद्ये वाजवत! शंकर तबला तर जयकिशन पेटी वाजवत. राज कपूरने त्यांना चित्रपटाचे संगीतकार म्हणून 'बरसात 'च्या वेळेस पहिली संधी दिली!

'बरसात' मधील प्रेमिकाचं (राज कपूर)

प्रेयसीवरील (नर्गिस) प्रेमाची रित काही वेगळीच! (काहीशी हट्टी आणि आग्रही असते ना अगदी तश्शीच!) आणि तीच त्या काळातील चित्रपट रसिकांना भारी आवडली! हा प्रियकर झिंज्या पकडून नायिकेला जवळ ओढतो! छातीशी धरतो! अशातच तो तिच्या थोबाडीतही लगावतो! (त्याचं प्रेमच त्याला हा हक्क देतो!) त्याचा हा आक्रस्ताळेपणा ('आवारा'पन) प्रेयसीला आवडायचं! हे सगळेच प्रेमाच्या 'बरसात 'मधील एक रंग! तो पडद्यावरील प्रेयसीला आणि ती

भूमिका साकारत असलेल्या नर्गिसलाही आवडतेय हे 'कॅमेरा' लपवू शकत नव्हता. हे प्रेम, हे आलिंगन, ही मस्ती काही वेगळीच होती!

'आग' पासून 'जागते रहो' पर्यंत अशा सोळा चित्रपटात राज कपूर व नर्गिस एकत्र आले! या प्रवासात राज कपूरमधील रोमान्स, दिग्दर्शक, गीत संगीताचा आणि संकलन असा सगळाच बहर आला! आणि नर्गिसची त्याला पडद्यावर व पडद्यामागेही उत्तम साथ मिळाली! (त्यातून जन्माला आलेले गॉसिप्स आजही चघळले जातेय!) ते जणू खरे खुरे अर्थात प्रत्यक्षातील पती पत्नी असावेत अशी त्यांची केमिस्ट्री जमली होती! त्यात काही चित्रपट आर. के. फिल्मचे होते तसेच काही चित्रपट अन्य बॅनरखालील होते! (उदाहरणार्थ मेहबूब खान दिग्दर्शित 'अंदाज'!)

'बरसात' ची वैशिष्ट्य अनेक! या चित्रपटाच्या यशानंतर राज कपूरने चेंबूरला भव्य आर. के. स्टुडिओची

उभारणी केली. 'बरसात' च्या अगोदर राज कपूरने वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षी "आग" (१९४८) या चित्रपटाचे दिग्दर्शन केले!

पाठोपाठ आलेला 'बरसात' हा त्या काळातील चित्रपट अभ्यासकांच्या मते एक अतिशय मुक्त, मनस्वी, मनभावी चित्रपट! जितका उच्छृंखल तितकाच भावसखोल! या चित्रपटाची संपूर्ण देशात चर्चा रंगली! त्यानंतर राज कपूरने "आवारा" चे दिग्दर्शन केले. तर याच यशानंतर राज कपूर व नर्गिस यांनी 'आग', 'जान पहचान', 'अंबर', 'अनहोनी', 'आशियाना', 'बेवफा', 'आह', 'श्री 420', 'चोरी चोरी', 'जागते रहो' या चित्रपटात एकत्र काम केले. 'बरसात' निर्मितीच्या दिवसांतील एक



बहुचर्चित गोष्ट! नर्गिस अजून 'आर. के. फिल्म'मय झाली नव्हती. आणि अन्य 'बॅनर'खालील चित्रपटांतही भूमिका साकारत होती. त्यात ती के. बी. लाल दिग्दर्शित 'अंगारे' या चित्रपटाच्या नासिर खानसोबत भंडारदरा येथील आऊटडोअर्सला शूटिंग करत होती. तर राज कपूर 'बरसात' साठी निम्मीसोबत पांचगणी येथे शूटिंग करत होता! खरं तर 'बरसात'ची थीम पाहता कश्मीरमध्ये शूटिंग करणे आवश्यक होते. पण ते त्या काळात अधिकच खर्चिक असल्याने काही शूटिंग कश्मीरला केल्यावर पाचगणीत ते करत कश्मीरचा फिल देण्याचा प्रयत्न होता. (कश्मीरला

शूटिंग झालेला हा पहिला चित्रपट!) नर्गिसला पांचगणीतील शूटिंगची कल्पना आली. तिने एका रात्री दहा वाजता राज कपूरला पांचगणीला ट्रंकॉल लावला. तेव्हा तेच शक्य होतं. खरं तर त्यानंतर रात्रीच पांचगणीवरुन निघून भंडारदराला जावून पुन्हा सकाळपर्यंत परत येणे अवघड होते. पण तरीही राज कपूरने आपले सहाय्यक दिग्दर्शक राजा नवाथे आणि ध्वनिमुद्रक अल्लाउद्दीन यांना घेऊन भंडारदराला जाण्याचा निर्णय घेतला. रात्री दीड वाजता ते भंडारदरा येथे पोहचले, नर्गिसला भेटले आणि सगळे पुणे शहरात एका हॉटेलमध्ये आले. सकाळी राजा नवाथे यांनी आपल्या 'बरसात' च्या शूटिंगची राज कपूरला कल्पना दिली. राज कपूरने निर्णय घेतला. तो नर्गिसला भंडारदराला सोडायला जाणार आणि राजा नवाथे यांनी पांचगणीला जावून निम्मीच्या काही पासिंग दृश्याचे शूटिंग करावे!

'बरसात' दोन मित्रांच्या दोन भिन्न स्वभावाच्या व स्वरुपाच्या प्रेमकथा. एक प्रेम प्राण (राज कपूर) आणि रेश्मा (नर्गिस) यांचे तर दुसरे प्रेम गोपाल (प्रेमनाथ) आणि नीला (निम्मी) या जोडीचे. या जोडीवरचे 'पतली कमर है..' या नृत्य गीताची 'क्रेझ' भारीच होती. आणि प्रेमनाथच्या अनेक वैशिष्ट्यांतील एक हे गाणे आहे. निम्मीचा हा पहिलाच चित्रपट!

काळ कितीही पुढे सरकला तरी काही चित्रपट कलाकृती कायमच "आजच्याच" राहतात, याचं श्रेय त्यातील प्रत्येकाचा आत्मियतेचा सहभाग. आणि अशा अनेक महान क्लासिक चित्रपट कलाकृती पूर्वी पडद्यावर आल्या, चित्रपट रसिकांना त्या विलक्षण भावल्या.

राज कपूरचे गुरु केदार शर्मा यांच्या मते 'बरसात' राजकपूरचा सर्वोत्कृष्ट चित्रपट! एक

भावमधुर निसर्गरम्य आणि संगीतमय चित्रपट

म्हणून 'बरसात'चा उल्लेख केला जातो!

या चित्रपटातील 'बस करो, अब तो मै आ गयी ना?' हा नर्गिसच्या तोंडचा संवाद त्या काळी खूपच गाजला होता. 'बरसात' द्वारा शंकर-जयकिशन सारखे संगीतकार, शैलेंद्र सारखे गीतकार, हसरत जयपुरी, हे नावारुपाला आले! शैलेंद्र यांनी 'बरसात में हमसे मिले तुम...' आणि 'पतली कमर है, तिरछी नजर है..' ही दोन गाणी लिहिली. रामानंद सागर यांनी या चित्रपटाची पटकथा लिहीली होती. रामानंद सागर यांचा हा लेखक म्हणून पहिला चित्रपट होता. (काही वर्षांनी ते चित्रपट दिग्दर्शक झाले.) अभिनेते प्रेमनाथ व अभिनेत्री निम्मी रूपेरी पडद्यावर प्रथमच झळकले. या चित्रपटाने मुंबईत डॉ. भडकमकर मार्गावरील (पूर्वीचा लॅमिन्टन रोड) इंपिरियल थिएटरमध्ये खणखणीत रौप्यमहोत्सवी यश संपादले. कलकत्त्याच्या पॅराडाईज सिनेमागृहात तो ११४ आठवडे धो धो चालला. बरसातमधील गाणी एकापेक्षा सरस

होती. एकाच चित्रपटातील सर्वच गाणी दर्जेदार म्हणूनच लोकप्रिय हे पूर्वीचे हुकमी समीकरण. (आणि आज? पिक्चर संपला की गाणी विसरली जातात!)

"छोड़ गए बालम..", "हवा में उड़ता जाए..", "जिंदगी में हरदम रोता..", "बरसात में हमसे..", "जिया बेकरार है..", "मुझे किसी से प्यार..", "पतली कमर है..", "बिछड़े हुए परदेसी..", "अब मेरा कौन सहारा..", "मेरी आँखों में बस.." अशी मस्त गाणी या चित्रपटात होती. 'छोड गये बालम..', 'बरसात में हमसे.. ', 'हवा में उडता जाये..' या गाण्यांनी सिनेरसिकांना अक्षरशः वेड लावले. त्या काळात रेडिओ, उच्च मध्यमवर्गीयांच्या घरातील ग्रामोफोन, इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्स, वाद्यवृंद हीच गाणी ऐकण्याची प्रमुख माध्यमे. अशा वेळी हीच आवडती गाणी पडदाभर पाहण्यासाठी पुन्हा पिक्चरला जाणे हाच आवडता मार्ग होता. अशा लोकप्रिय गाण्यांमुळे एका पिढीतील हा चित्रपट अनेक

पिढ्या ओलांडूनही हिट आहे. ("कॅसेट्स" च्या जमाना येताच..तर जुनी गाणी मिळवायला लोक कसं जिवाचं रान करत असत, हे तुम्ही जाणताच.) आर. के. फिल्मची दर्जेदार लोकप्रिय गाणी हे कायमच वैविध्य ठरले आहे!

'बरसात मे हमसे मिले तुम'! एका क्लासिक चित्रपटाच्या सत्याहत्तरीनिमित्त हा फोकस!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

<u>लेख क्र. ७७</u>

'मनोरंजन' @५२ वर्षे
'विदेशी थीम' तिकडेच बरी...!

पिक्चरच्या नावात "मनोरंजन" असले म्हणून ते पडद्यावर असेलच/ दिसेलच असे नाही!

बरं, ते दिसले तरी त्या पिक्चरची थीम विदेशी असेल, आपल्याकडच्या पारंपरिक मनोरंजन चित्रपटाच्या हुकमी पब्लिकला रुचणारी नसेल तर? आजच्या 'ग्लोबल' युगातील 'डिजिटल' पिढीला कदाचित आश्चर्य वाटेल, एकेकाळी विदेशी चित्रपट आपला नाही असं मनोमन मानतच! आपल्या

मराठी व हिंदी चित्रपटावर एकेकाळी बेहद्द प्रेम केले जाई. अगदी आपल्या 'पिक्चर'च्या गोष्टीची पाळेमुळे विदेशी असली तरी ती पचत नसत! असाच एक पिक्चर 'ईगल फिल्म बॅनर'खालील, एफ. सी. मेहरा निर्मित व शम्मी कपूर दिग्दर्शित "मनोरंजन" (मुंबईत रिलीज ४ एप्रिल १९७४) अगदी अस्साच! त्याच्या रिलीजला बावन्न वर्षे पूर्ण झाली देखील! (हा चित्रपट ४ जानेवीरीला सेन्सॉर संमत झाला होता बरं!)

शम्मी कपूरची उछलकूद, धसमुसळा रुपेरी प्रेमिक ही खासियत त्याचं शरीर बेढब झाल्यावर त्याच्यापासून दूर दूर गेली! पडद्यावर रोमान्स करण्याची प्रत्येक हीरोची आपली एक संस्कृती होती. पण वाढते वय व त्यामुळेच सुटणारे शरीर हा त्यात मोठाच स्पीड ब्रेकर! जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित 'अंदाज' (१९७१) मध्ये हेमा मालिनीचा नायक साकारताना (आणि 'जिंदगी एक सफर है सुहाना..'

या केवळ एका सुपर हिट गाण्यातून अख्खा चित्रपट राजेश खन्नाने आपलासा केल्यावर!) शम्मी कपूरने नायक म्हणून पूर्ण विराम घेतला! आणि काही वर्षातच बातमी आली, शम्मी कपूर चित्रपट दिग्दर्शनात! भुवया उंचावणारच आणि कौतुकही वाटणार! कपूर खानदानातील राज कपूरने अभिनेता, स्टुडिओ मालक (अर्थात चेंबूरचा आर. के. स्टुडिओ), निर्माता, दिग्दर्शक, संकलक आणि गीत संगीत व नृत्याची उत्तम जाण असलेला अशी ख्याती केव्हाच प्राप्त केलेली! राज कपूरचा पुत्र रणधीर कपूरनेही 'कल आज और कल' (१९७१) चे दिग्दर्शन करताना आपले आजोबा पृथ्वीराज कपूर, वडील राज कपूर, प्रेयसी (मग पत्नीही) बबिता यांच्यासह स्वतः काम केलेले. त्यानंतर शम्मी कपूर चक्क चित्रपट दिग्दर्शनात ही बातमीच होती! चित्रपटाचे नाव 'मनोरंजन'! आणि प्रमुख भूमिकेत शम्मी कपूर, संजीवकुमार, झीनत अमान तसेच देवकुमार, फरयाल, मदन

पुरी, पेंटल, असित सेन, आगा, मुराद वगैरे! त्या काळात चित्रपट निर्मितीचा वेग काहीसा संथ होता. अडीच तीन वर्षांत एक चित्रपट पूर्ण होताना त्याच्या शूटिंगच्या आणि गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या बातम्या व फोटो प्रसिद्ध होत! चित्रपट हळूहळू प्रेक्षकांपर्यंत येत राही आणि त्यात एक गंमत होती. चित्रपट रसिक यावर गप्पा करत! त्यातून चित्रपटाबद्दलचे कुतूहल वाढत असे. 'मनोरंजन' चे झीनत अमानचे धाडसी फोटो पाहून नेमकं काय बरे चित्रपटात असणार हा प्रश्न वाढत गेला. देव आनंद अभिनित व दिग्दर्शित 'हरे राम हरे कृष्ण' (१९७२) मुळे 'दम मारो दम गर्ल!' म्हणून मॉडर्न इमेज झालेली झीनत अमान पाश्चात्य वळणाचे मोकळे ढाकळे व्यक्तिमत्व म्हणून गाजत होती. हिंदी चित्रपटसृष्टीतील पारंपरिक नायिकेच्या परंपरेला हा मोठाच धक्का होता! झीनत अमान गॉसिप्स मॅगझिनमधील आपली धाडसी फोटो सेशन आणि देव आनंद अभिनित व दिग्दर्शित 'हीरा पन्ना'तील कलरफुल

बिकीनी रुप, नासिर हुसेन दिग्दर्शित "यादों की बारात" (१९७३) मधील 'चुरा लिया है तुमने..' गाण्यातील मादक मोहक रुप असा एक प्रकारचा सांस्कृतिक धक्काच देत होती! ('रिमिक्स' तर भन्नाट!) मनोजकुमार दिग्दर्शित 'रोटी कपडा और मकान' (यात मनोजकुमार व शशी कपूरची नायिका), शक्ती सामंता दिग्दर्शित 'अजनबी' (पहिल्यांदाच राजेश खन्नासोबत), ब्रीज दिग्दर्शित 'चोरी मेरा काम' (शशी कपूर नायक), बी. आर. इशारा दिग्दर्शित 'प्रेम शास्त्र' (देव आनंद नायक) वगैरे अनेक चित्रपट तिला मिळाले होते! अभिनयात जेमतेम असूनही तिला निर्माते, दिग्दर्शक साईन करीत. झीनत अमान पर्व जणू सुरु झाले होते. आणि त्याच वातावरणात तिने 'मनोरंजन'साठी काही बोल्ड दृश्य दिल्याची गॉसिप्स मॅगझिनमधून चर्चा. ही ग्लॉसी पेपरवरील मासिके खरं तर अमुक आंबटशौकीनांना पर्वणीच! पण मध्यमवर्गीय मराठी माणसाच्या घरात यांना स्थान नव्हतेच.

त्यातील शक्य तितका मसाला मराठीत भाषांतर होत प्रसिद्ध होई त्यातून काही गोष्टी समजत. एक प्रकारचे 'मनोरंजन' होई!

'मनोरंजन'मध्ये नेमकं काय बरे असेल/ दिसेल याची उत्सुकता असतानाच दोन गोष्टी घडल्या! चित्रपटाच्या गाण्याची तबकडी 'रिदम हाऊस' व इतरत्र विक्रीला आली! आनंद बक्षी यांच्या गीतांना राहुल देव बर्मनचे संगीत! आणि गाणी एकदम भारी. आर. डी.चा तो विलक्षण चलतीचा काळ. 'आया हू मै तुझको ले जाऊंगा..' (किशोरकुमार), 'गोयाके चुनांचे..' (लता मंगेशकर व मन्ना डे), 'दुल्हन मैके चली..' (आशा भोसले, लता मंगेशकर व उषा मंगेशकर), 'चोरी चोरी सोला सिंगार करुंगी..' (आशा भोसले). ही गाणी इराणी हॉटेलमधील 'ज्यूक-बॉक्स' पासून रेडिओ सिलोनवरील 'बिनाका गीतमाला' पर्यंत पोहचलीसुध्दा! आणि दुसरी गोष्ट म्हणजे, 'मिनर्व्हा' थिएटरच्या एका शोकेस भरची 'मनोरंजन'

ची लॉबी कार्ड्स पाहण्यासाठी आम्ही त्या काळातील फिल्म दीवाने गर्दी करु लागलो. दाढीधारी आणि पोक्त शम्मी कपूर, पोलिसांच्या निळ्या हाफ पॅन्टमधील संजीवकुमार व अतिशय पाश्चात्य वस्त्रातील अल्ट्रा मॉडर्न लूकमधील झीनत अमान ही केमिस्ट्री वेगळीच वाटत होती! त्या काळातील पारंपरिक मनोरंजक चित्रपटाच्या चौकटीबाहेरचा काही तरी 'मसाला मिक्स' प्रकार आहे हे दिसत तर होते. पण नेमकं काय असावे? अशातच समजले, 'बिल्ली वार्ल्डर' दिग्दर्शित 'इरमा-ला डूस' या इंग्लिश चित्रपटावर शम्मी कपूरने 'मनोरंजन' बेतलाय. आता हा इंग्लिश चित्रपट पाहिलाय कोणी? त्या काळात इंग्लिश चित्रपट म्हणजे दक्षिण मुंबईतील 'रिगल', 'इरॉस', 'स्टर्लिंग', 'न्यू एम्पायर' येथे रिलीज होणारे आणि ज्यांना फारच 'हायफाय' इंग्लिश समजते त्यांचे चित्रपट! आम्ही परीक्षेत इंग्लिशमध्ये पस्तीस चाळीस गुण मिळवण्याचे ध्येय कायम ठेवणारे. आम्हाला फक्त

समजायचे, 'डर्टी हॅरी' या विदेशी चित्रपटावरुन 'खून खून' हा चित्रपट घेतलाय. चक्क गुलजार दिग्दर्शित 'परिचय'ची थीम 'साऊंड ऑफ म्युझिक' या विदेशी चित्रपटावर आधारित आहे एवढेच समजे आणि मूळ चित्रपट पाहिला नसल्यानेच हिंदी चित्रपट एन्जॉय करायचो!

'मनोरंजन' ला मात्र विदेशी कल्पना मारक ठरली. चित्रपटाची नायिका (झीनत अमान) वेश्या असून सिधा-साधा चड्डीवाला म्हणून ओळखला जात असलेला पोलीस हवालदार (संजीवकुमार) तिच्याकडे आकृष्ट होतो वगैरे वगैरे गोष्टी आपल्या चित्रपट रसिकांना अजिबात रुचल्या नाहीत! ही आपली गोष्ट नाहीच असाच 'फर्स्ट डे फर्स्ट शो'पासूनच्या पब्लिकचे मत पडले आणि पिक्चर फ्लॉप झाला! ॲडव्हान्स बुकिंगला पहिल्या तीन दिवसांची तिकीटे विकली गेल्याने ते खेळ हाऊसफुल्ल ठरले तरी ब्लॅक मार्केटमधील तिकीटांचा भाव कोसळला होता! सोमवारपासून बुकिंग क्लर्क

प्रेक्षकांची वाट पाहत बसला. गंमत म्हणजे, 'मनोरंजन'चे निर्माते एफ. सी. मेहरा आणि शम्मी कपूर यांच्या मालकीचे 'मिनर्व्हा' थिएटर असूनही अवघ्या चारच आठवड्यात पिक्चर उतरला. पब्लिकला थीमच आवडली नाही म्हटल्यावर काय हो? पब्लिक पसंत/ नापसंत हीच तर मोठी खेळी.आपण त्यांना जे दाखवू ते पाहतील असे कधीच होत नसते!

'मनोरंजन 'चे लेखन अब्रार अल्वी यांच्या सारख्या अतिशय अनुभवी पटकथा व संवाद लेखकाचे होते. गुरुदत्तच्या 'कागज के फूल', 'चौदहवी का चांद', 'साहिब बीवी और गुलाम' (याचे दिग्दर्शनही त्यांचेच), यांच्यासह 'प्रोफेसर', 'सूरज', 'बहारे फिर भी आयेगी', 'छोटी सी मुलाकात', 'संघर्ष', 'साथी' अशा अनेक चित्रपटांनंतर अब्रार अल्वी यांनी 'मनोरंजन' लिहिला. पण 'थीम'च रसिकांना पचनी पडणारी नव्हती तेथे कोण काय करणार? मनोरंजन

स्ट्रीट या रेड लाईट एरियातील ही गोष्ट! त्यात इमोशन्सपेक्षा ग्लॅमर व धाडसी दृश्य जास्त होती. शम्मी कपूर दिग्दर्शनात राज कपूर टच देऊ शकला नाही. वांद्यातील मेहबूब स्टुडिओ आणि अंधेरीतील नटराज स्टुडिओत मोठे सेट लावून बरेच दिवस शूटिंग केले. ते सुरु असतानाच 'सेन्सॉर' काही दृश्यांवर कात्री चालवेल अशी कुजबूज होतीच. झीनत अमान त्या काळात 'पीन अप ॲक्ट्रेस' म्हणून ओळखली जाई. कोणी इरॉटीक स्क्रीन प्रेझेन्स असंही म्हणे! अशा उपाधी देण्यात त्या काळात मिडियात चुरस असे. अनेक चित्रपटांच्या पूर्वप्रसिध्दीत 'मिडियाची भूमिका' खूपच महत्वाची असे! ते दिवसच वेगळे होते! अब्रार अल्वी चे लेखन असल्यानेच 'दिल-ए-भितारी, घंटा-ए-चौबिश, जवानी-इ-हरीभरी, जिस्म-ए-दिलकश असे उर्दूमिश्रित शब्द आले!

निर्माते एफ. सी. मेहरा त्या काळातील खूपच मोठे प्रस्थ! ओ. पी. रल्हन दिग्दर्शित 'मुजरीम' (शम्मी कपूर व गीता

बाली) या १९५८ च्या चित्रपटांपासून चित्रपट निर्मितीत एफ. सी. मेहरांनी सातत्य ठेवले. नरेश सैगल दिग्दर्शित 'उजाला' (राजकुमार, शम्मी कपूर व माला सिन्हा), लेख टंडन दिग्दर्शित 'प्रिन्स' (शम्मी कपूर व वैजयंतीमाला), सुशील मुजुमदार दिग्दर्शित 'लाल पत्थर' (राजकुमार, हेमा मालिनी, राखी), के. रमणलाल दिग्दर्शित 'ऐलान' (विनोद मेहरा, रेखा, विनोद खन्ना) असे चित्रपट निर्माण करीत असतानाच त्यांनी व शम्मी कपूरने भागीदारीत डॉ. भडकमकर मार्गावरील जुने 'मिनर्व्हा' चित्रपटगृह विकत घेऊन नवीन भव्य दिव्य दिमाखदार 'मिनर्व्हा थिएटर' उभे केले! प्रेक्षक संख्या तब्बल १४९९! पहिलाच चित्रपट 'लाल पत्थर'. आणि त्यानंतर 'मनोरंजन', 'खून खून' इत्यादी बरेच!

त्यांचे सुपुत्र उमेश मेहरा व राजीव मेहरा चित्रपट दिग्दर्शक झाल्यावर तर ईगल फिल्म बॅनरखालील चित्रपट निर्मिती फारच वाढली... 'हमारे तुम्हारे', 'चमत्कार', 'अशांती', 'एक जान है हम', 'शिकारी'

इत्यादी! 'मनोरंजन' च्या गुणात्मक व म्हणूनच

व्यावसायिक अपयशाची चर्चा कायमच होत राहिली. एका मुलाखतीत 'शम्मी कपूर'ने यावर म्हटले, एकदा लंडनला

असताना तो व बिल्ली वार्ल्डर या दोघांनी एकत्र एक फ्रेंच नाटक पाहिले! त्यावरुन बिल्ली वार्ल्डरने काही वर्षातच 'इर्मा ला डूस' बनवला, तो जगभर गाजला! आपण मग या चित्रपटावरुन 'मनोरंजन' बनवला. पण तेव्हा तो काळाच्या खूपच पुढचा चित्रपट होता. चित्रपटाची नायिका वेश्या असणे आणि तिचं हायफाय जगणे रसिकांना रुचले नाही. म्हणून चित्रपट फ्लॉप झाला असे शम्मी कपूरचे म्हणणे होते. अर्थात, एकदा रसिकांनी चित्रपट नाकारल्यावर असे कितीही कोणी काहीही म्हटले तरी त्याचा उपयोग नसतो! शम्मी कपूरने त्यानंतर राजेश खन्ना व सुलक्षणा पंडित या जोडीच्या 'बंडलबाज' या 'फॅण्टसी' चित्रपटाचे दिग्दर्शन केले. त्याचेही राहुल देव बर्मनचे संगीत लोकप्रिय झाले! पण पिक्चर मात्र फसला! मेन थिएटर सुपरवरुन असाच चार

आठवडय़ांत उतरला देखील! सुपर फ्लॉप! शम्मी कपूर चित्रपट दिग्दर्शनात प्रेक्षकांचे 'मनोरंजन' करु शकला नाही हेच खरे! तो त्याचा फंडा नव्हताच. झीनत अमानने मात्र फारच शरीर सौंदर्य घडवले. त्यात नवीन ते काय? 'मनोरंजन' नंतरही तिने राज कपूर दिग्दर्शित 'सत्यम शिवम सुंदरम', संजय खान दिग्दर्शित 'अब्दुल्ला', फिरोझ खान दिग्दर्शित 'कुर्बानी' इत्यादीतही तिने तेच केले....त्यातील काही चित्रपट चक्क सुपरहिटही झाले. तेच महत्वाचे आहे! (मिळालेल्या "लिंक्स" मी आपलेपणाने दिल्यात, परंतु दुर्दैवाने काही "लिंक्स" या फक्त "रिव्ह्यू" पद्धतीच्या सुद्धा आहेत. याचं मनोमन खूप वाईट वाटतंय खरं!)

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ७८

"बॉम्बे टू गोवा"@५४
"कुठूनही प्रवास सुरु करावा...मस्त धमाल!



उत्कृष्ट विनोदी चित्रपटाची व्याख्या काय?

रात्री झोपेत जरी आठवला तरी चेहऱ्यावर मंद स्मितहास्य यायला हवे. सकाळी लवकर उठून त्यातील काही विनोदी प्रसंग 'यू ट्यूब'वर कधी एकदा पाहतोय असं वाटायला हवे. आणि मग संपूर्ण दिवसभर ते धमाल प्रसंग डोळ्यासमोर येत येत आपला मूड फ्रेश राह्यला हवा.

"बॉम्बे टू गोवा" अगदी अस्साच धमाल पिक्चर! कधीही कुठूनही कसाही आणि कितीदाही पहावा मस्त

मनोरंजन करतो, नवीन उर्जा देतो! 'कॉमेडीचे हवं तेवढे कॅप्सूल' म्हणजेच हा चित्रपट. (जगभरातील अनेक भाषांत असे अनेक विनोदी चित्रपट आहेत. मूकपटापासून 'ओटीटी'पर्यंत हा मजेशीर प्रवास सुरु आहे.)

'बॉम्बे टू गोवा' मुंबईत प्रदर्शित झाला ३ मार्च १९७२ रोजी. तब्बल चोपन्न वर्ष झाली देखील . मेन थिएटर 'अलंकार' होते आणि पिक्चर एन्जॉय करण्यासारखे असल्याने थिएटरवरचा हाऊस फुल्लचा फलक आणि आत हास्याचे फवारे, फुलबाजे कायम राहिले!

तो विनोदवीर मेहमूदचा काळ होता. पिक्चरमध्ये तो हमखास हसवणार याची पब्लिकला हमी होती (आणि तो आपल्यापेक्षा जास्त भाव खाऊन जातो म्हणून अनेक बड्या हीरोनीच त्याचा आपल्या चित्रपटातून पत्ता कट केल्याचं गॉसिप्स गाजत होते. म्हणून तर मेहमूदच हीरोगिरीकडे वळला!)

'बॉम्बे टू गोवा 'चा निर्माता मेहमूद आणि एन. सी. सिप्पी. त्यांनी 'मद्रास ते पॉन्डेचरी' या १९६६ सालच्या सुपरहिट तमिळ भाषेतील चित्रपटाची रिमेक करायचे ठरवले (चेन्नई शहर त्या काळात मद्रास म्हणून ओळखले जाई.) दिग्दर्शन एस. रामनाथन यांच्याकडे सोपवले. मूळ चित्रपटात नागेश याने रंगवलेली बस कंडक्टरची धमाल भूमिका या चित्रपटात मेहमूदने 'शूटिंगच्या वेळेस त्यात भर घालत घालत रंगवली'. पटकथेनुसार काम करणे काही कलाकारांना योग्य वाटते, तर काही कलाकार एकदा का चित्रपटाची 'थीम', आपली व्यक्तीरेखा आणि प्रसंग लक्षात आला की त्यात ॲडिशन घेतात. कॉमेडी करणे महाअवघड! भाषेवर आणि टायमिंगवर प्रभुत्व हवे. तेव्हाच त्यांचा विनोद रसिकांपर्यंत पोहचतो. मेहमूद त्यात विनोदवीरांचे विद्यापीठ म्हणून ओळखला जातो. आणि 'बॉम्बे टू गोवा' सह त्याने 'लाखों मे एक', 'मै सुंदर हुँ', 'दो फूल', 'गरम मसाला' , 'अलबेला' (मा.

भगवानदादांप्रमाणे मेहमूदचाही 'अलबेला' नावाचा चित्रपट आहे बरं!), 'कुंवारा बाप' (मेहमूदच दिग्दर्शक आहे) हे चित्रपट 'आपलेसे केले'. त्याचे म्हणून हे चित्रपट ओळखले जातात!

हिंदी चित्रपटाची सर्वकालीन पहिली ओळख म्हणजे, 'दोन घटका मस्त करमणूक' हवी. 'टाईमपास' हवा. छान विरंगुळा मिळायला हवा. अनेक प्रकारच्या व्यक्तीगत ताण तणाव, दुःख, कटकटी यातून मोकळीक हवी. त्याचा विसर पडावा! 'बॉम्बे टू गोवा' हा तर एक "प्रवासी चित्रपट"! अशा पध्दतीचाही चित्रपट असू शकतो. त्यात कधी असा विनोदी मसालेदार मनोरंजक चित्रपट असतो तर कधी जोया अख्तर दिग्दर्शित "जिंदगी ना मिलेगी दोबारा" सारखा मैत्रीची धमाल तितकीच भावपूर्ण गोष्ट सांगणारा चित्रपट असतो. अगदी हेमंत ढोमे दिग्दर्शित "झिम्मा" आणि "झिम्मा २" देखिल एक प्रकारचा प्रवासी चित्रपट! प्रवासी चित्रपटाची उदाहरणे

बरीच. प्रवासात अनेक स्वभाव व वयोगटातील माणसे आणि त्यांच्या अनेक प्रकारच्या गोष्टी यावर चित्रपट!

"बॉम्बे टू गोवा"मध्ये रोमान्स, विनोद, रहस्य, गीत संगीत नृत्य, योगायोग, साप, कोंबडी, पिस्तूल अशा अनेक गोष्टींचा जमून आलेला मसाला. आठवला तरी हसू येते हे त्याचे मोठेच यश! "बॉम्बे टू गोवा" च्या अगोदर "पडोसन", 'साधू और शैतान", "प्यार किये जा" अशा विविध प्रकारच्या विनोदी चित्रपटांनी उत्तम यश प्राप्त केले असल्याने अशा पठडीतील चित्रपटासाठी रसिकांची उत्सुकता वाढली होती. ('पडोसन'वरुन मराठीत विनय लाड याने 'पटली रे पटली', तर 'प्यार किये जा'वरुन मराठीत महेश कोठारेने 'धूम धडाका' बनवला!) 'पडोसन'इत्यादींच्या यशाने 'संपूर्ण विनोदीपट' हे समीकरण अधिक एस्टॅब्लिश झाले, अशा चित्रपटांसाठीची रसिकांची मानसिकता व दृष्टिकोन तयार झाला होता आणि या चित्रपटात एक कॉमन फॅक्टर आहे,

मेहमूद! त्याचा स्वतःचा हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण झाला होता. विनोदवीरांना कुठेच कोणी फारसं सिरीयसली घेत नसले तरी ते आपलं काम चोख करतात ही एक परंपरा कायम आहे!

"बॉम्बे टू गोवा" या चित्रपटात अमिताभ बच्चन आणि अरुणा इराणी नायक नायिका असून शत्रुघ्न सिन्हा, किशोरकुमार, मेहमूद, अन्वर अली, ललिता पवार, केश्तो मुखर्जी, मनोरमा, मुकरी, सुंदर, नासिर हुसेन इत्यादींच्याही भूमिका आहेत. राजेन्द्र कृष्ण यांच्या गीताना राहुल देव बर्मनचे आहे. 'देखा ना हाय रे..', 'दिल तेरा है मै भी तेरी हूँ..' ही या चित्रपटातील गाणी आजही लोकप्रिय आहेत. आणखीन एक विशेष म्हणजे, "बॉम्बे टू गोवा" साठी अमिताभ बच्चनची निवड कशी झाली माहित्येय? खरं तर तेव्हा त्याचा अगदी सुरुवातीचा पडता काळ सुरु होता. 'सात हिन्दुस्तानी', 'एक नजर', 'बन्सी बिरजू' वगैरे वगैरे चित्रपट

'फ्लॉप' होत होते. पण याच काळात तो मेहमूदचा भाऊ अन्वर याच्या घरी राहत होता आणि अन्वरने या चित्रपटात ड्रायव्हरची भूमिका साकारली म्हणून अमिताभलाही संधी मिळाली ती देखील अरुणा इराणीचा नायक म्हणून मिळाली! खरं तर अरुणा इराणी मेहमूदची हुकमी नायिका म्हणून ओळखली जात होती. अरुणा इराणीने बालकलाकार म्हणून या क्षेत्रात पाऊल टाकले. वयात येताना छोट्या छोट्या भूमिका साकारत साकारत वाटचाल करत असतानाच 'गुनाहों का देवता'मध्ये पहिल्यांदाच मेहमूदसोबत भूमिका मिळाली (त्याच सुमारास रुपेरी पडद्यावरील मेहमूदच्या हुकमी जोडीदार शुभा खोटेचे लग्न झाले, तर मुमताज सहनायिका, प्रमुख नायिका असा प्रवास करत होती. ती गॅप अरुणा इराणीने भरुन निघाली. सिनेमाच्या जगात असे काही होतच असते. कोणती गोष्ट फळेल हे सांगता येत नाही). 'बॉम्बे टू गोवा'त अरुणा इराणी अमिताभची नायिका असेल

हा निर्णय मेहमूदचा आणि तो तात्कालिक परिस्थितीतून आलेला!) एकाद्या चित्रपटाच्या निर्मीतीत असे अनेक छोटे मोठे घटक गुंतलेले असतात (त्याचेच किस्से होतात) आणि चित्रपट रसिकांना ते जाणून घेण्यात फार इंटरेस्ट असतोच. पिक्चरमधील बसमधील अमिताभने नाचत नाचत साकारलेले 'देखा ना हाय रे सोचा ना..' या गाण्यावर नाचायला त्याला जमेना. नृत्य दिग्दर्शक पी. एल. राज त्याला टेकवर टेक करायला लावत. अखेर तो हैराण झाला आणि मेकअपरुममध्ये जाऊन बसला. मेहमूदने त्याची बरीच समजूत घातली. तरीही तो त्याची विनवणी करत होता, जमणार नाही. अखेर मेहमूदने एक शक्कल लढवली. अमिताभ तयार होऊन सेटवर येईपर्यंत त्याने अन्य कलाकारांना सांगितले अमिताभचा पहिलाच टेक आम्ही ओके करु आणि तो चांगलाच झाला आहे असे म्हणतच तुम्ही टाळ्या वाजवा. तस्सेच झाले. हे नाटक छान वठले.

अमिताभचा आपल्या नृत्याबाबतचा न्यूनगंड गेला आणि तो अधिकच आत्मविश्वासाने नृत्य करु लागला. हा 'किस्सा' खुद्द अरुणा इराणीने सांगितला. कलाकार असा घडत असतो असेच म्हणूयात. पिक्चरचे बरेचसे शूटिंग चेन्नईतील विजयवानी स्टुडिओत झाले. मूळ चित्रपटात नसलेला गाडीतून 'कोंबडी' पळाल्याचा प्रसंग ही मेहमूदची कल्पना. तर प्रवासी अनेक प्रकारचे असतात एकादी अशीही (ललिता पवार) हा पंच रंगला. अन्वर गाडी चालवत असतानाच समोर साप येणे, आपण हाती साप घेतलाय हे समजल्यावर मेहमूदची गाळण उडणे असे छोटे छोटे धमाल प्रसंग पाहण्यातही अनेकांचे मस्त मनोरंजन होते. मेहमूद व अन्वर, एक वाहक, एक चालक, एकाचे नाव राजेश तर दुसऱ्याचे खन्ना. आणि एका प्रसंगात गाडीभोवती फेरी मारताना एकमेकांना हाक मारताना राजेश.... खन्ना... हा पंच थेटरात प्रचंड धमाल उडवे! पिक्चरमधला मुंबई गोवा प्रवास असा

कधीही, केव्हाही, काहीही घडू बिघडू शकते या गोष्टींनी रंगला!

तुम्हाला कदाचित कल्पना नसेल पण "जंजीर" (१९७३) साठी इन्स्पेक्टर विजयच्या भूमिकेसाठी अमिताभ बच्चनचे नाव पटकथा संवाद लेखक सलिम-जावेद यांनी सुचवले असता दिग्दर्शक प्रकाश मेहरानी "बॉम्बे टू गोवा" पाहून



अमिताभची निवड केली. यातील त्याचा स्क्रीन प्रेझेंस आणि मारहाण दृश्यातील आत्मविश्वास पाहून प्रकाश मेहरा इम्प्रेस झाले आणि लगोलग त्यांनी अमिताभची निवड केली. या चित्रपटाचे हे देणे खूप महत्वाचे आहे. एकाद्या चित्रपटाबाबत

असेही काही वेगळे घडत असते. सिनेमाची दुनिया ही अशी बहुरंगी, बहुढंगी. सत्तरच्या दशकात हा चित्रपट त्यानंतर रिपीट रन आणि मॅटीनी शोला पुन्हा पुन्हा प्रदर्शित होताना अनेकांनी तो पुन्हा पुन्हा पाहून एन्जॉय केला. ऐशीच्या दशकात या चित्रपटाची व्हिडिओ कॅसेट उपलब्ध होऊ लागली आणि आता पुढील पिढीतील चित्रपट रसिकांना आवडू लागला. यातील विनोद कालबाह्य झाले नाही. असे करता करता हा चित्रपट आणखीन काही पिढ्या ओलांडूनही तितकाच आनंद देत राहिला. आणि 'देखा ना हाय रे..' हे गाणे जनसामान्यांच्या पिकनिकमध्ये हुकमी असल्यानेही या चित्रपटाची ओळख कायम राहिली. म्हणूनच चित्रपटात गाणी हवीत, ती एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढ्यांत नेत असतात!

पुन्हा एकदा "बॉम्बे टू गोवा" (२००७) या नावासह अशाच पठडीतील चित्रपट आला. पण तो

मूळ चित्रपटाची ओळख आणि व्यक्तिमत्व यांचा विसर पाडण्यात यशस्वी ठरला नाही. २००७ साली हा चित्रपट पडद्यावर आला. राजू पेडणेकर दिग्दर्शित या चित्रपटात

शक्ती कपूर, टीनू आनंद, दिनेश हिंगू, राजू श्रीवास्तव, सुनील पाल, नवीन प्रभाकर, पेंटल, संजय मिश्रा, विजयराज, असरानी, एहसान कुरेशी, असिफ शेख, विजू खोटे, ज्युनियर मेहमूद इत्यादींच्या भूमिका आहेत! सचिन पिळगावकरने याच "बॉम्बे टू गोवा"ची "नवरा माझा नवसाचा" या नावाने रिमेक केली! चित्रपटाचा क्लायमॅक्स गणपतीपुळे येथे होतो. पण हाही चित्रपट म्हणावा तसा जमला अथवा रंगला नाही. मूळ चित्रपटाचे व्यक्तिमत्व त्याच्या रिमेकला येणं शक्यही

नव्हतेच म्हणा. इतकेच नव्हे तर आता 'नवरा माझा नवसाचा २' असा सिक्वेल सुद्धा आला. या सगळ्यात एक महत्वाचं, रसिकांची पिढी बदलली तरी "बॉम्बे टू गोवा"च विविध माध्यमातून (डिजिटल पिढी यू ट्यूबवर आनंद घेत आहे) पाहत असताना त्याची चक्क नक्कल कोण हो पाहिल? अगदी कानडी भाषेतही "एकान्दथा" या नावाने रिमेक करण्यात आली आणि त्यातही रंगत आली नाही. याचं कारण, मेहमूद हा हुकमाचा एक्का होता. त्याला 'चित्रपटातील कॉमेडी म्हणजे काय?' याचं भान होते. व्यक्तिगत आयुष्यातील दु:ख विसरुन जनसामान्यांना "लोटपोट" हसवणे त्याचा हेतू होता.

आजच्या ओटीटीच्या युगात वेगवेगळ्या

निमित्ताने मल्टीप्लेक्समध्ये जुने चित्रपट प्रदर्शित होताहेत, कालची आणि आजची पिढी त्याला गर्दी करतेय, तर मग होऊन जाऊ दे, मेहमूदच्या धमाल पिक्चर्सचा एक महोत्सव.

त्याच्या अनेक प्रकारच्या व्यक्तीरेखा, गेटअप, विनोदाचे टायमिंग आणि कधी गीत संगीत व नृत्यातील रंगत पाह्यला मिळेल. आणि असाच एक विनोदी चित्रपटांचाही महोत्सव होऊ देत, त्यात मेहमूदच्या काही पिक्चर्ससह 'चलती का नाम गाडी', 'दो दुनी चार', 'बावर्ची', 'चुपके चुपके', 'अंगूर' असे अनेक चित्रपट एन्जॉय करता येतील. एक मस्त सेलिब्रेशन होईल. पिक्चर पाहणे हा आनंद सोहळाच तर असतो...!!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ७९

'हीरा पन्ना' @ ५२ वर्षे
'पन्ना की तमन्ना है के हीरा मुझे मिल जाए..!'

देव आनंद यशापयशाने थांबणारा नव्हताच. त्याच्याभोवतीच्या वलयात हिट फ्लॉपचा परिणाम होत नसे! पिक्चर हिट झालं तरी तो उत्साहात, फ्लॉप झाले तरी त्यात अडकून न पडण्यात जणू तत्पर. देव आनंद एक वेगळेच रसायन. तो देव आनंद होता हो. देव आनंद!

पन्नाशी जवळ आली तरी 'हीरो'गिरी करीत असतानाच तो 'प्रेम पुजारी' (१९७०) पासून दिग्दर्शनात उतरला नि पहिल्याच प्रयत्नात फसला! म्हणून काय झालं? त्याने 'हरे राम

हरे कृष्ण'ची तयारी सुरु केली. मुमताज नायिका! पण महत्वाचे होते ते हिप्पी कल्चरमध्ये एकदम 'सही' अथवा 'फिट्ट' बसणाऱ्या अभिनेत्रीची! पडद्यावरची त्याची बहिण हवी होती! जाहिदाने ('गॅम्बलर' मध्ये ती त्याची प्रेयसी असते.) नकार दिल्यावर देवपुढे प्रश्न पडला, आता कोण? अशातच एका फिल्मी पार्टीत देव आनंदसमोरच त्या काळातील नवोदित अभिनेत्री झीनत अमान येऊन उभी राहिली! देव आनंदची पर्सनॅलिटीचं अशी भारी की त्याचं पाहणं बघूनच युवती त्याच्याकडे आकर्षित होत! तोपर्यंत झीनतचा पहिला चित्रपट ओ. पी. रल्हन दिग्दर्शित 'हलचल' (१९७०) पडद्याला भोज्जा करुन गेला होता. पब्लिकनेच न पाहिलेला पिक्चर देव आनंदनेही पाहिलेला असणं शक्यच नव्हते. या पार्टीत झीनत अमान, देव आनंदच्या अगदी समोर येऊन उभी राहिली. आपल्या पर्समधून सिगारेट काढली, हातात धरली आणि देव आनंदकडे लायटर मागितला! पिक्चरमध्ये फिट्ट बसेल

अशीच कडक सिच्युएशन! पन्नास-बावन्न वर्षांपूर्वी एखादी युवती सिगारेट ओढते हे एकदम धाडसी आणि एक्स्युझिव्ह असे. (आजच्या कार्पोरेट युगात खास युवतींसाठी सिगारेटचे वेगवेगळे ब्रॅण्ड आहेत म्हणे!) देव आनंद या सगळ्या डेअरिंगबाज ॲपिरियन्सकडे पाहतच राहिला. त्याला 'हरे राम हरे कृष्ण' मधील जसबीर सापडली. गॉसिप्स मॅगझिनमधून ही 'ग्रेट भेट' फारच रंगवून साकारली गेली. देव आनंद आणि मिडिया एकमेकांचे प्रिय होतेच. झीनतचे मॉडर्न असणे/ दिसणे/वागणे/बोलणे नि वैचारिक व शारीरिक उंची त्याला भारी आवडली! एव्हाना देव आनंदनेही जणू कात टाकत मॉडर्न व्हायचं पाऊल टाकले होते. हा पिक्चर १९७२ च्या २१ जानेवारीला मुंबईत प्रदर्शित होण्यापूर्वीच झीनतची 'दम मारो दम गर्ल' इमेज लोकप्रिय झाली होती! इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्सपासून रेडिओ सिलोनवरील 'बिनाका गीतमाला'पर्यंत सगळी कडेच 'दम मारो दम मीट

जाए गम..' आणि 'हरे रामा हरे कृष्णा..' (हे इंग्लिशमिश्रित) या गाण्यांची प्रचंड धूम होती. त्या काळात पिक्चर रिलीज झाल्याशिवाय गाणी पडद्यावर कशी दिसतात याची अजिबात कल्पना येत नसे आणि त्यातच गंमत असे. फर्स्ट शोपासूनच पिक्चर हिट, झीनत अमान स्टार! आता पिक्चर हिट म्हणजे नवीन चित्रपटांच्या 'ऑफर' हे हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात चलनी नाणे. झीनतची पहिली पसंती अर्थातच देव आनंद! त्याच्याच दिग्दर्शनातील 'हीरा पन्ना'त ती होतीच! आता दोन नायिका! एक राखी आणि दुसरी झीनत अमान! याच दिवसात गुलशन रॉय निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित 'जोशीला' (१९७३) मध्ये हेमा मालिनी नायिका आणि 'कुछ भी करलो एक दिन तुमको..' या देव आनंदसोबतच्या स्टाईलीश रोमॅन्टीक गाण्यासह काही मोजकीच दृश्य असलेली भूमिका राखीने स्वीकारली होती. (यशजींसाठी की देव आनंदसाठी हा प्रश्न अनुत्तरीतच राहिला, बरं का?) 'हीरा

पन्ना'तही एक गाणे आणि काही दृश्ये एवढीच भूमिका तिने स्वीकारली! बंगालवरुन मुंबईत आल्यावर राखीने हिंदी चित्रपट मिळवायच्या प्रयत्नात 'प्रेम पुजारी'च्या वेळी ती देव आनंदला भेटली होती. पण तोपर्यंत वहिदा रेहमान व जाहिदाची निवड झाली होती. ती भेट लक्षात ठेवूनच की काय राखीला तो संधी देत होता!

'हरे राम....'च्या खणखणीत यशानंतरचा देव आनंदच्या दिग्दर्शनातील चित्रपट म्हणून 'हीरा पन्ना'ची घोषणेपासूनच उत्सुकता! देव आनंद हा कुठेही असला तरी देव आनंदच असे आणि आपली शैली, इमेज, क्षमता व लोकप्रियता यानुसार वागे. 'हीरा पन्ना'चे मेहबूब स्टुडिओत सेट लावून पहिले चित्रिकरण सत्र पार पडल्याचे वृत्त आले, आनंद बक्षींची गाणी व राहुल देव बर्मनचे संगीत यातून काही गाण्यांचे रेकॉर्डिंग झाल्याचे फोटो मुद्रित माध्यमातून दिसू लागले (तेव्हा फक्त तेच माध्यम होते आणि जनसामान्यांपर्यंत

अनेक गोष्टी पोहोचण्यास प्रभावी व पुरेसे होते). पिक्चरच्या फोटोत देव आनंद व राखी दिसत त्यापेक्षा देव आनंद व झीनत अमान जास्त लक्ष वेधून घेत! गळ्यात कॅमेरा अडकवलेला देव आनंद आणि कलरफुल बिकिनीतील झीनत अमान असा फोटो भारीच वाटे. (त्या काळात फक्त आणि फक्त इंग्लिश भाषेतील गॉसिप्स मुख्य रंगीत फोटो पाह्यला मिळत आणि असे बोल्ड फोटो पाहताना आपल्याला कोणी बघत तर नाही ना याची फार फार काळजी घ्यावी लागे! (आजची डिजिटल पिढी तुलनेत नशीबवान की काय?)

पिक्चर पूर्ण होता होता गाण्याची ध्वनिमुद्रिकाही मार्केटमध्ये आली. त्यावरही एका बाजूस जाळीच्या पाळण्यातील बिकिनीतील झीनत अमानचे फोटो काढणारा देव आनंद हाच हुकमी फोटो! मुख्य प्रवाहातील चित्रपटात इतकं मोकळंढाकळं तसं नवीनच होतं! अथवा बी. आर. इशारा, राम दयाल, फिरोझ चिनॉय यांच्या पिक्चरमध्ये असे.

पण एव्हाना देव आनंद पाश्चात्य शैलीत रमणारा होता, त्यात हे फिट्ट होते! आनंद बक्षींच्या गाण्यांना राहुल देव बर्मनचे संगीत हे हिट्ट समीकरण मस्त जमले होते. 'मै तस्वीर उतारता हूँ..' (किशोरकुमार), 'पन्ना की तमन्ना है..' (लता मंगेशकर व किशोरकुमार), 'बहुत दूर मुझे चले जाना है..' (लता मंगेशकर व किशोरकुमार), 'एक पहेली है तू..' (आशा भोसले व किशोरकुमार) ही गाणी ऐकता ऐकताच लोकप्रिय झाली. देव आनंद व चित्रपट संगीत हे कायमस्वरुपी हिट्ट समीकरण. अनेक दिग्दर्शकांच्या चित्रपटातील गाण्यात त्याने रंग भरल्याचे त्याचे वैशिष्ट्य त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गीत संगीतात कायम राहिले यात आश्चर्य नाही. पूर्वीच्या अनेक कलाकारांनी रुपेरी

पडद्यावर अधिकाधिक उत्तमपणे गाणे साकारण्याची कला अवगत होती. उगाच ते मोठी खेळी जिंकले नाहीत!

'हीरा पन्ना'ची गाणी लोकप्रिय पण पिक्चर रिलीज होत नव्हते! त्या काळात टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत! (आजच्या शुक्रवारी मुंबईत तर पुढच्या शुक्रवारी दिल्लीत. त्यानंतर आणखीन कुठे कुठे असा मोठाच वळणावळणाचा प्रवास. आपल्या गावात पिक्चर कधी येईल काय माहीत अशीच स्थिती) आणि त्या काळात चित्रपटाप्रमाणे मेन थिएटर मिळण्यासाठी निर्माते व वितरक वाट पहात (चित्रपटाचा इतिहास असा बहुस्तरीय आहे.) काही कट्स देऊन पिक्चरला सेन्सॉरचे प्रमाणपत्र देण्यात आल्याचे वृत्त

आले. आता वाटले, पिक्चर लवकरच रिलीज होईल. त्यातही त्या काळातील चित्रपट वितरणातील दादा मॉडर्न मुव्हीजचे गुलशन रॉय हे नवकेतन फिल्मच्या 'गाईड'पासूनचे वितरक आणि त्यांच्या त्रिमूर्ती फिल्मच्या 'जॉनी मेरा नाम' (दिग्दर्शक विजय आनंद) आणि 'जोशीला' (दिग्दर्शक यश चोप्रा)

यात देव आनंद नायक! तात्पर्य, सगळे समीकरण जमून आलेले! चित्रपट प्रेक्षकांपर्यंत आणण्यास अशी अनेक गणिते जमून यावी लागतात! चित्रपटाचे जग अशा अनेक लहान मोठ्या गोष्टींनी खच्चून भरलयं. असं असूनही गुलशन रॉय यांनी 'हीरा पन्ना'च्या मुंबई विभागातील वितरणाचे हक्क घेऊ

नये? काय बरे व्यावसायिक अडथळा असावा? या गडबडीत चित्रपट प्रदर्शित होणे लांबत गेले. इतके की १९७३ ही संपले (दिवाळीत रिलीज झालेला 'जोशीला'ही रसिकांनी नाकारला) १९७४च्या १ फेब्रुवारी रोजी 'हीरा पन्ना' रसिकां समोर आला. त्याला ५२ वर्षे पूर्ण होत आहेत म्हणूनच हा फोकस! आणि त्यातही विशेष उल्लेखनीय गोष्ट, या चित्रपटाच्या निमित्ताने

नवकेतन फिल्म चित्रपट वितरण क्षेत्रात आले.

ही देखील एक बातमीच!

पिक्चरचे लेखन देव आनंद व सुरज सनिम यांचे! कला दिग्दर्शन टी. के. देसाई यांचे, छायाचित्रणकार फली मिस्री यांचे तर संकलन बाबू शेख यांचे. देव आनंदची टीम हुकमी! त्याच्या उत्फूर्तपणात सूर मिसळणारी!

थीम काय? फोटोग्राफर हीरा भंडारी (देव आनंद) आणि 'एअर हॉस्टेस' अर्थात हवाई सुंदरी रीमा सिंग (राखी)

यांचे प्रेमसंबंध छान रुजत असलेले. अशातच एका विमान अपघातात रीमाचे दुर्दैवाने निधन होते आणि त्यामुळे उदास उदास झालेला हीरा आपल्या फोटोग्राफीत मन गुंतवतो! अशातच राजा साब (रेहमान) यांचे फोटो काढत असतानाच पन्ना (झीनत अमान) त्यांचे किमती हीरे चोरुन ते हीराच्या फॅशनेबल गाडीच्या पेट्रोलच्या टाकीत टाकते! आता हे हीरे तेथून मिळवायचे तर हीराशी मैत्रीचे नाटक करायला हवे. तो सुचवेल, सांगेल तसे बिकिनीत फोटो काढू देते! तर हीराला हे हीरे सापडताच ते तो पोलीसांकडे द्यायचे ठरवतो! तेव्हा ती आपण हे हीरे चोरले होते हे सांगते. पण का? तर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अनिलने (धीरजकुमार) पन्नाला धमकी देत आपल्या गुन्हेगारी टोळीत सामील केलेले असते. आपली ही स्टोरी ती सांगत असतानाच हीराच्या गळ्यातील लॉकेटमधील रीमाचा फोटो ती पाहते आणि आपण रीमाच्या बहिण आहोत असे हीराला सांगते. आता हीरा 'पन्ना'ला

गुन्हेगारी टोळीतून बाहेर काढण्याचा निर्णय घेतो आणि पिक्चर शेवटच्या भागाकडे जातो. आता यात एक गंमत आहे, 'पन्ना की तमन्ना है के 'हीरा' मुझे मिल जाए..' हे पन्ना गाते ते 'गाडीत लपवलेल्या हिरे' डोळ्यासमोर ठेवून, फोटोग्राफर हीराला उद्देशून नाही. (येथे दिग्दर्शक दिसतो असं अजिबात म्हणायला नको!)

स्टोरीत फार नाट्यमय असे काहीच नाही. त्या काळात अनेक चित्रपटांत 'हीरे चोरी' हा 'कॉमन फॅक्टर' असे. ('व्हिक्टोरिया नंबर २०३' पासून 'छैला बाबू'पर्यंत अनेक चित्रपटांत ते दिसले). देव आनंद संपूर्ण चित्रपटभर आपण देव आनंद आहोत या ऐटीत छान वावरलाय! त्याचा उत्साह आपण अनुभवावा यासाठीच राखीने काम केल्याचे जाणवते आणि झीनत अमानने आपली 'दम मारो दम गर्ल' इमेज अधिकच मोकळे ढाकळेपणे पडद्यावर आणली, त्याला अभिनय म्हणता येणार नाही! ती म्हणेल, तसं तुमचे

सर्टिफिकेटही नको! चित्रपटात जीवन, रेहमान, ए. के. हनगल, धीरजकुमार, सुधीर, पेंटल, शीतल, मनमोहन, मॅकमोहन यांच्याही भूमिका!

त्या काळात हिट गाणी पाह्यची तर थिएटरला जाण्याशिवाय पर्यायच नसे. 'हीरा पन्ना'ला जे काही सर्वसाधारण यश मिळाले ते त्यातील गाण्यामुळेच! आणि लोकप्रिय गाणी चित्रपटाला सतत रसिकांसमोर ठेवत असतात आणि त्या काळात असा हिट गाणीवाला पिक्चर मॅटीनी शोला यायची आम्ही वाट पहात असू! तसा तो येई! देव आनंदचे अनेक चित्रपट असेच मॅटीनी शोला येत असत आणि पाहून होत!

'हीरा पन्ना'त दिग्दर्शक देव आनंद फारसा दिसला नाही पण झीनत अमानच्या तो प्रेमात तो नाही ना आणि तीही त्याच्याकडे आकृष्ट झालेली नाही ना असे मात्र वाटले! (पिक्चर पाह्यचा म्हणजे फक्त गोष्ट पाह्यची नसते हो आणि

गोष्टीत दम नसेल तर असं काही असतेच). जोडीने 'कलाबाज', 'वॉरंट', 'डार्लिंग डार्लिंग', 'प्रेम शास्त्र', 'इश्क इश्क इश्क' या चित्रपटातून जोडीने काम केल्यावर एका फिल्मी पार्टीत झीनत अमान राज कपूरसोबत आली आणि नवीन गॉसिप्स जन्माला आले. तोपर्यंत देव आनंद टीना मुनिमसोबत 'देस परदेस' च्या शूटिंगमध्ये रमला देखील. 'हीरा पन्ना' त्याचा एक दिग्दर्शनीय नमुना होता इतकेच म्हणायचे नि 'यू-ट्यूब'वर त्यातील गाणी 'एन्जॉय' करायची. बावन्न वर्षानंतरही ही गाणी पुन्हा पुन्हा तजेलदार वाटतात ही देव आनंद यांची पुण्याई!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ८०

"तलाश" @ ५६ वर्षे
एक कोटीची "तलाश" चक्क शून्यावरच बाद!

तुम्हाला एक प्रश्न विचारतो, १९७० च्या जानेवारी महिन्यात गिरगावातील चाळीतील मध्यमवर्गाच्या एकत्र कुटुंब पध्दतीत (आजी, आजोबा, पती, पत्नी व तीन लहान मुले) कुटुंब प्रमुखाला महिन्याला किती रुपये पगार चांगले सुख देणारा होता असे तुम्हाला वाटते? एक लक्षात घ्या, घरात मनोरंजनासाठी फक्त छोटासा ट्रान्झिस्टर आहे (बटनाने कमी पण फटका मारल्यावर तो चांगला चालतो), तोपर्यंत

'दूरचित्रवाणी' हा शब्दच माहित नव्हता, त्यामुळे त्याची गरज नव्हतीच. घरात लॅण्ड लाईन फोन, एअर कंडिशनर, फ्रीज, मिक्सर, ज्यूसर, गिझर, वॉशिंग मशीन या चैनीच्या वस्तू गरजेच्या नव्हत्या. संपूर्ण दोन तीन चाळीत एक फोन भारी वाटे. जेवणासाठी हॉटेलमध्ये जायचे असते हा विचारही मनात येत नसे, महिन्यातून एकदा मॅजेस्टीक थिएटरमध्ये 'स्टॉल'चे पासष्ट पैशाचे तिकीट काढून मराठी चित्रपट घरचा डबा घेऊन जाऊन सहकुटुंब पाहिला जात असे.

या सगळ्याची गोळाबेरीज महिना तीनशे साडेतीनशे रुपयात छान जमून जाई! (तुमच्या कुटुंबात, नात्यात कोणी सत्तरीपार वयाचे असेल तर हवं तर त्यांना विचारा याबाबत!)

अशा आर्थिक स्थैर्याच्या काळात एकाद्या हिंदी चित्रपटाच्या निर्मितीचे बजेट तब्बल एक कोटी? त्याच सुमारास कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट मराठी चित्रपट लाख सव्वा लाखात बने. हिंदी चित्रपटही पंचवीस

तीस लाखात निर्माण होई. एखादा अपवाद! 'मेरा नाम जोकर' (१९७०) (४.१६तास) त्यातही राज कपूरचा मंत्र असे, 'पिक्चर दिलसे बनती है, पैसे से नहीं!' त्या काळात 'पै पै मोजून अथवा वाचवून नि वाढवूनही' चित्रपट निर्मिती होत नसे. पब्लिकला झक्कास मनोरंजन द्यायचे, गीत संगीत व नृत्य भारी असावे अशीच हिंदी चित्रपट निर्मितीमागची भावना असे!

अशातच अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक ओ. पी. रल्हन आपण 'एक कोटी खर्चाचा चित्रपट 'तलाश'ची निर्मिती केली आहे असं पिक्चरचं शूटिंग संपल्या संपल्या चित्रपटाच्या पूर्वप्रसिध्दीत जोरशोर से सांगू लागताच चित्रपट रसिकांच्या भुवया उंचावणारच! समाजाच्या सर्वच स्तरात नातेसंबंधाची 'वीण' घट्ट असल्याचा तो काळ होता. जगण्यासाठी पैसा हा फक्त आधार आहे, त्यासाठी अचाट अफाट संपत्तीची भूक नाही असे मानले जात असतानाच 'एक कोटीचा पिक्चर' असे

विविध भारतावरील रेडिओ प्रोग्राममधून कानावर ('तलाश कहानी है उस लडकी की, जिसे जिंदगी मे तलाश थी' असं या पिक्चरच्या रेडिओ प्रोग्राममध्ये 'डायलॉग' होता हे आठवतेय), रस्त्यावरच्या दिव्याच्या खांबावरील पोस्टरवर, मुंबईतील मोक्याच्या ठिकाणच्या होर्डींग्सवर सतत दिसू लागल्यावर 'एक कोटीचा आकडा' जरा जास्तच मोठा वाटू लागला. त्या काळात मध्यमवर्गीयांच्या घरात नट नट्यांची लफडी कुलंगडी चवीचवीने प्रसिद्ध करीत असलेल्या ग्लॉसी पेपरवरील गॉसिप्स मॅगझिनना प्रवेश नसे. सकाळी घरात येणारे वृत्तपत्र आणि वाचनालयातून आणले जाणारे पुस्तक वा साप्ताहिकातून 'पिक्चरच्या जगात' काय काय चाललंय ते समजायचं आणि ते पुरेसेही असे. अशातच 'एक कोटीचा पिक्चर' हे जरा अतीच वाटायचं. खरं तर, पिक्चर किती रुपयांत बनतो आणि मग निर्माता त्यावर किती कमावतो असे आर्थिक प्रश्न त्या काळातील चित्रपट रसिकांच्या मनात येत

नसत. पिक्चर आवडला तर डोक्यात घ्यायचा नि ठेवायचा आणि पडद्यावर न ठेवता डोक्यावर घ्यायचा एवढचं ठाऊक असल्याचे ते दिवस होते!

राजेंद्रकुमार 'ज्युबिलीकुमार' म्हणून ओळखला जात होता तरी याच दिवसात राजेश खन्नाचे पिक्चर पडद्यावर येत ते 'ज्युबिली हिट' व्हायला. त्याची फेवरेट नायिका शर्मिला टागोरचे एक मोठे स्वप्न पूर्ण होत होते! देव आनंद (यह गुलिस्ता हमारा), दिलीपकुमार (दास्तान) आणि आता राजेंद्रकुमार (तलाश) यांची नायिका व्हायचं तिचं मोठे स्वप्न पूर्ण होत होते. तेदेखील 'डबल रोल'ने. 'ॲन इव्हिनिंग इन पॅरिस', 'ये रात फिर न आयेगी' या चित्रपटात तिने तत्पूर्वीच (आणि मग 'मेरे हमसफर', 'राजा रानी', 'दो शत्रू', 'बेशर्म', 'मौसम' इत्यादीत) तिचा डबल रोल! 'तलाश 'मध्ये शहरी व ग्रामीण अशी दुहेरी भूमिका. चित्रपटात राजेंद्रकुमार व शर्मिला टागोर यांसह बलराज साहनी, ओ. पी. रल्हन, हेलन,

सुलोचनादीदी, मदन पुरी, सप्रू, टूनटून इत्यादींच्या भूमिका! एका दृश्यात राजेंद्रकुमार ओ. पी. रल्हनला म्हणतो, 'काम पे दिल नहीं लगता, बॉस ने मुझे वार्निंग दी थी..!' यावर ओ. पी. रल्हन म्हणतो, 'वार्निंग नहीं तो क्या डार्लिंग देगा?'

पिक्चरची भट्टी काही जमली नाही. प्रेमकथाच होती. गाणी मात्र एकदम सरस. मजरुह यांच्या गीतांना सचिन देव बर्मनचे संगीत! 'पलकों के पीछे से..' (मोहम्मद रफी व लता मंगेशकर), 'कर ले प्यार करले..' (आशा भोसले), 'तेरे नैना तलाश कर..' (मन्ना डे), 'कितनी अकेली..' (लता मंगेशकर), 'आज को जुनली रात मां..' (लता मंगेशकर व मोहम्मद रफी) अशी अविट गोडीची छान गाणी ही अतिशय मोठी जमेची बाजू! त्यातही 'आज को जुनली...' गाण्याबद्दल एक खास गोष्ट! त्यातील डान्सरमध्ये 'सुषमा शिरोमणी' आहे म्हटलं. भुवया उंचावल्या ना? साठच्या दशकात शालेय वयातच सुषमाने चित्रपटात छोट्या मोठ्या भूमिका साकारणे, नृत्य

गीतात सहभागी असणे याला सुरुवात केली. आणि त्याच मेहनती वाटचालीत या नृत्य गीतात तिला संधी मिळाली!

ओ. पी. रल्हन चित्रपट क्षेत्रात येण्यापूर्वी रेल्वे स्टेशनवर पेपर विकायचा. पन्नास साठच्या दशकात हिंदी चित्रपटातून छोट्या छोट्या भूमिका साकारत असतानाच दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांच्याकडे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून उमेदवारी सुरु केली. अतिशय धडपड्या. बडबड्या. त्यातूनच 'मुजरीम' (१९५८) पासून त्याने दिग्दर्शनात पाऊल टाकले. यात शम्मी कपूर, गीता बाली, रागिणी, शुभा खोटे यांच्या प्रमुख भूमिका! त्यानंतर 'गहरा दाग' (१९६३ राजेंद्रकुमार व माला सिन्हा), 'फूल और पत्थर' (१९६६ मीनाकुमारी व धर्मेंद्र), यानंतर मोठीच उडी घेऊन 'तलाश'. आणि त्यानंतर 'हलचल' (१९७१), 'बंधे हाथ' (१९७३), 'पापी' (१९७७) व 'प्यास' (१९८२) या चित्रपटांचे निर्मिती व दिग्दर्शन! धर्मेंद्रला 'फूल और पत्थर 'च्या खणखणीत यशाने पहिला व्यावसायिक आधार

मिळाला. मुख्य प्रवाहातील नायकाने उघड्या निधड्या छातीने दृश्य देणे तेव्हा मोठेच धाडसाचे. धर्मेंद्रच्या दणकेबाज प्रकृतीला ते शोभले आणि त्याच्या 'ही मॅन' इमेजचा जणू पाया रचला गेला. (तो १९७३ साली 'यादों की बारात' च्या यशाने घट्ट झाला.) असं असलं तरी 'फूल और पत्थर' च्या निर्मितीच्या काळात त्याचं व रल्हनचे संबंध बिघडले होते आणि अनेक वर्षांनंतर याच ओम प्रकाश रल्हनला श्रध्दांजली म्हणून वांद्यातील एका चौकाचे धर्मेंद्रच्या शुभ हस्ते नामकरण करण्यात आले. राजेंद्रकुमार व रल्हन खूपच जुने मित्र आणि कालांतराने रल्हनच्या बहिणीशी राजेंद्रकुमारचे लग्न झाले.

'तलाश' एक कोटींत निर्माण झाला याची प्रचंड हवा निर्माण झाली! ९ जानेवारी १९७० रोजी मुंबईत प्रदर्शित करण्यात आला. मुख्य चित्रपटगृह अप्सरामधील 'फर्स्ट शो'पासूनच पब्लिकचा रिपोर्ट 'बकवास है' असा आला आणि पिक्चर पडला! श्रवणीय गाणीही पिक्चरला वाचवू शकली

नाहीत....आणि तुम्हालाही माहित्येय, फ्लॉप पिक्चरची यथेच्छ टवाळी होते. कोणी म्हटलं, रल्हनची 'ॲश' (म्हणजेच राख), तर कोणी आणखीन काही म्हटलं! बराच काळ मग कोणी फिल्मवाल्याने 'पिक्चरच्या बजेटचा आकडा' पूर्वप्रसिध्दीत आणला नाही, खेळवला नाही. पिक्चरच्या अपयशाचा तो प्रचंड मोठा धक्का होता. तब्बल दशकभरात कोणी काही म्हटलं नाही. कारण किती रुपयांत पिक्चर बनवला यापेक्षा त्यात काय दाखवलं ते बघू देत असा थेट मामला होता. आणि मग १९८० साली जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शान' आला. तेव्हा त्याच्या खर्चिक स्टाईलीश जाहिरातीत म्हटलं, 'सहा कोटीचा पिक्चर शान'.....दहा वर्षांत सहापट आकडा!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)

लेख क्र. ८१

'पिक्चर हिट, तो सबकुछ फिट्ट....!'

'पिक्चरच्या जगात' एकच नाणे चालतं, पिक्चर हिट मंगता है यार! पिक्चर हिट झाला रे झाला येथे रंग कधी बदलतो ते समजतच नाही!

'ॲनिमल'ने कोणी अफाट स्तुती, कोणी वारेमाप निंदा वा टीका असं चक्रीवादळ निर्माण करताच 'तृप्ती डिमरी' स्टार झाली. तुम्ही हा पिक्चर एन्जॉय केला असेल असं गृहित धरुनच तिचा रोल, त्याचं फूटेज अशा गोष्टी पुन्हा सांगत नाही. पिक्चर हाऊसफुल्ल गर्दीत सुरु असतानाच तृप्ती डिमरीचे

सोशल मिडियातील फॉलोअर्सची संख्या सहा लाख सतरा हजारवरुन झपकन दोन पॉईंट दोन मिलीयनच्याही वर गेली. पिक्चरमधली तिची एन्ट्री, तिची व्यक्तिरेखा, त्या भूमिकेचे फूटेज, तिने रणबीर कपूरसोबत दिलेली बोल्ड दृश्ये या सगळ्यातून तिचे फॉलोअर्स अतिशय वेगाने वाढले. ती आता स्टुडिओपासून पेज थ्री पार्टीपर्यंत आणि आपल्या घराबाहेर पडून एकाद्या फूड जॉईंटपर्यंत कुठेही गेली रे गेली पाप्पाराझी अर्थात सेलिब्रिटीजच्या मागावर असलेला 'मिडिया' तिच्यावर खाड खाड फ्लॅश उडवतोय! तीदेखील छान थांबून, मस्त हसत 'उजवीकडून डावीकडे' पाहत हवे तेवढे आपले फोटो काढून देतेय. तिलाही हा अनुभव बराचसा नवाच. सनी देओल निर्मित व श्रेयस तळपदे दिग्दर्शित 'पोस्टर बॉईज' पासून (२०१७) या मनोरंजन क्षेत्रात आहे. या सहा वर्षांत तिने आणखीन काही चित्रपटात भूमिका साकारलीय. पण खणखणीत यश "ॲनिमल' ने देताच संपूर्ण

चित्रपटसृष्टी, मिडिया आणि फॅन्स/फॉलोअर्स यांची तिच्यावर नजर खिळली. ती चक्क ओळखीची वाटू लागली. काही फोटोग्राफर तिला गंमतीने 'दुसरी भाभी' म्हणतात.

यशाची हीच तर ताकद असते!

विजय आनंद दिग्दर्शित 'जॉनी मेरा नाम' (१९७०) च्या वेळेसही सेम स्टोरी. यात भरपूर कॅरॅक्टर्स पण विजय आनंदची पटकथेवर भारी पकड. देव आनंद, हेमा मालिनी, प्राण, आय. एस. जोहर, प्रेमनाथ असे सगळेच 'छा' गये आणि अशातच पद्मा खन्नाने पडदाभर साकारलेल्या 'हुस्न के लाखों रंग..' या गाण्याचे वादळ उठले. आजच्या ग्लोबल युगातील पिक्चर्समध्ये अनेकदा तरी अनेक अभिनेत्री मॉडर्न फॅशन म्हणून भारी शॉर्ट्समध्ये म्हणा अथवा बिकिनी म्हणा अतिशय सहज त्यात वावरतात. आपल्या आकर्षक शरीर सौंदर्याचे दर्शन घडवतात. त्यात काय विशेष? स्वीमिंग पूलावर बिकिनी अथवा बेदिंग सूटातच वावरणार हे त्यांचं

म्हणणं अजिबात चूक नसते. पन्नास बावन्न वर्षांपूर्वी 'बिकिनीत अभिनेत्री' हा काहीसा सांस्कृतिक धक्काच. अशा वातावरणात चक्क स्री लालसेने वखवखलेल्या नजरेतील प्रेमनाथ (हा देखील अभिनयाची एक भाग) आणि त्याच्या बॉडीगार्डसनी पद्मा खन्नाच्या प्रियकराला (रंधवा) घट्ट पकडलाय आणि पद्मा खन्ना आपल्या अंगावरचे एकेक वस्त्र उतरवतेय. एकिकडे यावर मिडियातून भरपूर टीका तर दुसरीकडे आंबटशौकीनांची दाद. त्या काळात हिट चित्रपट नि त्यातील हिट गाणे पाह्यचे तर प्रत्यक्षात थेटरात जायला हवे आणि त्यातूनच पिक्चर हाऊसफुल्ल. पद्मा खन्नाला त्यानंतर व्हॅम्पच्या भूमिकेत करियर करावे लागले. सुधेन्दु रॉय दिग्दर्शित 'सौदागर' (१९७३) भूमिका तुलनेत वेगळी. 'सजना है मुझे सजना के लिए..' या गाण्यात ग्रामीण युवतीच्या रुपात तिने छान रंग भरला. नूतन व अमिताभसोबत छान संधी

मिळाली. तरी तिची ओळख, 'जॉनी मेरा नाम' मधील 'हुस्न के लाखों रंग..' या गाण्याची!

पिक्चर हिट तो काफी कुछ होता है.

देव आनंदने आपल्या दिग्दर्शनातील 'हरे राम हरे कृष्ण' (१९७२) आपल्या लहानपणी हरवलेल्या आणि मोठेपणी हिप्पी झालेल्या बहिणीच्या भूमिकेसाठी अगोदर जाहिदाला विचारले. आपण अमरजीत दिग्दर्शित 'गॅम्बलर' (१९७०) मध्ये देव आनंदची नायिका साकारलीय. देव आनंद दिग्दर्शित व अभिनित 'प्रेम पुजारी'मध्ये सहनायिका साकारलीय! तेव्हा आता त्याच्या बहिणीची भूमिका नको असा विचार करत तिने 'हरे राम हरे कृष्ण' नाकारला. देव आनंदने ओ. पी. रल्हन दिग्दर्शित 'हलचल' (१९७०) मधून रुपेरी पदार्पण केलेल्या झीनत अमानला विचारले. तिचं पाश्चात्य रुपडं, मॉडर्न ॲटीट्यूड 'हिप्पी गर्ल' म्हणून एकदम 'सही' ठरला आणि तिने 'दम मारो दम' चा ठसा आणि

ठसका असा काही साकारला की उसकी तो करियर बन गयी. तिच्या अभिनयापेक्षा

तिची मादकता आणि मोहकता तिचे क्रेडिट कार्ड

ठरलं.

प्रत्येक भूमिकेवर त्या कलाकाराचे नाव लिहिलेले असते हा अलिखित नियम! त्यासाठी एक तर पिक्चर सुपरहिट हवे अथवा रोल पॉवरफुल्ल् हवा. लक्षात राहणारा हवा!

'दास्तान' (१९७२) च्या वेळेस थोडसं असंच घडलं. पिक्चर पडद्यावर आल्या आल्याच पब्लिकने नाकारले! पण बदफैली व्यक्तीरेखेतील बिंदूंचे भारी कौतुक झाले! शर्मिला टागोरचं दिलीपकुमारची नायिका बनण्याचं बऱ्याच दिवसांपासूनचे स्वप्न दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांनी या चित्रपटाच्या निमित्ताने पूर्ण केले. दिलीपकुमारची यात दुहेरी भूमिका. एकाची नायिका शर्मिला टागोर तर दुसऱ्याची पत्नी

बिंदू. ती आपल्या मित्रांबरोबर गुलछर्रे उडवतेय. त्याच्याशी जणू भारी एकनिष्ठ आहे. त्याच्यासोबत लाईफ एन्जॉय करतेय. बिंदूने अतिशय छद्मी हसत, विखारी नजर टाकत, नि लाडे लाडे बोलत अशी काही ही व्यक्तीरेखा साकारली की सत्तरच्या दशकातील ती आघाडीची व्हॅम्प बनली. पिक्चर थेटरातून निघून गेले तरी बिंदूचा ठसका लक्षात राहिला. फ्लॉप पिक्चरही एकाद्या कलाकारासाठी हिट फंडा ठरतो. म्हटलं ना, सिनेमाच्या जगात कधी काय घडेल हे सांगता येत नाही!

बासू चटर्जी दिग्दर्शित 'प्रियतमा' (१९७८)ने असाच आश्चर्याचा सुखद धक्का दिला! हा पिक्चर येईपर्यंत आशा सचदेव म्हणजे गॉसिप्स मॅगझिनच्या ग्लॉसी पेपरवरील बोल्ड फोटोसेशनने लक्षवेधक असलेली आणि जणू त्याच सवयीनुसार 'डबल क्रॉस' इत्यादी चित्रपटातून दिसणारी. ती अभिनयाच्या वाटेला जाणारी नाही अथवा तिचं आणि

अभिनयाचे फारसं न जमणारं असाच फंडा. 'प्रियतमा' बासुदा स्टाईल खेळकर खोडकर चित्रपट. जितेंद्र, नीतू सिंग, राकेश रोशन यांच्या भूमिका असलेल्या चित्रपटात आशा सचदेव लक्षात राहिली ही केवढी मोठी गोष्ट. गंमत म्हणजे तिने अनेक चित्रपटांतून भूमिका साकारल्यात. लक्षात 'प्रियतमा' राहिला.

विक्रम भट्ट दिग्दर्शित 'गुलाम' (१९९८) त योगायोगानेच रानी मुखर्जी आमिर खानची प्रेमिका झाली आणि 'आती क्या खंडाला..' च्या जबरदस्त क्रेझने स्टार झाली. पूजा भट्ट अगोदर ही भूमिका साकारणार होती. महेश भट्ट दिग्दर्शित 'दिल है के मानता नही' नंतर पुन्हा आमिर व पूजा भट्ट एकत्र आले होते. अशातच पूजा भट्टला वाटले पडद्यावर येणं पुरे झाले, आपण पडद्यामागे राहूयात. निर्माती होऊयात. म्हणून तिने 'गुलाम' व शाहरुख खानसोबतचा 'इंग्लिश बाबू देशी मेम' सोडले. (यात सोनाली बेन्द्रेला संधी मिळालीच, त्यामुळे

ती नृत्यदेखिल शिकली.) आता 'गुलाम' मध्ये कोण? रानी मुखर्जीचे 'राजा की आयेगी बारात' वगैरे दोनेक चित्रपट आले होते. 'तिचा आवाज घोगरा आहे' असं म्हटलं जात होते. एकिकडे हे घडत असतानाच करण जोहरने 'कुछ कुछ होता है' (१९९८) व्दारे दिग्दर्शनात पाऊल टाकले होते. शाहरुख खान, काजोल व आपली मैत्रीण ट्विंकल खन्ना असा प्रेम त्रिकोण नक्की केला. यश जोहर यांच्या धर्मा प्रॉडक्शन्सची निर्मिती म्हणजे हॉट केक! भारीच बजेट. मोठाच तामझाम. एकूणच भारी मामला. तेवढ्यात ट्विंकलने पिक्चर सोडला (आमिर खान, शाहरुख खान यांची नायिका बनण्याचे अनेकींचे स्वप्न असतानाच हे काय? सिनेमाच्या जगात काहीही घडू शकते तसेच हे आहे.) करण जोहरचा शोध सुरु असतानाच एका मनोरंजन चॅनेलवर त्याने 'राजा की आयेगी बारात' पाहिला आणि रानी मुखर्जीत 'स्टार मटेरियल'

जाणवलं. आणि रानीला एकदम 'गुलाम' आणि 'केकेएचएच ' मिळाला!

सिनेमाचे जग एक प्रकारचा सापशिडीचा खेळ. येथे ठरवून काही होत नाही. कोणता चित्रपट सुपर हिट ठरेल आणि कोणती भूमिका भाव खाऊन जाईल हे सांगता येत नाही हीच तर या खेळातील गंमत आहे!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ८२

"कुली" ची बेचाळीशी!
अमिताभचा आजार ते पिक्चरचे यश!

२६ जुलै १९८२ च्या दुपारनंतरची वेळ.

'पीटीआय व यूएनआय या वृत्तसंस्थेने 'न्यूज फ्लॅश' म्हटलं.... 'अमिताभ बच्चनला अपघात!'

मात्र एवढ्यावरुन चित्र स्पष्ट होणे शक्य नव्हतेच. 'बातमीवर लक्ष ठेवणे आवश्यक होते.

मनमोहन देसाई दिग्दर्शित "कुली" चित्रपटाच्या बंगलोर येथील बंगलोर विद्यापीठाच्या ज्ञान भारती कॅम्पसमधील सेटवर मारहाण दृश्यात 'पुनीत इस्सार'चा ठोसा चुकवण्याचा अभिनय करताना स्टीलच्या टेबलाचा

कोपरा अमिताभ बच्चनच्या पोटात लागून तो जखमी झाला आहे, त्याला स्थानिक इस्पितळात दाखल करण्यात आले आहे असा तपशील या वृत्तसंस्थानी दिला! दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात कुठे पहिल्या पानावर तर कुठे आतील पानावर छोटी बातमी आली!

दोन तीन दिवसांत याच बातमीने वेगळे स्वरुप धारण केले. जागाही ठळक मिळू लागली! अमिताभचा अपघाती आजार बळावला असून त्याला मुंबईत आणण्यात येत आहे. मुंबईत त्याच्या उंचीची (आडव्या साईजची) रुग्णवाहिकेसाठी त्याचा सेक्रेटरी शीतल जैन याने शोध घेतला असता गिरगाव डॉ. भडकमकर मार्गावरील शिवसेना शाखा क्रमांक १९ यांच्याकडे ती आहे असे समजलं! याच रुग्णवाहिकेतून अमिताभला दक्षिण मुंबईतील डॉ. भुलाभाई

देसाई मार्गावरील (वॉर्डन रोड) 'ब्रीच कॅण्डी' रुग्णालयात दाखल करण्यात आले.

काही दिवस अमिताभच्या तब्येतीबद्दलची माहिती देणारे इस्पितळाचे मेडिकल बुलेटीन प्रसिद्ध होत राहिले. जया बच्चनसह सगळे कुटुंबिय अमिताभची विचारपूस करायला येत होते.

मुंबईत तेव्हा प्रसिद्ध होत असलेल्या इंग्रजी सायंदैनिकात हे सगळेच पहिल्याच पानावर सविस्तर प्रसिद्ध होत राहिले. हळूहळू चित्रपट रसिकांत अमिताभच्या तब्येतीविषयी चर्चा वाढत गेली!

२ ऑगस्ट १९८२

अमिताभवर अतिशय महत्त्वपूर्ण व अवघड शस्त्रक्रिया! ती यशस्वी व्हावी म्हणून देशभरातील त्याच्या असंख्य चाहत्यांकडून देवळांत , मशिदीत, चर्चमध्ये, गुरुव्दारात पूजा!

या सदिच्छांनी अमिताभचा जणू पुनर्जन्म झाला! ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरल्यावर आता आणखीन काही दिवस त्याला इस्पितळात उपचार घ्यावे लागणार हे स्पष्ट होते!

आता प्रत्येक दिवसासोबत अमिताभच्या आजारावरुन माध्यमातून चर्चा वाढत होती! (तेव्हा मुद्रित माध्यमे होती. दूरदर्शनवर फक्त संध्याकाळी साडेसात वाजता बातम्या असत! महत्वाचे म्हणजे, 'पेपरात आलंय म्हणजे खरं!' अशी सामाजिक विश्वासार्हता होती!) रेखा बुरख्यात येऊन अमिताभला बघून गेली असंही गॉसिप्स रंगले. त्यात आश्चर्य ते काय?

२४ सप्टेंबर १९८२!

अमिताभला इस्पितळातून डिस्चार्ज! महत्वाची बातमी म्हणून आम्ही सिनेपत्रकार व फोटोग्राफर्सची 'ब्रीच कॅण्डी'बाहेर मोठ्याच प्रमाणावर गर्दी. त्यात अमिताभच्या फॅन्सचीही विलक्षण गर्दी! अनेकांच्या चेहऱ्यावर अमिताभ आता कसा आहे वा दिसतोय याची उत्सुकता आणि थोडी चिंतादेखिल! अतिशय महत्वाचा आणि हृद्य क्षण! बराच वेळ वाट पाहिल्यावर बाहेर येत असलेला अमिताभ तब्येतीने हटलेला, चेहरा उतरलेला, नजर हरवलेली असा. काहीं फॅन्सना अजिबात राहवले नाही. काहीजण त्याला बिलगले. गर्दीतून वाट काढत पुढे जात असलेला अमिताभ म्हणाला, 'मै तो चला गया था, आप की दुवाओ से वापस आया...' वातावरणात व्याकुळता, संवेदनशीलता!

एव्हाना देशविदेशात त्याच्या तब्येतीत सकारात्मक सुधारणा व्हावी म्हणून सर्व धर्मात प्रार्थना केली जात होती. सामाजिक, सांस्कृतिक वातावरण ढवळून निघाले होते. चित्रपट व समाज या नात्याचा हा एक वेगळाच पैलू होता. आपल्या देशात चित्रपट खोलवर रुजलाय, अनेकांच्या भावविश्वाचा तो भाग आहे याचाच हा प्रत्यय होता.

काही महिन्यांनी पूर्ण बरा झाल्यावर अमिताभने प्रत्येक रविवारी संध्याकाळी एक तास जुहूच्या आपल्या 'प्रतिक्षा' बंगल्याच्या वरच्या मजल्यावरील खिडकीतून आपल्या चाहत्यांना दर्शन देणे सुरु केले. हळूहळू या 'अमिताभ दर्शना'साठी गर्दी वाढू लागली! देशभरातून 'अमिताभ भक्त' येऊ लागले. अमिताभचा आजार हा जणू देशभरातील महत्वाचा विषय झाला!

'७ जानेवारी १९८३!'

साकी नाकाजवळील चांदिवली स्टुडिओत 'कुली'च्या शूटिंगनेच अमिताभ पुन्हा कॅमेरासमोर येत आपली 'सेकंड इनिंग' सुरु करीत असल्याचे मनमोहन देसाई यांच्या निर्मिती संस्थेकडून आमंत्रण हाती आहे.

ज्या मारहाण दृश्यावर शूटिंग थांबले होते. त्याच दृश्यापासून शूटिंग सुरु होत होते! अतिशय महत्वाचा क्षण असल्याने आम्ही सिनेपत्रकार व फोटोग्राफर्सची भरपूर गर्दी. रति अग्निहोत्रीची विशेष उपस्थिती होती. चित्रपटसृष्टीतील काही मान्यवरही हजर. त्यात उल्लेखनीय नाव दिग्दर्शक प्रकाश मेहरा! त्याचं नि मनमोहन देसाई यांच्यातील सततचे वाद गॉसिप्स मॅगझिनना हुकमी खुराक म्हणून त्याचं येणे महत्वाचे!

दोन तीन चित्रीकरण सत्रात काही महिन्यांनी 'कुली'चे शूटिंग संपले. आनंद बक्षी यांची गीते व लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत असलेली ध्वनिमुद्रिका आणि ध्वनीफित प्रकाशित झाली! अमिताभसाठी पहिल्यांदाच शब्बीरकुमार याचा प्लेबॅक वापरल्याने अमिताभ भक्त नाराज! 'सारी दुनिया का बोझ..' (शब्बीरकुमार) , 'ॲक्सीडंट हो गया..' (आशा भोसले व शब्बीरकुमार), 'लंबूजी लंबूजी..' (शब्बीरकुमार व शैलेंद्रसिंग) ही गाणी अमिताभ कृपेने चक्क लोकप्रिय झाली. लोकप्रिय स्टारची प्रत्येक गोष्ट होतेच!

२ डिसेंबर १९८३

'कुली' प्रदर्शित झाला. (चक्क बेचाळीस वर्षे झाली देखील) आम्हा सिनेसमिक्षकांना पहिल्याच दिवसाची सेकंड शोची 'हाऊसफुल्ल' थेटरात पब्लिकसोबत पिक्चर एन्जॉय करा हेच एक प्रकारे सांगण्यात आले!

सुरुवातीच्या काही स्लाईड्स, मग जाहिरातपट व भारतीय समाचार चित्र संपले. आणि सेन्सॉर सर्टिफिकेटवर दिसले, बावीस रिळे. खच्चून भरलेल्या थिएटरमध्ये अक्षरश: प्रचंड टाळ्या शिट्ट्या! आपण अगोदर प्रेक्षक आहोत मग समीक्षक आहोत याचे भान असल्यानेच मी देखील टाळ्या वाजवून आनंद व्यक्त करतोय हे पाहून शेजारीच बसलेल्या खडूस समीक्षकाने चेहरा विचित्र केला.

पहिल्याच दृश्यापासून मनजींच्या योगायोगाने भरलेला मसालेदार मनोरंजक चित्रपट. हेलिकॉप्टरमधून फिरणारा क्रूरकर्मा खलनायक झफर खान (कादर खान) एका गुन्ह्यात दहा वर्षांची शिक्षा भोगून तुरुंगातून बाहेर येतो तेव्हा त्याला समजते त्याला अतिशय आवडलेल्या सलमाचे (वहिदा रेहमान) अस्लम खानशी (सत्येन कप्पू) लग्न होऊन तिला इक्बाल खान हा मुलगा आहे. तरीही त्याची पाशवी वृत्ती शांत बसत नाही! अस्लम खान कुटुंबाचे व नाथू (निळू फुले) व त्याच्या पत्नीशी (आशालता वाबगावकर) चांगले नाते. ते

महाराष्ट्रीयन! त्यांचा मुलगा अगदी लहान आहे. झफर खान धरणावर काम करत असलेल्या अस्लम खानला ठार मारतो तेव्हा फुटलेल्या धरणातील पाणी गावात शिरुन हाहाकार उडतो! अख्खं गाव वाहून जाते. सलमा त्या पाण्यात वाहून जाताना तिच्या मेंदूला मार बसून तिची स्मृती जाते. नाथूची पत्नी व मुलगा वाहून जातो. नाथूला इक्बाल सापडतो. तर झफर स्मृती गेलेल्या सलमाला घेऊन दुसऱ्या शहरात निघतो. तेव्हा रेल्वे स्टेशनवर पेपर विकणारा इक्बाल तिला ओळखतो. पण ती त्याला अजिबात ओळखत नाही. मध्ये काही वर्ष जातात. इक्बाल मोठा होतो आणि रेल्वे स्टेशनवरचा 'कुली' (अमिताभ बच्चन) बनतो..! कादर खानने लिहिलेल्या या पटकथेत सतत अशीच (धक्कादायक?) वळणे येत जातात. कॅमेरामन पीटर परेरा व संकलक ह्रषिकेश मुखर्जी हे मान्यवर आपली जबाबदारी चोख बजावतात.

इक्बाल व ज्युली डिसोझाचे (रति अग्निहोत्री) व सनी (ऋषि कपूर) व दीपा अय्यंगार (शोमा आनंद) अशी दोन प्रेमप्रकरणे! इक्बाल व सनीची मैत्री. यातच विकी पुरी (सुरेश ओबेरॉय), जॉनी डीकॉस्टा (अमरिश पुरी), ओम पुरी (ओम शिवपुरी....हे नामकरण ग्रेटच), गोगा (गोगा कपूर), दीपाचे वडील (मुकरी), बॉब (पुनीत इस्सार) अशा अनेक व्यक्तिरेखा!

...अशातच इक्बाल खान व बॉब यांच्या मारधाडीचे दृश्य सुरु होताच मनात आपोआपच येते, याच फायटींगच्या वेळेस अमिताभच्या पोटात टेबलाचा कोपरा लागून तो जिवघेण्या आजारातून बचावला. आणि तेवढ्यात तो प्रसंग फ्रीझ होतो! स्लो मोशनमध्ये फायटिंग सुरु होते आणि पडद्यावर येतं, या दृश्याच्या वेळेस अमिताभ जखमी झाला, ते वाचूनच चित्रपटगृहात एक प्रकारची शांतता पसरते आणि ते दृश्य पुन्हा वेगाने दाखवले जाताच अख्ख्या थिएटरमध्ये प्रचंड टाळ्या शिट्ट्यांचा पाऊल पडतो! हे अमिताभवरचे प्रेम असते. अशा पध्दतीने एकादे दृश्य 'फ्रीझ' करणे योग्य आहे का यावर काहींनी प्रश्न निर्माण केला! तोपर्यंत पिक्चर असं काही सुपर हिट झाला की 'अलंकार' थिएटरमध्येच पन्नास आठवड्यांचा खणखणीत मुक्काम केला. अनेक शहरांत पिक्चरने 'ज्युबिली हिट' यश संपादले!

चित्रपटाच्या क्लायमॅक्सला झफर खानच्या बंदूकीच्या गोळीने इक्बालचा मृत्यू होतो असा मूळ पटकथेत असलेला शेवट रसिकांना पटणार नाही असे मानतच तो बदलला गेला!

मनमोहन देसाई आमचे गिरगावकर (मी खोताची वाडीतील, ते खेतवाडीतील, चालत गेलो तरी सहाव्या मिनिटावर त्यांचे प्रताप निवासमधील घर!)

आणि माझ्या आवडत्या दिग्दर्शकांतील एक! म्हणून 'कुली'चं परीक्षण लिहिताना 'मनोरंजनाचा फॅक्टर' महत्वाचा मानला. 'कुली' रिलीज झाल्यावर अमिताभच्या आजाराची गोष्ट हळूहळू मागे पडत गेली तरी त्या आठवणीच्या जखमा आजही कायम आहेत!

मनमोहन देसाई दिग्दर्शित 'गंगा जमुना सरस्वती'च्या सेटवर पुनीत इस्सारच्या मुलाखतीचा योग आला असता त्याचा 'कुली'च्या सेटवर अमिताभच्या पोटात बसलेल्या ठोशाचा विषय निघणे स्वाभाविक होतेच. पुनीत इस्सार मला सांगू लागला, ती गोष्ट घडल्यानंतर बरेच दिवस मी अस्वस्थ होतो. मला काहीच सुचत नव्हते. आणि तसा घाबरतच मी 'ब्रीच कॅण्डी' रुग्णालयात अमितजींना भेटायला गेलो. तेव्हा ते मला म्हणाले, 'यात तुझी काहीच चूक नाही. हे केवळ दुर्दैवाने घडले. चुकून झालंय! त्यात इतकं वाईट वाटून घेऊ नकोस! प्रकाश मेहरा यांच्या राकेशकुमार दिग्दर्शित 'खून



पसिना'च्या एका मारहाण दृश्यात विनोद खन्नाच्या हाताला असाच मार बसला तेव्हाही मी असाच अस्वस्थ झालो होतो.. विनोद खन्नाने तेव्हा माझी अशीच समजूत काढल्यावर मला हलकं वाटलं. तूही तसेच समज.' असे अमिताभ म्हणाल्याचे पुनीत इस्सार मला म्हणाला.

असो! माणूस म्हटला की कमी अधिक दुखणी खुपणी असतातच. त्याला सेलिब्रिटीजही अपवाद नाहीत. पण सगळेच कलाकार आपणही माणूस आहोत हे चलतीच्या काळात लक्षात ठेवतात का हे मात्र सांगता येत नाही...

अमिताभ बच्चनचे आजारपण सामाजिक, सांस्कृतिक, माध्यम क्षेत्र अक्षरश: ढवळून काढणारे. जनसामान्यात अस्वस्थता निर्माण करणारे. म्हणूनच त्याचा 'फ्लॅशबॅक' हा असा, 'कुली'च्या सेटपासून त्याच्या यशापर्यंतचा प्रवास....!

© दिलीप ठाकूर

(राम प्रहर - झूम प्रहर)

लेख क्र. ८३

मल्टिप्लेक्सच्या पडद्यावरचं 'लाईव्ह क्रिकेट'! पैसा वसूल!! आणखी काय!!

सर्वप्रथम ज्याला ही कल्पना सुचली, त्याला माझा कडक सॅल्यूट! आजच्या 'विश्व चषक क्रिकेट' अंतिम सामन्याची तिकिटे ऑनलाईन तिकीट बुक करा आणि मल्टिप्लेक्सच्या भल्या मोठ्या पडद्यावर आजचा क्रिकेट सामना लाईव्ह एन्जॉय करा ही कल्पना नव्हे हा तर 'रियॅलिटी शो' आहे. कदाचित स्टेडियमवरचा उत्स्फुर्त 'फिल गुड' येणार नाही, पण फुल्ल वातानुकूलीत मल्टिप्लेक्स मधील मोठ्या स्क्रीनवर 'हाऊसफुल्ल गर्दी'त प्रत्येक चेंडूवरची घडामोड छान अनुभवता येईल! आणि महत्वाचे म्हणजे आपला

भारतीय क्रिकेट संघ त्यात फेवरेट आहे. तर मग मल्टिप्लेक्सचे महागडे तिकीट बुक करायलाच हवे. तर मग बघुया, नेमक्या कोणत्या मल्टिप्लेक्समध्ये "क्रिकेटचा लाईव्ह शो" आहे ते..!

हा आजचाच 'शो' नाही. देशभरातील अनेक मोठ्या शहरांत यापूर्वीच क्रिकेट आणि फूटबॉलचे सामने 'मल्टिप्लेक्स'च्या पडद्यावर दिसले. कधी तर काही ग्रुप्स एकाच 'शो'ची शे दोनशे तिकीटे काढून मल्टिप्लेक्समध्ये मॅच पाहताना धमाल करतात! आजचं क्रिकेट शास्त्रशुद्ध नाही, त्याची गरज वाटत नाही. ते कोणत्याही चौकटीत मावणारं नाही, तर्काच्या कसोटीवर पाह्यचं नाही, हवेत फटके मारणे, स्टेडियममध्ये चेंडू पोहचवणे, हवेतच झेल पकडणे यांचं आहे. 'आजच सामना, आजचं निकाल' हे तर एकदिवसीय क्रिकेट आणि ट्वेन्टी-ट्वेंन्टी क्रिकेट यांचे वैशिष्ट्य आहे! आजच्या ग्लोबल युगातील तरुणाईला हेच हवे आणि ते जर

घराबाहेर पडून सोसायटीचं मैदान, गार्डन, गच्ची, मग क्लब, पब, रेस्टॉरंट, रिसॉर्ट, फार्म हाऊस, असं करता करता 'मल्टिप्लेक्स'च्या पडद्यावरही आले आहे, रंगत आहे तर पाहूयात की डोळे भरभरुन. पडदा जेवढा मोठा तेवढा 'सामन्यांत रस' मोठा. बरं, दोन्हीत स्टार! सेलिब्रिटीज! जगभरातील क्रिकेटच्या मैदानावरचे स्टार सिनेमाच्या पडद्यावर पाहण्यात वेगळीच रंगत! आता सिनेमाच्या पडद्यावरचे क्रिकेट असं म्हटलं रे म्हटलं की आमिर खान निर्मित व आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान' (२००१) ची अर्थात भुवनच्या (आमिर खान) ग्रामीण संघाची आठवण यायलाच हवी. एकिकडे तो पिरिऑडिकल सिनेमा असतानाच दुसरीकडे त्यात देशभक्तीची भावनाही जागवली! आणि दोन्हीला क्रिकेटने छान जोडलय. कथा, पटकथा, संवाद यावरची मेहनत सिनेमाभर दिसते. पडद्यावरच्या फिल्मी क्रिकेटपासून (देव आनंदने आपल्या

दिग्दर्शनातील 'अव्वल नंबर' या चित्रपटात क्रिकेटच साकारलय आणि त्यात आमिर खानही होता! अर्थात, हीरो देव आनंदच! ब्रेबॉर्न स्टेडियमच्या मैदानावरच्या या पिक्चरच्या सेटवर आम्हा सिनेपत्रकारांना देव आनंदने नेहमीच्या उत्साहाने शूटिंग रिपोर्टींगसाठी बोलावले असता आमिर खानला क्रिकेटची समज जास्त असल्याचे जाणवले. देव आनंद नेहमी प्रमाणेच आपल्याच प्रेमात.) क्रिकेटपटूवरचा चरित्रपट ('धोनी द अनटोल्ड स्टोरी' अप्रतिम प्रभावी हाताळणीने खिळवून ठेवतो! महत्वाचे म्हणजे, रांचीसारख्या छोट्या शहरातून येऊनही मेहनत आणि निष्ठेने यशस्वी क्रिकेटर तसेच भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार होता येते अशी जबरदस्त प्रेरणादायी अशी रियल स्टोरी यात आहे! 'धोनी कसा घडला' ही एक जबरदस्त अशी आदर्श कथा! म्हणूनच पिक्चर पहिल्याच दृश्यापासून पकड घेतो. तेच तर महत्वाचे असते!) अशी उदाहरणे बरीच. 'लव्ह

मॅरेज' चित्रपटात देव आनंदच्या 'एक नजर मे दिल बेचारा हो गया एलबीडब्ल्यू..' या गाण्यापासून विजयसिंह पटवर्धन दिग्दर्शित 'कभी अजनबी थे' मध्ये संदीप पाटील तर 'सावली प्रेमाची' मध्ये सुनील गावसकर अभिनयाचा प्रयत्न करण्यापर्यंत सिनेमाच्या पडद्यावरचे क्रिकेट बरेच! अनेकदा पिक्चर फ्लॉप झालाय ते जाऊ देत! कदाचित तुम्हाला 'व्हीक्टरी स्टोरी' नावाचा क्रिकेटवरचा चित्रपट माहित नसावा. आपण १९७२-७३ साली इंग्लंड संघावर भारतात २-१ असा विजय मिळवला त्यावर चक्क चित्रपट आला होता! याची चित्रपटाचे असो की क्रिकेटचे किडे गुगलवर शोध घेत असतील. पण हा चित्रपट म्हणजे फिल्मी पटकथा नव्हती. टोनी लुईसच्या नेतृत्वाखाली इंग्लिश क्रिकेट संघ आपल्याकडे पाच कसोटी सामने खेळण्यासाठी आला होता (तोपर्यंत मर्यादित षटकांचे सामने हा प्रकार नव्हता, २०\२० तर बहोत दूरची बात! त्याची साधी कल्पनाही करता येत

नव्हती. शास्त्रशुद्ध क्रिकेट, जमिनीवरचे क्रिकेट म्हणजे कौतुकाची गोष्ट.) विशेष म्हणजे, तोपर्यंत टोनी लुईस एकही कसोटी सामना खेळला नव्हता. पण इंग्लंडमधील कौंटी क्रिकेट सामन्यातील त्याच्या कल्पक नेतृत्वामुळे त्याच्याकडे देशाचे नेतृत्व सोपवले होते. हा संघ आपल्याकडे येण्यापूर्वी आपल्या देशात अक्षरशः प्रचंड क्रिकेट फिव्हर होता. ते दिवसच वेगळे होते. आपणच जिंकणार असेच एकूण सामाजिक नि खेळकर वातावरण होते. याचे कारण म्हणजे १९७१ साली आपण अजित वाडेकर यांच्या नवीन नेतृत्वाखाली वेस्ट इंडिजमध्ये जाऊन गारफिल्ड सोबर्सच्या नेतृत्वाखालील विंडिज संघाला १-० असे तर लगेचच काही महिन्यांनी अजित वाडेकर यांच्याच नेतृत्वाखाली रे इलिंगवर्थच्या खडूस इंग्लड संघाला इंग्लंडमध्ये जाऊन १-० असे पराभूत केले होते. सगळं कसं अभूतपूर्व होते. सगळीकडे क्रिकेट फिव्हर वाढला होता. मला आजही

आठवतेय ते माझे शालेय जीवनातील दिवस होते आणि श्रीगणेश चतुदर्शीच्या दिवशी ओव्हलवर आपण इंग्लंड संघाला एकेक धक्के देत पराभूत केले होते. रस्तोरस्ती हार घातलेले धावफलक लागले होते. गुगली गोलंदाज भागवत चंद्रशेखरने इंग्लिश फलंदाजांना हैराण केले होते आणि एकनाथ सोलकरने फॉरवर्ड शॉर्टलेगला उभे राहून सूर मारत झेल पकडले होते. वृत्तपत्रातील त्या क्षणाचा फोटो मी सुद्धा कापून ठेवला होता. त्यालाच 'पेपर कटींग' म्हणतात हे हेच, हे कालांतराने समजले.

या विजयी संघाची तेव्हा मुंबईत विमानतळ ते ब्रेबॉर्न स्टेडियम अशी उघड्या जीपमधून फेरी मारली होती. अशा एकेक सकारात्मक गोष्टीनी देशभरात क्रिकेटप्रेमाची प्रचंड उसळलेली लाट नेमकी कधी फुटली माहित्येय? टोनी लुईसच्या संघाने नवी दिल्लीतील पहिला कसोटी सामना जिंकला आणि सगळेच हादरले. सगळीकडे आपल्या

संघाविरुध्द वातावरण निर्माण झाले. खूप संवेदनशील गोष्ट झाली होती. हा पराभव अनपेक्षित होता पण इंग्लंडचा संघ व्यावसायिक, धोरणी नि धूर्त होता. पूर्ण आत्मविश्वासाने ते वावरु लागले. पण पुढील दोन सामने मात्र (कोलकत्ता आणि चेन्नईतील, तेव्हाचे कलकत्ता आणि मद्रास) आपल्या संघाने जिंकले आणि पुन्हा सगळीकडे क्रिकेट 'क्रेझ' निर्माण झाली. वक्त बदल गया! रागाची जागा प्रेमाने घेतलीही. त्या काळात पाच पैशाला मिळत असलेल्या एका चॉकलेटमध्ये या दोन संघातील खेळाडूंची छोट्या आकाराची छायाचित्रे मिळत. तर एका सिगारेट कंपनीने दोन रिकामी पाकिटे पाठवा आणि आवडत्या क्रिकेटपटूंचे फोटो पोस्टाने मिळवा अशी काढलेली टूम यशस्वी ठरली. मी सुद्धा सुनील गावसकर व गुंडाप्पा विश्वनाथ यांचे फोटो मिळवले. पोस्टाने आलेले हे फोटो आमच्या गिरगावातील खोताची वाडीत जो जो भेटेल त्याला दाखवले. केवढा आनंद होता हो त्यात! २-१ अशा

स्थितीतील या रंगतदार मालिकेत आता उर्वरित दोन सामन्यात काय होतेय याकडे सगळ्यांचे लक्ष होते. कानपूरचा चौथा कसोटी सामना अनिर्णित राहिला आणि मग मुंबईतील पाचवा कसोटी सामनाही अनिर्णित राहिला तरी तो दोन गोष्टींसाठी कायमचा लक्षात राहिला. एक म्हणजे, ब्रेबॉर्न स्टेडियमवर तेव्हा मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त होता. तेव्हा मुंबई पोलिसांचा निळा ड्रेस असे. मैदानात सीमारेषेबाहेरही खूप पोलीस होते. अशातच इंग्लंडचा क्रिकेटर पॅट पोकॉकने एका पोलिसाची टोपी घालून हाती दंडूका घेतला याचा फोटो वृत्तपत्रात पहिल्या पानावर आला. आणि गाजला. तोही कापून वहीत चिकटवून ठेवला. त्या काळात दर मध्यमवर्गीय कुटुंबातील चौथ्या घरातील मुलाकडे अशी 'वृत्तपत्रातील कटींग चिकटवण्याची वही हमखास असे'. दुसरी आठवण म्हणजे, २ ऑक्टोबर १९७२ रोजी मुंबईत 'दूरदर्शन' हे नवीन माध्यम सुरु झाले आणि

लगेचच १९७३ च्या जानेवारीत मुंबईत असलेल्या कसोटी सामन्याचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. आपण घरबसल्या दूरचित्रवाणीवर पाहिलेला हा पहिला कसोटी क्रिकेट सामना आहे. याचीही पन्नास वर्षे झाली देखील! यातील तांत्रिक प्रगती अफलातून. सुरुवातीच्या अनेक वर्षांत एकाच ॲन्गलने क्रिकेट दाखवले जाई यापासून आज स्टम्प्समध्ये माईक मैदानावरील बोलणं आपल्यापर्यंत पोहचेपर्यंत अनेक बदल होत गेले. कधी काळी वेस्ट इंडिजमधील क्रिकेट सामन्याचे समालोचन ऐकण्यास अडथळे येत, आता घरबसल्या जगभरातील सगळ्याच क्रिकेट मैदानावरचं क्रिकेट पाह्यला मिळतेय. पूर्वी ॲक्शन रिप्लेची कल्पनाच केली जात नसे, आता मैदानावरच्या पंचाकडे एकाद्या निर्णयावर तिसऱ्या पंचाकडे दाद जबरदस्त प्रेरणादायी अशी रियल स्टोरी यात आहे. क्रिकेट प्रक्षेपणाची पन्नास वर्ष बहुस्तरीय प्रगतीची. देशाच्या कानाकोपऱ्यात क्रिकेट पोहोचवणारी. फार पूर्वी

ग्रामीण भागात एका घरात अथवा शाळेत वा ग्रामपंचायतीत असलेल्या दूरचित्रवाणीवर क्रिकेट सामना पाह्यला गाव जमे..समूहाने दूरचित्रवाणी पाहणे हा देखील एक वेगळाच अनुभव. त्यात आपण क्रिकेटमध्ये जिंकलो तर लाकडाची बॅट करुन माळरानावर खेळ रंगलाच समजा!

आता यात 'व्हीक्टरी स्टोरी' नावाचा चित्रपट तो कुठे आणि कसा आला असा तुमचा गुगली प्रश्न असेलच. त्या काळात फिल्म डिव्हिजनच्या वतीने प्रत्येक कसोटी क्रिकेट सामन्याच्या काही भागांचे चित्रीकरण होई (आणि भारतीय समाचार चित्रमध्ये ते पाह्यला मिळे!) तर १९७२-७३ सालापर्यंत दिल्ली शहरात दूरदर्शनने जम बसवला होताच. तर फिल्म डिव्हिजनच्या शूटिंगमधील भारत विरुद्ध इंग्लंड पाचही कसोटी सामन्यांची क्षणचित्रं एकत्र करून चक्क अडिच तासांचा 'व्हीक्टरी स्टोरी' नावाचा चित्रपट पडद्यावर आला. फिल्म डिव्हिजनचीच ही निर्मिती होती. क्रिकेट

समालोचक राजू भारतन यांनी या चित्रपटाची पटकथा लिहिली. नुसतेच हा आऊट झाला, मग त्याने चौकार मारला अशाने रंगत कशी येईल? ते म्हणजे क्षणचित्र दाखवल्यासारखे. नाव.. 'हायलाईट्स'! त्यापेक्षा स्क्रिप्ट लिहून रंगत आणणे उत्तमच. चित्रपट माध्यमातील ती गरज. पटकथा व संकलन माध्यमात महत्वाचे. विजय राघव राव यांचे संगीत आहे व विष्णु एंटरप्रायझेसच्या वतीने हा चित्रपट रिलीज झाला, तो देखील चक्क नाझ थिएटरमध्ये आणि त्याला क्रिकेटवेड्या चित्रपट रसिकांचा उत्तम प्रतिसादही मिळाला. एकदा मिळालेला विजय सगळीकडे विजयच असतो. आज जबरदस्त तांत्रिक प्रगती झाली असून ऑनलाईन संकलन करीत 'यू-ट्यूब' चॅनलसाठी कसोटी, वन डे आणि ट्वेंन्टी ट्न्वेन्टी सामन्यांची 'व्हीक्टरी स्टोरी' क्रिएट करता येईल. एकाद्या मालिकेतील दारुण पराभवानंतरही आणि नवीन खेळाडूंना विश्वासात घेत बाजी पलटवता येते

असा एक जबरदस्त सकारात्मक दृष्टिकोन देता येईल. वर्षभरात आपला क्रिकेट संघ सतत कुठे ना कुठे खेळत असतोच. तेवढं व्यापक कव्हरेज मिळतेय. क्रिकेटदेखील आपल्या आयुष्यातील अनेक लहान मोठ्या गोष्टीना काही सपोर्ट सिस्टीमचे ऑक्सिजन देत असते, त्या दृष्टीनेही पाह्यची गरज आहे! 'व्हीक्टरी स्टोरी' नंतर त्याच पठडीतील चित्रपट होता 'स्पीन वर्सेस स्पेस' (१९७५). आपल्या देशात

क्लाईव्ह लॉईडच्या नेतृत्वाखाली १९७४/७५ या काळात पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी वेस्ट इंडिजचा संघ आला असता मन्सूर अली खान पतौडीच्या नेतृत्वाखाली आपण ती मालिका २-३ अशी चक्क हरलो. पण या मालिकेत 'टर्न ॲण्ड ट्वीस्ट' भारी होते. चढउतार होते. रंगत होती! पहिल्या दोन सामन्यात आपला पराभव झाला आणि मग आपण यशस्वी कमबॅक करीत पुढचे दोन सामने जिंकले. आता वानखेडे स्टेडियमवर (तेथील हा पहिला कसोटी

क्रिकेट सामना) सहा दिवसांची कसोटी होती. एक दिवस सुट्टीचा! आठवड्याची क्रिकेटची जत्रा. घरात, कट्ट्यावर, नाक्यावर, लोकल ट्रेनमध्ये, ऑफिस मध्ये त्या काळात क्रिकेटवर बोलावे, सांगावे, ऐकावे तेवढे थोडेच होते. या सामन्यात पराभव झाला तरी क्रिकेटमय जल्लोषावरच्या 'स्पीन वर्सेस स्पेस' या चित्रपटाला गर्दी होण्यास फायदा झाला. चित्रपटासाठी असेही 'मटेरियल' उपयुक्त ठरले म्हणायचे. चित्रपटाच्या पडद्यावरचे क्रिकेट केव्हाच आवडीने पाहिले गेलेले. १९७४च्या मध्यास आपल्या क्रिकेट संघाला अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली माईक डेनिसच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाकडून इंग्लंडमध्ये ३-० असा पराभव पत्करावा लागला त्यात एकदा आपला सगळा संघ ४२ धावांत बाद झाला. हा पराभव फारच गाजला. एक प्रकारची जखमच ती! कधी जिंकणे , कधी हरणे हा तर खेळाचाच भाग. त्याकडे खिलाडूवृत्तीनेच पाह्यला हवे.

'मल्टिप्लेक्स'चा पडदा फक्त पिक्चरचं दाखवतो असं नव्हे तर क्रिकेट, फूटबॉल यांच्या सामन्यांचाही लाईव्ह अनुभव देतोय. कधी तो एकाद्या चित्रपटापेक्षा भारीही असतो. चौकार, षटकारांची जबरदस्त आतषबाजी असते. थरारक झेल असतात. अफलातून फॉलो थ्रू असतो. आणि प्रत्येक क्षणाचा ॲक्शन रिप्ले. तर मग 'पैसा वसूल" मनोरंजनाला हवं तरी काय? पिक्चर व क्रिकेट आपल्या देशातील दूरदूरपर्यंच्या जनसामान्यांपर्यंत पोहचलेल्या, अतिशय आवडणाऱ्या जिव्हाळ्याच्या गोष्टी. आपली सुख, दुःख, तणाव विसरुन टाकण्याची जणू हमी. त्यांची 'रुपेरी पडद्यावर केमिस्ट्री' जमली तर हवीच आहे! व त्यात विश्व चषक क्रिकेट अंतिम सामन्यात भारतीय संघ फेवरेट असेल तर मल्टिप्लेक्समधील शो हाऊसफुल्ल! एन्जॉय !!!!??

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)

लेख क्र. ८४

पिक्चरमधल्या गाण्यावर कुठेही नाचो.....

गावेसे वाटलं तर निदान गुणगुणावे... बाथरुम सिंगर हुकमी जागा! नाचावेसे वाटले तर निदान टेबलावर वाजवावे... तक्षणी आणि जेथे कुठे असेल तेथे नाचावे. त्याला कसलेही वयाचे/ संधीचे/ सहवासाचे बंधन नाही. अगदी 'नाटू नाटू' ('नाचो नाचो'!) वरही नाचावेसे वाटले तर नाचावे. बरं, 'आर.आर. आर.' चा नृत्य तडका 'ऑस्कर' पुरस्कार विजेता असल्याने आपल्या आजूबाजूच्या वाढदिवसानिमित्तच्या पार्टीपासून अगदी मराठी मनोरंजन उद्योगांच्या ग्लॅमरस

इव्हेन्टसमध्येही 'नाटू नाटू'वर सिध्दार्थ (जाधव) आणि सिध्दार्थ (चांदेकर) अथवा आणखीन कोणीही (अगदी अमृता आणि सोनालीही चालेल. भारी टीआरपीची हमी!) नाचलेत तर आश्चर्य नाही. 'जो हिट है, वो फिट्ट है!' याच चालीनुसार की काय, सुनील गावसकरने 'नाटू नाटू'वर झक्कास डान्स करताना इरफान पठाणलाही दोन स्टेप्स घ्यायला लावल्या. 'यू-ट्यूब'वर या रिलला भारी लाईक्स मिळताहेत. सुनील गावस्करला राहावले नाही हेच केवढे विशेष!

गीत संगीत व नृत्य ही फ्री-लान्सिंग गोष्ट आहे. जेव्हा असं कोणी अचानक नाचते तेव्हा ती बातमी होती. अशाच काही माझ्या आठवणीतील 'सेलिब्रिटीजच्या नृत्याच्या गोष्टी.'

भारतीय क्रिकेट संघाने १९८३ साली इंग्लंडच्या 'लॉर्डस' मैदानावर बलाढ्य वेस्ट इंडिज संघाचा पराभव करुन अनपेक्षितपणे एक दिवसीय क्रिकेट सामन्यात पहिल्यांदाच आपल्या क्रिकेट संघाने 'विश्वचषक' जिंकला

आणि आपल्या देशात एकच जल्लोष सुरु झाला. भारतीय वेळेनुसार हा सामना रात्री अकरा वाजता संपला. मुंबईत तर रात्रभर मिरवणुकीत अनेक क्रिकेट प्रेमी नाचत असतानाच राज कपूर एका फिल्मी पार्टीवरुन चेंबूर परिसरातील आपल्या कॉकॉटेजमध्ये निघाला असता याच धमाल मिरवणुकीत त्याची गाडी अडकली. पण तो राज कपूर होता. तो याचे दु:ख करीत गाडीतच बसला नाही, तोही गाडीतून उतरून नाचू लागला. त्या काळात मोबाईल असते तर हा 'रेकॉर्ड ब्रेक व्हयूअर्स' मिळवणारा व्हिडिओ ठरला असता. तो वृत्तपत्रांचा काळ होता आणि मुंबईतील काही वृत्तपत्रात ही पहिल्याच पानावरची चौकटीची बातमी ठरली. गोष्टच तशी होती हो. आजूबाजूच्या सकारात्मक वातावरणाचा प्रभाव म्हणतात तो हाच. ('83' हा चित्रपट नक्की पहा!)

अमिताभ बच्चनने अनेक वर्षांपूर्वी जगभरातील अनेक देशांत स्टेज शोचा असा काही धडाका अथवा तडका लावला

की थट्टेत असे म्हटलं जाऊ लागले की, अमिताभ आपल्या शोसाठी जगाच्या नकाशावर नवीन देश शोधतोय! (त्या काळात त्याला 'एबी' म्हणत. अशी त्याची नामकरणे हा वेगळाच विषय.) याच शोचा शेवट अथवा क्लायमॅक्स भारी गाजला. एबीसोबत आणखीन काही स्टार, गायक, डान्सर असा बराच मोठा लवाजमा टूरवर जाई! त्यामुळे तर रंग भरत चाललेल्या शोच्या शेवटी काय हा प्रश्न महत्वाचा होता. एबी याबाबत सकारात्मक दृष्टिकोन बाळगणारा आणि अतिशय व्यावसायिक! अगदी शेवटी होते, प्रकाश मेहरा निर्मित व दिग्दर्शित 'लावारीस' मधील 'मेरे अंगने में....' त्याने स्वतःच गायलेले आणि त्याने जाडा/ उंच/बुटका अशी रुपेरी पडद्यावर विविध रुपे घेतलेले हे गाणे वादग्रस्त ठरले त्याहीपेक्षाही सुपर हिट ठरले..! आता काही देशांतील 'शो'च्या शेवटी 'एबी' हे गाणे गात असतानाच 'जिसकी बीवी छोटी उसका भी बडा नाम है..' असे गात असतानाच जया

बच्चन यांची स्टेजवर 'एन्ट्री' होई आणि स्टेडियमभर हाऊसफुल्ल पॅक ऑडियन्स अतिशय उत्फूर्त टाळ्या, शिट्ट्यांनी वातावरण दणाणून सोडलं. आणि काहीजण उभ्या जागी नाचत! तात्कालिक फिल्मी गॉसिप्स मॅगझिनमधून यावर केवढं तरी रंगवून खुलवून लिहिलं गेले आहे! 'नृत्य' ही एक भारी गोष्ट आहे. आणि त्यातूनच अशा गोष्टी घडतात!

लक्ष्मीकांत बेर्डेची अशीच एक खासियत सांगतो. तो मूळचा आमचा गिरगावकर! सण संस्कृतीत भरपूर रस घेणारा. एकदा गप्पांच्या ओघात त्याने मला चांगली आठवण सांगितली! अभिनयाच्या क्षेत्रात येण्यापूर्वी तो गिरगावातील अनंत चतुर्दशीची श्रीगणेश विसर्जनाची मिरवणूक भारी एन्जॉय करायचा. तो मला म्हणाला, या दिवशीचा 'कच्छी बाजा' म्हणजे अतिशय धमाल! नाचायला भरपूर वाव! मी प्रार्थना समाजजवळ येऊन चांगला ढोल-ताशा असेल त्या मिरवणुकीत शिरायचो आणि मस्त नाचत नाचत ऑपेरा

हाऊसपर्यंत जायचो! तेथून पुन्हा मागे यायचो आणि पुन्हा प्रार्थना समाज ते ऑपेरा हाऊस असे नाचायचो! असे अनेकदा करायचो. ते दिवस आजही आठवतात, लक्ष्मीकांत बेर्डे अतिशय रंगवून खुलवून सांगायचा!

प्रदीप पटवर्धन सुद्धा गोकुळाष्टमीच्या गोपालकालात आमच्या गिरगावातील झावबा वाडीत मनसोक्त, मनमुराद नाचायचा! आपल्या नृत्याचा तो झक्कास आनंद घ्यायचा म्हणूनच ते इतरांनाही आवडे. अहो, अनेक जण थांबून प्रदीप पटवर्धनचे गोविंदा नृत्य पाहत! त्यासाठी त्याचे 'फॅन्स' होते. नृत्य असे कोणत्याही प्रकारचे आणि कुठेही असू देत, त्याचा रंग असा सर्वत्र, जबरदस्त जाणवणारा! फार पूर्वीचा 'सिनेमाचा प्रेक्षक' पडद्यावर गाणे सुरु होताच आपल्या जागेवरुन उठून पडद्यासमोर नाचत. मा. भगवान अभिनित व दिग्दर्शित 'अलबेला' (१९५१) मधील 'भोली सुरत दिल के खोटे..' गाणे सुरु होताच मा. भगवानदादा आणि गीता

बालीसोबत दक्षिण मुंबईतील इंपिरियल थिएटरमध्ये असे नाचकाम घडल्याचा 'फ्लॅशबॅक' आजही सांगितला जातोय आणि...

यापुढेही तो सांगितला जाईल! गीतकार राजेंद्र कृष्णचे बोल आणि सी. रामचंद्र यांच्या 'कॅची' संगीताची ती जादू! आपल्या देशातील चित्रपट रसिकांची संस्कृती अशीच भन्नाट आहे. त्या काळात अनेक चित्रपटांच्या सुपर हिट गाण्यांच्या नशिबी असे रसिकांचे प्रेम आले. कालांतराने 'झी' स्टुडिओजच्या नागराज मंजुळे दिग्दर्शित 'सैराट' (२०१७) च्या 'झिंग झिंग झिंगाट..' या गाण्याच्या

वेळीही तशीच धमाल पब्लिकने एन्जॉय केली. त्यातील एक तुम्हीही नक्कीच असालच! एव्हाना चित्रपटगृहांची संस्कृती बदललेली, हायफाय मल्टीप्लेक्स कल्चर रुजलेले. जेथे एखाद्या आवडत्या हीरोच्या एन्ट्रीला टाळ्या मारल्या जात नाहीत (पूर्वी वाजत हो, मीही मारल्यात!) तेथे पडद्यावरच्या गाण्याला फॉलो करत समोरच नाचायचे ही तर सांस्कृतिक क्रांतीच! पण गीत संगीत व नृत्यात काही भारी असेल तर स्वतःला कसे रोखणार? आपल्याकडे चित्रपट एन्जॉय करणे म्हणजे एक प्रकारचा जणू सणच असतो आणि जेव्हा तो

पिक्चर, त्याची गाणी आवडली की, मग स्वतःला विसरुन 'सण'सणीत रिस्पॉन्स!

नृत्याची ही गोष्ट पडद्यावरुन अशी अनेक रंग बदलत बदलत छान पुढे चाललीय. 'नाटू नाटू' हे त्यातलं लक्षवेधक 'पुढचं पाऊल!'

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ८५

'पब्लिक बोललं, पिक्चर आवडलं नाही! शो खतम!' पण पिक्चर हाऊसफुल्ल गर्दीत कधी चालतं?

तिकिट काढून आलेल्या पब्लिकला ते भारी आवडलं की. आणि एकदा का पब्लिकने पिक्चर डोक्यात व डोक्यावर घेतलं की फर्स्ट रनला ते जोरात चालतंच! पुढील पिढीत त्या यशाच्या गोष्टी जात असतात..! आणि एकदा का पब्लिकने ठरवलं, कुछ दम नहीं, बोअर करती है! की त्या पिक्चरची गर्दी अचानक गायब होते! अनेक वर्षे

सुरु असलेला हा खेळ आहे!

"सुपर डुपर हिट्स" (भाग ५)♥© दिलीप ठाकूर

ओम राऊत दिग्दर्शित 'आदिपुरुष' चे अपयश चहुबाजूने गाजतेय! पिक्चरचा पहिला शो सुरु असतानाच तो पाहता पाहताच सोशल मिडियात प्रतिकूल मते अशी आणि इतक्या वेगाने सुरु झाली की, पिक्चर न पाहणारेही व्यक्त होताहेत की काय वाटू लागले...

'आदिपुरुष' पडद्यावर आल्या आल्याच दाणकन पडला. सुरुवातीला हा पिक्चर पडल्याचा मोठा आवाज झाला, नंतर मात्र हा इतका व असा शांत झाला की तो मल्टीप्लेक्समध्ये सुरु आहे की नाही असा प्रश्न पडावा. जणू काही हा चित्रपट प्रदर्शित झालेल्या मल्टीप्लेक्सच्या आसपासही फिरकू नये असाच प्रेक्षकांनी निश्चय केला होता.

'पिक्चर पडण्याच्या गोष्टी नवीन नाहीत!' वर्षानुवर्षे मोठमोठे चित्रपट आडवे होताहेत. मुळात प्रत्येक चित्रपट 'सुपर हिट' होईलच अशी आशा बाळगणेही योग्य नाही, याचं महत्वाचे कारण म्हणजे कोणत्याही निर्मिती संस्था,

निर्माते, दिग्दर्शक आणि स्टार यांचे सगळेच चित्रपट दर्जेदार असूच शकत नाही. ते शक्यही नाही! पिक्चर हमखास हिट होण्याची जडीबुटी नाही. काही चित्रपटांची थीम चांगली असते पण पटकथा फसते. हे दोन्ही जमले तर स्टारचा 'पडता काळ' असतो. तीनही गुण जमले तर चित्रपट प्रदर्शित होण्याची वेळ चुकीची असते. कधी सगळे जमते पण चित्रपटाचा निर्मिती खर्च भरमसाठ असतो.

'ट्यूबलाईट', 'ठग्ज ऑफ हिन्दुस्तान', 'झीरो', 'कलंक', 'लालसिंग चड्ढा' या सुपर फ्लॉप्स चित्रपटांपासून आपली चित्रपटसृष्टी खरंच काही शिकेल असे नाही. या चित्रपटातून झालेले नुकसान पुढील चित्रपटातून कसे भरुन काढता येईल याचा हिशोब मात्र होईल. याचे कारण आता चित्रपटाच्या गुणवत्तेत निर्मिती खर्च आणि किती कोटीची कमाई हेच घटक महत्वाचे झालेत. मोठ्या चित्रपटाच्या अपयशातील नुकसान छोट्या चित्रपटांच्या यशातून वसूल

करण्याची व्यावसायिक खेळी केली जाते. हे पूर्वापार घडतेय! निर्माता आणि दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांनी दिलीपकुमारची दुहेरी भूमिका असलेला 'दास्तान' (१९७२) फ्लॉप होताच 'धुंद' (१९७३) या तुलनेत छोट्या चित्रपटाची निर्मिती केली. त्यापाठोपाठ दिग्दर्शक बासू चटर्जी यांना संधी देताच बासूदानी 'छोटीसी बात' (१९७५) हा चित्रपट निर्माण केला!

या चित्रपटांना यश लाभल्याने बी. आर. फिल्मचे बॅनर सावरले. गुरुदत्त दिग्दर्शित आणि अभिनित 'कागज के फूल' (१९६४) अपयशाने चित्रपट रसिक हळहळले. याचे कारण म्हणजे तो एका कसदार कलाकृतीचा पराभव होता. आजही

या चित्रपटाची दखल घेतली जाते हा या चित्रपटाचा विजय आहे.

राज कपूर दिग्दर्शित 'मेरा नाम जोकर' (१९७०) पडला की पाडला याचीही बरीच चर्चा झाली आणि सगळी सहानूभूती राज कपूरकडे गेली. दोन मध्यंतरने पडद्यावर आलेल्या जोकरची लांबी कमी करुन तो एका मध्यंतरचा करण्यात आला, पण तोपर्यंत चित्रपट फ्लॉप म्हणून गणला गेला. या चित्रपटांची गाणी सर्वकालीन हिट असल्याने हे चित्रपट रिपिट रन (म्हणजे काही वर्षांनी पुन्हा रिलीज), मॅटीनी शो यांना आल्यावर त्यांना रसिकांची दाद मिळाली. पहिल्या रनला अपयशी ठरलेल्या चित्रपटाची रिपिट रनला पुन्हा जाहिरात करावी लागत नसली तरी आता आर्थिक यशाची गती मंदावलेली असते. रणधीर कपूरने एका मुलाखतीत 'जोकर'वर भाष्य करताना म्हटलं, हा चित्रपट आर. के. फिल्मचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे.

(याचाच अर्थ, रिपिट रनला 'जोकर'ला उत्तम प्रतिसाद मिळाला.) निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता ओ. पी. रल्हन याच्या 'तलाश' (१९७१) अपयशाची गोष्टच वेगळी. 'एक कोटीचा चित्रपट' अशी याची जोरदार शोरदार पूर्वप्रसिध्दी झाली. पन्नास बावन्न वर्षांपूर्वी एक कोटी रुपये ही अक्षरशः प्रचंड मोठी रक्कम होती. पण हा चित्रपट पडद्यावर आल्या आल्या दाणकन पडला आणि राजेंद्रकुमारचा ज्युबिलीकुमारचा काळ मागे पडत गेला. काही मोठे चित्रपट आडवे होताना असेही काही घडले. रसिकांनी या चित्रपटावर कॉमेन्ट्स करताना म्हटले, रल्हनची 'ॲश'.... राख!! या चित्रपटाचे सचीन देव बर्मनचे संगीत श्रवणीय होते. 'दास्तान', 'तलाश' आणि आत्माराम दिग्दर्शित 'ये गुलिस्ता हमारा' देव आनंद हीरो) हे तीनही चित्रपट फ्लॉप ठरले तरी शर्मिला टागोरची मात्र दिलीपकुमार, राजेंद्रकुमार आणि देव आनंद अशा तीनही बड्या हिरोंची नायिका होण्याचे स्वप्न पूर्ण झाले.

फ्लॉप चित्रपटही कोणाला तरी कसली तरी खुशी देत असतोच! मोठ्ठे चित्रपट अपयशी ठरताना अवतीभवती अनेक गोष्टी घडतात. असित सेन दिग्दर्शित 'बैराग' (१९७६) मध्ये दिलीपकुमारची तिहेरी भूमिका होती! या अभिनय सम्राटाच्या दर्जाला साजेशा हा चित्रपट नव्हता. दिलीपकुमार पडद्यापेक्षाही मोठा झाला असे म्हटले गेले. 'बैराग'च्या अपयशाने दिलीपकुमारची नायक म्हणून सद्दी संपली! लीना चंदावरकरला दिलीपकुमारची नायिका बनण्याची छान संधी मिळाली. हा झाला तिचा व्यक्तिगत आनंद. पण या दोघांतील वयातील अंतर पडदाभर दिसले आणि हंसे झाले त्याचे काय? 'दिल दिया दर्द लिया', 'लीडर', 'आदमी', 'संघर्ष' या चित्रपटांच्या अपयशानेच दिलीपकुमारची घसरण सुरु झाली! मोठ्या स्टार्सचा मोठा चित्रपट अपयशी ठरणे मोठीच बातमी असते. हिट पिक्चरपेक्षा फ्लॉप पिक्चर कलरफुल गोष्टी जन्माला घालतो.

निर्माता आणि दिग्दर्शक राज खोसलाचा 'प्रेम कहानी' (१९७५) आणि शक्ती सामंता दिग्दर्शित 'मेहबूबा' (१९७६) या फ्लॉपनी राजेश खन्नाची क्रेझ ओसरलीय हे अधोरेखित केले. या दोन्ही चित्रपटांची गाणी आजही लोकप्रिय आहेत ना? कितीदाही ती गाणी ऐका/पहा, गुणगुणत रहा, अजिबात कंटाळा येत नाही. येणार नाही. खरं तर तो, या चित्रपटांच्या यशाने 'पुन्हा आपले दिवस' येतील अशा प्रचंड आशेवर होता. तशा त्याने कित्ती कित्ती गोडधोड मुलाखती दिल्या आणि तो गॉसिप्स मॅगझिनच्या मुखपृष्ठावर झळकला. पण म्हटलं ना, पब्लिसिटीत रंग असून उपयोग नाही, चित्रपटात दम असायला हवा! त्या काळात राजेश खन्नाचे चित्रपट फक्त आणि फक्त रौप्यमहोत्सवी यश संपादण्यासाठीच प्रदर्शित होतात असे घडायचे, त्याचेच चित्रपट चालणे चक्क बंद व्हावे? 'काळी जादू' व्हावी असं घडलं.

रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शान' (१९८०) नक्कीच 'शोले' चा (१९७५) विक्रम मोडेल अशीही हवा होती. 'सहा कोटीचा चित्रपट!' अशी 'शान 'ची जोरदार पब्लिसिटी झाली. चाळीस वर्षांपूर्वी सहा कोटी खूपच मोठी रक्कम होती. 'शोले'च्या अमजद खानच्या गब्बरसिंगपेक्षाही कुलभूषण खरबंदाचा 'शाकाल' डेंजरस असेल अशीही हवा होती. (भीती वाटत होती म्हणा.) प्रत्यक्षात तसे काहीच झाले नाही. अमिताभ बच्चनची मगरीसोबतची झुंजही लुटूपुटूची ठरली. एवढे असूनही 'शान'ने मिनर्व्हा चित्रपटगृहात चक्क रौप्यमहोत्सवी यश संपादले. अमिताभ बच्चनचे पडले पडले म्हणून ओळखले जात असलेल्या 'पुकार' आणि 'द ग्रेट गॅम्बलर' (दोन्हीत डबल रोल) तसेच 'महान' (तिहेरी भूमिका) या चित्रपटांनी चक्क मिथुन चक्रवर्तीच्या हिट चित्रपटापेक्षा जास्त यश संपादले. अपयशाची ही दुसरी बाजू. 'दीदार-ए-यार' आणि 'स्टार' हे मोठे चित्रपट एकाच शुक्रवारी प्रदर्शित



झाले आणि एकदमच पडले. या अपयशाची भरपूर चर्चा झाली. 'दीदार ए यार'च्या अपयशाची भरपूर टवाळी झाली, विनोद झाले. या चित्रपटाचा निर्माता जितेंद्र होता. एकदा म्हणे, इनकम टॅक्सच्या धाडीत जितेंद्रच्या बंगल्यात 'दीदार-ए-यार'ची तिकीटे मिळाली. प्रेक्षकांनी ती घेतली नाहीत म्हणून जितेंद्रने घेऊन ठेवली म्हणे. 'स्टार' पहिल्याच दिवशी आपटला आणि कुमार गौरव 'स्टार' व्हायचा राहिला. राजेंद्रकुमारला आपल्या मुलाला 'स्टार' करण्याची घाई होती म्हणून पब्लिकला काय ते ठरवूदे ना? अपयशाच्या गंमती कमी आहेत का? 'इमान धरम'च्या अपयशाने पटकथा आणि संवाद लेखक सलिम-जावेद यांच्यावर बरीच टीका झाली. आपल्या पटकथेवर कानाकोपऱ्यात दिग्दर्शकांना सगळ्या सूचना असतात, त्याना फार काही करावे लागत नाही हा

त्यांचा विलक्षण अभिमान या अपयशाने टीकेचा ठरवला. गॉसिप्स मॅगझिनमधून याची बरीच उलटसुलट चर्चा रंगली. 'मंझिल मंझिल' आणि 'जबरदस्त' या फ्लॉपनी मसालेदार मनोरंजक चित्रपटाचे हुकमी निर्माता आणि दिग्दर्शक नासिर हुसेन यांनी चक्क दिग्दर्शनातून निवृत्ती घेतली! तेव्हा त्यांचे चाहते हळहळले. देव आनंदला आपला चित्रपट कितीही आपटला तरी तो कायमच 'मै जिंदगी का साथ निभाता चला गया' अशा वृत्तीने वावरला. 'इश्क इश्क इश्क' नावाच्या आपल्या चित्रपटाचे सगळे चित्रिकरण त्याने काठमांडूला केले, भरपूर खर्चही केला. सगळ्या युनिटने फार मौजमजा केली. पण हा थंड हवेच्या ठिकाणी शूटिंग केलेला चित्रपट गल्ला पेटीवरही थंडाच राहिला. पण या फ्लॉपखाली खच्चून जाणारा देव आनंद नव्हता. त्याचे 'सच्चे का बोलबाला', 'अव्वल नंबर', 'प्यार का तराना', 'सेन्सॉर', 'गॅन्गस्टर' असे चित्रपट ओळीने अपयशी ठरुनही देव आनंदचा चित्रपट

निर्मितीचा उत्साह कायम राहिला होता. काही माणसे अपयशाचा विचार करीत नाहीत हेच यातून दिसते. तो 'प्रेम पुजारी' (१९७१) पासून दिग्दर्शनात उतरला होता, तेव्हाच त्याच्या दिग्दर्शनातील क्षमतेवर विश्वास नव्हता. तरी त्याने 'हरे राम हरे कृष्ण' (१९७२) मध्ये चमक दाखवली. विजय आनंद द ग्रेट दिग्दर्शक! पण 'ब्लॅक मेल' (१९७३) च्या

अपयशा नंतर त्याचे दिग्दर्शनीय कसब व कौशल्य जणू त्याला सोडून गेले. मोठा चित्रपट अपयशी ठरताना दिग्दर्शकाच्या आत्मविश्वासावर परिणाम करतो. राज खोसलाबाबतही तोच प्रकार. एकेकाळी 'सी. आय. डी',

'बम्बई का बाबू', 'मेरा साया', 'वो कौन थी?', 'दो रास्ते', 'मेरा गाँव मेरा देश', 'मै तुलसी तेरे आंगन की' असे सुपर हिट

चित्रपट देणारे राज खोसला 'तेरी मांग सितारो से भर दू', 'दो प्रेमी', 'सनी', 'मेरा देश मेरा धर्म' , 'नकाब' असे ओळीने फ्लॉप चित्रपट देणारे ठरले. मनमोहन देसाईंचा शेवटचा चित्रपट 'गंगा जमुना सरस्वती' (१९८९)चे अपयशही बहुचर्चित. अमिताभ बच्चनचा हा त्या काळातील सर्वात मोठा फ्लॉप! खरं तर मनमोहन देसाई आणि अमिताभ या जोडीने 'अमर अकबर ॲन्थनी' पासून सुपर-डुपर हिटचे सातत्य ठेवले. 'परवरीश', 'सुहाग', 'नसीब', 'देशप्रेमी', 'कुली', 'मर्द' असे प्रत्येक चित्रपट ओळीने सुपर हिट! 'गंगा जमुना

सरस्वती'च्या मोठ्या अपयशाने सगळे गणित बिघडवले. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांना हा चित्रपट मुंबईतील 'मेट्रो' थिएटरमध्ये पब्लिकसोबत फर्स्ट शोमध्ये दाखवला असता मध्यंतरमध्ये दिग्दर्शक मनजी आणि केतन हे देसाई पिता पुत्र आम्हाला भेटायला असता त्यांचे चेहरेच सांगत होते, ते धास्तावलेत! (त्यांना रिपोर्ट समजलाय.) दिग्दर्शक प्रकाश मेहरा आणि अमिताभ बच्चन ही 'जंजीर 'पासून जमलेली जोडी! प्रकाश मेहराने अमिताभला केवढी तरी विविधता दिली. मात्र या जोडीचा 'जादुगर' खूपच मोठा फ्लॉप ठरला व ही जोडी फुटली. काही अपयशे अशी सुद्धा आहेत. प्रकाश मेहरा अधूनमधून घोषणा करीत राहिले आम्ही पुन्हा एकत्र येतोय. त्यांच्या बोलण्यातील उसने अवसान जाणवत होते. रामगोपाल वर्माने रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले'ची रिमेक करताना फारच हात भाजून घेतला. हे आव्हान पेलण्याची आपली क्षमता नाही हे रामूच्या का बरे लक्षात आले नसावे?

'रामगोपाल वर्मा की आग' या नावाने चित्रपट प्रदर्शित झाला तोच 'ही आग नव्हे शेकोटी' अशी प्रतिक्रिया उमटली, पसरली आणि थिएटरवर सामसूम निर्माण झाली. मुकुल आनंद दिग्दर्शित 'त्रिमूर्ती', सुभाष घई दिग्दर्शित 'यादे', अभिषेक वर्मन दिग्दर्शित 'कलंक', आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'व्हॉटस् युवर राशी', अशा अनेक फ्लॉप चित्रपटांनी जणू पडण्याचा इतिहास घडवला. बोनी कपूर निर्मित व सतिश कौशिक दिग्दर्शित 'रुप की रानी चोरों का राजा'चे फ्लॉप होणे तर भारीच. पिक्चरचं इतकं शूटिंग झाले की 'फर्स्ट शो' सुरु होईपर्यंत तरी पिक्चर पूर्ण होईल ना अशी थट्टा झाली. देशातील नऊ शहरात त्याचा ग्लॅमरस प्रीमियर रंगला. या फ्लॉपचा सतिश कौशिकने इतका आणि असा धसका घेतला की, यापासून शक्य तितकं दूर जाण्याचे त्याने केलेले प्रयत्न विनोदी झाले....

'आदिपुरुष'पर्यंत आलेला हा फ्लॉपचा प्रवास पुढे सुरु राहणारच आहे... कारण यह

पब्लिक है पब्लिक. ते ठरवतील तो पिक्चर हिट!

आणि ते नाकारलेला पिक्चर फ्लॉप. सिधी बात!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ८६

'रामसे ब्रदर्स'चे पिक्चर एन्जॉय करताना.. 'डरना मना है'!

काहीही म्हणा, आपली चित्रपटसृष्टी म्हणजे, आपापल्या शक्तीनुसार लहान मोठी 'संस्थाने'च!

येथे राज कपूरच्या आर. के. फिल्म बॅनरखालील चित्रपटांची आपली एक कायम स्वरूपी ओळख आहे, तसाच मनमोहन देसाईंचा 'लॉस्ट ॲण्ड फाऊन्ड' मसालेदार मनोरंजक पिक्चरची आपली एक धमाल होती!

याच चालीवर जायचं तर 'रामसे ब्रदर्स' अर्थात रामसे बंधुंची आपली एक नावापासून पोस्टरपर्यंत 'डरावनी' फिल्मे अशीच एक ओळख होती. भलेही त्यांच्या त्या 'डरना जरुरी है!' पिक्चर्सना समीक्षकांनी फारसं महत्व दिले नाही! क्वचित त्यांच्या एकाद्या पिक्चरचे परीक्षण आले असले. मुख्य प्रवाहातील चित्रपटात रामसेंच्या कधी भूत पिश्शाच्च तर कधी एकामागोमाग एक खून अशा चित्रपटांना स्थान मिळाले नसेल! चित्रपट अभ्यासक्रमात यांच्या चित्रपटावर लेक्चर्स नसतील, चित्रपट अभ्यासकांनी हसून हसून या अतिरंजित पिक्चर्सकडे दुर्लक्ष केले असेल. म्हणून काही त्यांची स्पेस नाकारता येत नाही. यशाची एक व्याख्या काय? स्वतःची ओळख निर्माण करणे. त्यात रामसे ब्रदर्स यशस्वी ठरले. मुंबईसारख्या 'ए' श्रेणी केंद्रावर त्यांचे पिक्चर्स तीन आठवडे चालले तरी भारी असे. त्यांचा हाऊसफुल्ल पब्लिक बी (छोटी शहरे) आणि सी (ग्रामीण भाग) येथे पसरलेला

आणि तोही हुकमी! रामसे ब्रदर्सचे पिक्चर्स थिएटरमध्ये बसल्या बसल्या घाबरत पाह्यचे अशी एक मानसिकता होती. म्हटलं ना, रामसे ब्रदर्स मूव्हीजचं आपलं एक कल्चर होते. त्या सात रामसे बंधूंचे वडील एफ. यू. रामसे यांच्या १० जूलै या स्मृतिदिनानिमित्त हा 'घाबरायचं नाही' फोकस टाकतोय..!

मूळ विषयाकडे वळण्याआधी मला काही सांगायचंय! "हॉरर सिनेमे" हे बहुतांशी "फक्त प्रौढांसाठी" असतात, हा प्रश्न तुमच्या मनात आलाच असेल ना? "येस्"!

"हॉरर" चित्रपटांबद्दल "गुगल" वरची उपलब्ध माहिती सांगायची तर.. "हॉरर चित्रपट" हे प्रामुख्याने 'फक्त प्रौढांसाठी' (A-Rated) असतात कारण त्यात अति-हिंसा, रक्ताळलेले दृश्य, शारीरिक हिंसा, छळ किंवा रक्ताचे थारोळे मानसिक भीती आणि भीतीदायक वातावरणाचा समावेश असतो, ज्याचा लहान मुलांच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. असे चित्रपट केवळ १८

वर्षांवरील व्यक्तींना समजेल अशा तीव्र भावना, लैंगिक संदर्भ किंवा भयानक घटना दाखवतात. जे मुलांसाठी योग्य नसते, असे "सेन्सॉरचे" मत!

यात प्रौढांसाठीचा आशय असतो. हॉरर चित्रपटांमध्ये भीतीसोबतच लैंगिक दृश्ये, शिवीगाळ किंवा ड्रग्सचा वापर दाखवला जातो. भीतीदायक प्रसंगांना कल्पनेपलीकडील समजण्याची किंवा ते केवळ एक "चित्रपट" आहे हे समजण्याची क्षमता प्रौढांमध्ये असते, जी मुलांमध्ये नसते. भीतीची तीव्रता जास्त असल्यास त्यांना प्रौढांसाठी (A-Certificate) प्रमाणपत्र दिले जाते, जेणेकरून लहान मुले असे भयंकर अनुभव पाहण्यापासून दूर राहतील.

यामुळे आम्हां बच्चेकंपनीचे तर वांधे झाले की हो! यामुळे झालं हे की आम्ही.. काही चित्रपट पाहण्यापासून "वंचित" राहिलो. "गुमनाम" चे उदाहरण घ्या ना! आमच्या लहानपणी मंगलकार्यानिमित्ताने "लाऊडस्पीकर" येत

असत त्यांच्यामुळे.. "रेकॉर्ड डान्स" हा प्रकार आला होता. आम्ही बच्चेकंपनी यावर भन्नाट नाचायचो. पण "हमें काले है तो क्या.." (गुमनाम १९६५) हे गाण्यावर नाचायला मिळालेच नाही. कारण त्या काळात त्या सिनेमाला "फक्त प्रौढांसाठी" असे "प्रमाणपत्र" दिले गेले होते. त्यामुळे तो पाहता आला नाही! (आमचा जन्मच मुळी १९६० च्या दशकातला, म्हणजे समजून जा!) ही भूक आम्ही कशी भागवली माहित्येय! "साधू और सैतान" (१९६८) मधल्या "मेहबूबा महेबुबा, बना लो मिजे दुल्हा.." या गाण्यावर आम्ही "रेकॉर्ड डान्स" करून "भूक भागवली" म्हणा ना! असो!

नंतर चित्रपटसृष्टीत बरीच उलथापालथ झालेल्या अशा १९७० आणि १९८० या दशकात 'हॉरर' चित्रपटांच्या क्षेत्रात या सात भावांची मक्तेदारी होती. रामसे ब्रदर्सनी त्यांची प्रतिमा निर्माण केली, एक वेगळा 'ब्रँड' निर्माण केला आणि मग 'हॉरर चित्रपट' म्हणजे रामसे ब्रदर्स! असे समीकरण

कायमस्वरुपी घट्ट झाले. हे सात भाऊ म्हणजे, कुमार, केशू, तुलसी, किरण, श्याम, गंगू व अर्जुन. यांना आशा आणि कमला या दोन बहिणीही!

रामसे ब्रदर्सचे वडील एफ. यू. रामसे अर्थात 'फतेहचंद रामसिंघानी' हे स्वातंत्र्यपूर्व काळात कराची आणि लाहोरमध्ये रेडिओचा व्यवसाय करायचे. इंग्रजांना त्याचे नाव उच्चारणे अवघड वाटले म्हणून ते त्याना 'रामसे' म्हणत. फाळणीच्या वेळी ते कुटुंबासह मुंबईत आले आणि त्यांनी रेडिओ आणि कपड्यांचा व्यवसाय सुरु केला. फतेहचंदना आपल्या मुलांनीही असेच करावे असे वाटत नव्हते. त्यांच्या कुटुंबासाठी चित्रपट निर्मितीचे त्यांचे स्वप्न होते. तो काळही तसा समाजाच्या विविध स्तरातून चित्रपट निर्मितीत येण्यास उद्‌युक्त करणारा होता. सुरुवातीला त्यांनी काही चित्रपटांना वित्तपुरवठा करण्यास सुरुवात केली आणि लवकरच स्वत: चित्रपटांची निर्मिती करण्यास सुरुवात केली. फतेहचंद

यांच्या असे लक्षात आले की चित्रपटाशी संबंधित तंत्रज्ञ (म्हणजे छायाचित्रण, संकलन वगैरे) आणि कामगार आपापले काम करतात आणि यामुळे चित्रपटाचे बजेटही वाढते. यानंतर त्यांनी ठरवले की ते यासाठी त्यांनी आपल्या मुलांना चित्रपट माध्यमाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच ते थांबले नाहीत. तर आपल्या कुटुंबाला चित्रपट निर्मितीचे बारकावे शिकवण्यासाठी त्यांनी प्रत्येकाला दोन महिन्यांसाठी काश्मीरला नेले आणि 'हाऊसबोट' भाड्याने घेतली. तिथे त्यांनी चित्रपट निर्मितीशी संबंधित सर्व पैलू जसे दिग्दर्शन, ध्वनी, संकलन इत्यादी सात पुत्रांना शिकवण्यास सुरुवात केली! मुंबईत परतल्यानंतर त्यांनी आपल्या मुलांना

व्यावहारिक ज्ञान देण्यासाठी “नकली शान” नावाचा सिंधी चित्रपट

बनवण्यास सुरुवात केली . सात भावांनी मिळून हा चित्रपट बनवला. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार काम केले.

एफ. यू. रामसे यांनी एकेक चित्रपट निर्माण करीत वाटचाल सुरु केली. सर्वप्रथम जगदीश गौतम दिग्दर्शित 'शहीद-ए-आझम' (१९५४) हा देशभक्तीवरील चित्रपट निर्माण केला. त्यानंतर विशेष उल्लेखनीय गोष्ट, त्यांच्या दोन चित्रपटांचे दिग्दर्शन विश्राम बेडेकर यांनी केले. 'रुस्तम सोहराब' (६३) आणि 'एक नन्ही मुन्नी लडकी थी' (७०) हे ते चित्रपट होत. 'एक नन्ही मुन्नी'चे विशेष त्यात पृथ्वीराज कपूर, सुरेन्द्रकुमार, नादिरा, हेलन, सज्जन, जयंत इत्यादी. त्या दिवसांत मुमताज 'मेन स्ट्रीम'कडे एस्टॅब्लिश होण्यात एकेक पाऊल पुढे टाकत होती आणि शत्रुघ्न सिन्हा लहान मोठ्या अशा मिळतील त्या भूमिका साकारत होता! या चित्रपटात हे दोघेही होते. एका दृश्यात एका 'वस्तू संग्रहालयात' खंजीर चोरण्यासाठी पृथ्वीराज कपूर शैतानाचा मुखवटा आणि

आठ इंच जुने कवच असलेला ड्रेस धारण करुन मुमताजला 'सॉलीड' घाबरवतो या दृश्याला थिएटरमध्ये मिळणाऱ्या रिस्पॉन्सवरुन रामसे ब्रदर्सना जणू यशाचा फॉर्म्युलाच सापडला! श्याम व तुलसी हे रामसे ब्रदर्स दिग्दर्शनात उतरले. त्यांचा पहिला हॉरर पिक्चर 'दो गज जमीन के नीचे' (१९७२). हा चित्रपट अवघ्या साडेतीन लाखांत आणि

पंचेचाळीस दिवसांत बनवला! तो चक्क यशस्वी ठरला! आणि दक्षिण मध्य मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावरील 'रामसे ब्रदर्स'चे ऑफिस चकाचक झाले! उजव्या बाजूला समोर 'अप्सरा' थिएटर तर डाव्या बाजूस 'मिनर्व्हा' थिएटर! माझ्यासारखे फिल्म दीवाने येथे पिक्चरला आलो/गेलो की

'रामसे ब्रदर्स'च्या ऑफिसवर लावलेले खतरनाक मुद्रा असलेले त्यांच्या आगामी पिक्चर्सचे होर्डींग्स आणि खाली 'शो' कार्ड्स हमखास बघणार. (आम्ही त्या अमुक काळात लौकिकार्थाने बच्च्वेकंपनी होतो यार! रामसॅ बदर्सच्या जवळच्या त्या अमुक ज्यूस-सेंटरवर आपली तहान भागवणे जास्त महत्त्वाचे! हे सवयीचे आणि आवडीचे कधी झाले ते समजलेच नाही!) कालांतराने मी मिडियात आल्यावर येथेच केशू रामसेची मुलाखत घेतली. 'दो गज जमीन के नीचे'बद्दल एक किस्सा आहे! चित्रपटाचा एक 'सीन' शूट करण्यासाठी रामसे ब्रदर्स त्यांच्या टीमसोबत स्मशानभूमीत पोहोचले. दृश्यानुसार मैदानात खड्डा करावा लागला. चर्चच्या पुजाऱ्याची परवानगी घेऊन उत्खनन सुरु करण्यात आले. कोणताही वाद होऊ नये म्हणून स्थानिक नागरिकांची मदत घेऊन खड्डा खणण्याचे काम सुरु झाले. टीमने खूप विचार करून उत्खननाची जागा निवडली होती, मात्र प्रत्यक्षात

उत्खननाच्या ठिकाणी एक मृतदेह बाहेर आला. भीतीने आरडाओरडा झाला आणि स्थानिक लोकांनी टीमचा घेराव सुरू केला. मोठ्या कष्टाने तेथून सगळे युनिट पळून गेले.

फतेहचंद रामसे यांची नात अलिशा कृपलानी यांनी 'घोस्ट्स इन अवर बॅकयार्ड' या पुस्तकात म्हटलयं की, १९८३ मध्ये 'पुराना मंदिर'चे शूटिंग संपल्यानंतर दिग्दर्शक श्याम रामसे काही दिवस शूटिंगच्या ठिकाणी (महाबळेश्वर) थांबले होते. काही दिवस राहिल्यानंतर ते त्यांच्या गाडीतून मुंबईला निघाले. तो रात्री एकटाच गाडी चालवत होता, तेव्हा त्याला वाटेत एक अतिशय सुंदर स्त्री लिफ्ट मागताना दिसली. त्याने गाडी थांबवली आणि ती महिला येऊन गाडीच्या पुढच्या सीटवर बसली. वाटेत श्यामने तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण तिने प्रतिसाद दिला नाही. असं म्हणून श्यामची नजर त्या बाईच्या पायावर पडली. त्या महिलेचे वाकलेले पाय पाहून श्यामला धक्काच बसला. त्याने जोरात ब्रेक मारला.

बाई गाडीचे गेट उघडून खाली उतरली आणि निघून गेली. श्यामने तिथून गाडी काढली आणि थेट मुंबई गाठली. नंतर 'वीराना' (१९८८) या

चित्रपटातही त्याने हाच क्रम दाखवला. अर्थात ही सत्यकथा आहे की भूतकथा हे रामसे जाणो!

रामसे ब्रदर्सचे 'स्कोर कार्ड' भन्नाट आहे. एक प्रकारची चित्रपट निर्मितीची फॅक्टरीच! आणि म्हणूनच तोचतोचपणा येत गेला. प्रत्येक वेळी नवा प्लॉट, दोन तीन मर्डर, कधी भूताची गोष्ट, कधी आत्मा परमात्म्याचा मुक संचार यात मग 'थ्रील' राहिले नाही. आणि त्यात भीती कमी व्हावी म्हणून की काय, मादक,मोहक नायिका व सहनायिका. हळूहळू रामसे

बंधुंचा पिक्चर 'एन्जॉय' करताना दचकून जायला व्हायचे ते गेलं आणि पडद्यावर जे चाललयं ते सहज पाहता येऊ लागले. तरी दोन दशके एकामागोमाग एक हॉरर फिल्म पडद्यावर आणत राहिले! त्यात पुढे मादकता, अश्लिलता सुद्धा ओघाने स्वाभाविकपणे आपसुकच येऊ लागली! मामला बिघडू लागला हे मात्र नक्की!

'दो गज जमीन के नीचे' (१९७२) पासून त्या 'भीतीच्या गोष्टी'ची सुरुवात झाली. कधी महाशक्तीशाली भुताची गोष्ट, कधी 'एक खून झाला तोच दुसरा' याचा रक्तपात! काहीही असलं तरी घाबरवून टाकणारे मुखवटे आणि थरारक म्युझिक ट्रॅक हे मोठेच आधारस्तंभ!

'और कौन' (७९) व 'हॉटेल' (८१) अशा काही अमुक चित्रपटात चांगल्या गाण्यांचा तडका

होता. 'अंधेरा' (७५), 'दरवाजा' (७८), 'सबूत' (८०), 'गेस्ट हाऊस' (८०), 'दहशत' (८१), 'सन्नाटा' (८१), 'घुंगरू की आवाज' (८१), 'पुराना मंदिर' (८४), 'टेलिफोन' (८५), 'सामरी' - 3D (८५), 'तहखाना' (८६), 'डाक बंगला' (८७), 'वीराना' (८८), 'पुरानी हवेली' (८९), 'बंद दरवाजा' (९०), 'इन्स्पेक्टर धनुष' (९१), 'अजूबा कुदरत का' (९१), 'महाकाल' (९४), 'तलाशी' (९६)! यात 'खोज' (ऋषि कपूर, किमी काटकर व डॅनी) हा सस्पेन्स थ्रीलर शेवटपर्यंत रंगला होता! नव्वदच्या दशकात रामसे ब्रदर्सने त्यांचे चित्रपट दूरदर्शनवर दाखविण्याचा प्रयत्न केला, पण 'ए' प्रमाणपत्र असल्याने त्याला परवानगी मिळाली नाही. यावर रामसे ब्रदर्सने चित्रपटाचे सॅटेलाइट हक्क 'झी टीव्ही'ला विकण्याचा प्रयत्न केला. झी टीव्हीचे संस्थापक 'सुभाष चंद्रा' यांनी त्यांना झीसाठी एक हॉरर शो करण्याची ऑफर दिली. यासह 'झी

हॉरर शो' ची मालिका सुरू झाली. तर भीतीचा प्रवास.. मोठ्या पडद्यापासून छोट्या पडद्यापर्यंत असा पोहोचला. कोणाला घाबरवले तर कोणाला नाही. ही मालिका चक्क साडेसात वर्षे चालली. हॉरर चित्रपटांच्या

धर्तीवर, अडीच तासांची कथा बनवली गेली आणि ती पाच आठवडे दाखवली गेली. अशा भीतिदायक गोष्टी एन्जॉय करणारा हुकमी प्रेक्षक आहे हे निश्चित! रामसेंच्या चित्रपटांसाठी महाबळेश्वर हे पसंतीचे ठिकाण असायचे. संपूर्ण कुटुंब बसने महाबळेश्वरला पोहोचायचे आणि अनारकली नावाच्या हॉटेलमध्ये राहायचे. चित्रपटांचे बजेट

नियंत्रणात ठेवण्यासाठी चित्रपट निर्मितीशी संबंधित सर्व कामे संपूर्ण कुटुंब करत असत. त्यांनी त्यांच्या कुवतीनुसार कामाची वाटणी केली होती आणि त्यांनी बाहेरच्या कोणाचीही मदत घेतली नाही. तपशीलवार सांगायचे तर.. कुमार रामसे - पटकथालेखन, गंगू रामसे - सिनेमॅटोग्राफी, किरण रामसे - ध्वनी विभाग,केशू रामसे - निर्मिती,अर्जुन रामसे – संकलन तर श्याम रामसे आणि तुलसी रामसे - दिग्दर्शन. कधी केशु रामसे दिग्दर्शन करे. 'भाई हो तो ऐसे!' असं कौतुकाने म्हणूयात. त्यांच्या कुटुंबातील महिला आणि मुलेही चित्रपट निर्मितीत सहकार्य करत असत. या यशोगाथेत एक धक्कादायकच म्हणावी अशी गोष्ट म्हणजे, 'ज्वेल थीफ', 'तिसरी मंझिल', 'जॉनी मेरा नाम' या म्युझिकल रहस्यरंजक चित्रपटाचा दिग्दर्शक विजय आनंदने या रामसे ब्रदर्सच्या दिग्दर्शनात 'घुंगरु की आवाज'मध्ये भूमिका

साकारली. पण त्याच्याच दिग्दर्शनातील 'राम बलराम' च्या सेटवर



त्याचे आणि रेखाचे खटके उडाल्याने त्याचा साईड इफेक्ट्स 'घुंगरु की आवाज' बोथट होण्यात झाला.

'रामसे ब्रदर्स फिल्म' हे एक स्वतंत्र कल्चर होते हे आपण मानतो ना? मग 'त्यांच्या चित्रपटांची भीती ती कशाला?' डरो मत यार, हेच खरे!!!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)

लेख क्र. ८७

'श्रावण भाद्रपद'!
'पौराणिक चित्रपटांच्या भक्तीचा महिमा!'

आमच्या लहानपणी सत्तरच्या दशकात गिरगावातील सदाशिव लेन, बनाम हॉल लेन येथे दुकानात विविध रंगाच्या 'राख्या' दिसू लागल्या, मुगभाटात श्रीगणेश मूर्तींचे काम दिसू लागले की आम्ही समजायचो! श्रावण, भाद्रपद महिन्याचे आगमन होतेय आणि त्याच वेळेस मराठी वृत्तपत्रात 'शुक्रवारच्या' चित्रपट सदरात पौराणिक चित्रपटाच्या बातम्या, फोटो वाचायला मिळत. प्रार्थना समाजला एकाद्या पौराणिक चित्रपटाचे होर्डींग्स दिसे आणि अशातच

'मॅजेस्टीक' अथवा 'सेन्ट्रल', 'स्वस्तिक' थिएटरला एकादा पौराणिक चित्रपट प्रदर्शित होई..!

समाजमन आणि चित्रपट यांच्या नात्यातील जणू ही गोष्ट आहे! पौराणिक चित्रपटांची आपल्याकडची परंपरा थेट मूकपटांपासूनची. याचं कारण, तेव्हा 'चित्रपटासाठीची गोष्ट' याचा जन्म झाला नव्हता. जनसामान्यांना देव देवतांच्या गोष्टीत विशेष आनंद होत होता.

दिग्दर्शक दादासाहेब फाळके यांचा 'राजा हरिश्चंद्र' (१९१३) आपल्याकडील पहिला मूकपट हा पौराणिक आहे! आणि त्या काळाशी ते अतिशय सुसंगत आहे. त्या काळात 'मोहिनी भस्मासुर', 'लंका दहन', 'कृष्ण

जन्म', 'सैरंध्री', 'श्री कृष्ण सुदामा', 'शनी प्रभाव' असे अनेक पौराणिक मूकपट निर्माण होत जाताना समाजाला या दृश्य माध्यमाची हळूहळू ओळख होत गेली. अशी पौराणिक गोष्ट चालत्या फिरत्या दृश्य स्वरुपात पाहणे म्हणजेच चित्रपट ही समज होत गेली. चित्रपती व्ही. शांताराम दिग्दर्शित 'अयोध्येचा राजा' (१९३२) हा आपल्याकडील पहिला मराठी बोलपट पौराणिक आहे. प्रेक्षकांना समजायला सोपी गोष्ट म्हणजेच देव देवतांच्या गोष्टी अशीच सरळ सोपी व्याख्या होती. 'बोलू लागलेला चित्रपट' समाजात रुजताना पौराणिक चित्रपट एक महत्वाचा घटक होता. 'माया मच्छिंद्र', 'रुक्मिणी हरण', 'भक्त प्रल्हाद', 'आकाशवाणी', 'कृष्णार्जुन युध्द', 'चंद्रसेना', 'कालियामर्दन', 'गंगावतरण', 'गोपाल कृष्ण', 'अकरावा अवतार', 'माया बाजार', 'गोरखनाथ', 'संत ज्ञानेश्वर' अशा अनेक मराठी पौराणिक चित्रपटांची निर्मिती होत होत मराठी चित्रपटाचा प्रवास पुढे जात राहिला.

याबरोबरच संतपट, ऐतिहासिक चित्रपट मग ग्रामीण चित्रपट वगैरेचे प्रवाह त्यात मिळत/मिसळत गेले!

हिंदीतही पौराणिक चित्रपटांची खूपच मोठी यशस्वी वाटचाल आहे. १९३३ साली 'भक्त प्रल्हाद' हा पौराणिक चित्रपट पडद्यावर आला. आणि पौराणिक चित्रपटांची दीर्घकालीन परंपरा सुरु झाली. तीदेखील स्वाभाविकच म्हणायला हवी. याचं कारण त्या काळातील जनसामान्यांना चित्रपटाकडून पौराणिक गोष्टीच्या मनोरंजनाची जास्त अपेक्षा असे. अशा चित्रपटांची पटकथा,

त्याचे सेट्स, त्याचे छायाचित्रण, त्याचे संकलन यात फार दर्जा असावा अशीही अपेक्षा नसे. पडद्यावर गोष्ट दिसली तरी त्याचा आनंद होई. आणि साधारण 'जून ते सप्टेंबर' या चार महिन्यांत हे मराठी व हिंदी पौराणिक चित्रपट प्रदर्शित होत. अनेक सणासुदीच्या दिवसांमुळे भक्तीमय वातावरण निर्माण झालेले असे. आणि पौराणिक चित्रपट पाह्यला हवी असलेली भावनिक मानसिक तयारी झालेली असे. 'पिक्चर एन्जॉय करायला एक मूड हवा असतो' असं म्हटलं जाते ते अशा चित्रपटांना केवढं पूरक. गिरगावातील मॅजेस्टिक थिएटरमध्ये 'हर हर महादेव', 'श्रीकृष्ण लीला'अशा पौराणिक चित्रपटाच्या वेळी त्यातील अनेक दृश्यांचे उभे केलेले अतिशय ऐसपैस देखावे पाह्यला लहान-थोर सर्वांचीच गर्दी होई! (आम्हालाही जायला मिळे! याबाबत घरून आडकाठी नसे! 'काय मेल्याक खोटे गुण लागले आसत..' किंवा 'करून करून भागलो, देवपूजेक लागलो!..' अशी शेरेबाजी तर

बिल्कुल नसे, हे विशेष!) तिथे एकाद्या श्रीकृष्णच्या मूर्तीची पूजाही होई. अनेक शहरांत, ग्रामीण भागातील 'सिंगल स्क्रीन' थिएटर्समध्ये पौराणिक चित्रपटाच्या एकाद्या पोस्टरला हार, अगरबत्ती, नारळ फोडून पूजा हे नित्याचेच! हे सगळं 'पहिल्याच दिवशी किती कोटी कमावले' अशा 'ब्रेकिंग न्यूज' येण्यापूर्वीच्या काळातील वास्तव! त्या काळात चित्रपट म्हणजे समाजाचा भावनिक आधार होता, आनंद होता. थिएटरचा बुकिंग क्लर्क, डोअर किपर आपल्याकडे रिलीज झालेल्या पिक्चरला गर्दी व्हावी अशी इच्छा बाळगे. त्यात हे पौराणिक चित्रपटाच्या 'पोस्टरची पूजा' म्हणजे जणू देव पूजाच! होमी वाडिया, चंद्रकांत या निर्मात्यांनी पौराणिक चित्रपटात केवढे तरी सातत्य ठेवले. होमी वाडिया यांनी 'श्रीरामभक्त हनुमान' (१९४८), 'श्रीगणेश महिमा' (५०), 'हनुमान पाताल विजय' (५१), 'श्रीकृष्ण लीला' (७२) या पौराणिक चित्रपटांची तर चंद्रकांत यांनी 'हरी दर्शन' (७२),

'बजरंगबली' (७६), 'कृष्णा कृष्णा' (८६). यासह अनेक पौराणिक चित्रपट येत राहिले. 'गोकुल का चोर', 'बद्रीनाथ धाम', 'भगवत गीता', 'बाल गणेश', 'हनुमान', 'शकुंतला', 'भगवान परशुराम', 'रामायण', 'महाभारत', 'वाल्मिकी', 'लव कुश', 'संपूर्ण रामायण', 'शिव महिमा', 'अलख निरंजन', 'श्रीसत्यनारायण की महापूजा', 'शिवमहिमा', मनोजकुमार कृत 'शिर्डी के साईबाबा' वगैरे वगैरे! व्यावसायिक मूल्याच्या भाषेत सांगायचे तर छोट्या अथवा मध्यम बजेटमधील हे चित्रपट असत! त्यामुळे आर्थिक गुंतवणूक कमी आणि टप्प्याटप्प्याने प्रदर्शित होत होत वसूलीची गती समाधानकारक! या चित्रपटांचा प्रेक्षकवर्ग भाबडा आणि भक्तीत रमणारा असला तरी कालांतराने या चित्रपटांना मसालेदार मनोरंजक चित्रपटांची स्पर्धा जाणवू लागली! विशेषकरून पूर्वप्रसिध्दी व चित्रपटगृह यात स्थान मिळण्यात आव्हान निर्माण झाले आणि अशातच सतराम

रोहरा निर्मित व विजय शर्मा दिग्दर्शित 'जय संतोषी माँ' (मुंबईत रिलीज ३० मे १९७५) ने जणू लोकप्रियतेत प्रचंड क्रांती केली! मुंबईत अलंकार (मॅटीनी शो), एडवर्ड (धोबीतलाव), किस्मत (प्रभादेवी) इत्यादी थिएटर मध्ये हा चित्रपट प्रदर्शित होताना जणू फार मोठे सामाजिक सांस्कृतिक वातावरण ढवळून काढणारे काही घडेल याची अजिबात कल्पनाच नव्हती! हिंदी चित्रपटातच एक हुकमी संवाद असतो ना, 'होनी को कौन टाल सकता है..' तसंच झालं. टेक्निकली सर्वसाधारण असलेला पण गीत संगीतात सोप्या चालीने खुललेला हा चित्रपट 'माऊथ पब्लिसिटीवर' जोरात चालू लागला. कुठे काही भक्तांनी प्रत्येक शुक्रवारी हा चित्रपट पाह्यचाच असा जणू नवस केला. कुठे थिएटरबाहेर चपला काढून आत पिक्चर पाह्यला जात. कुठे 'मै तो आरती उतारू रे..' गाण्याला प्रेक्षक उभे राहून तेही आरती गाऊ

लागले! आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृती अशी भन्नाट आहे!

पिक्चरने जोर पकडला. मग १५ ऑगस्ट १९७५ रोजी मुंबईत रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' आला! सुरुवातीस नरम रिपोर्ट असलेला 'शोले' मग खणखणीत यशस्वी ठरला तरी 'जय संतोषी माँ' ची जबरा क्रेझ कायम राहिली. इतकी की आजही या दोघांच्या तडाखेबंद यशाची तुलना होते. 'जय संतोषी माँ'च्या यशाने पौराणिक चित्रपटांची बरीच मोठी लाट आणली. मुख्य प्रवाहात ती सामावली. पौराणिक चित्रपटांनी जे पेरले ते ऐंशीच्या दशकाच्या अखेरीस रामानंद सागर यांच्या 'रामायण' आणि बी. आर. चोप्रा यांच्या 'महाभारत' या

दूरदर्शनवरील पौराणिक मालिकांच्या पथ्यावर पडले. या एका मालिकेनंतर काही महिन्यातच दुसरीही मालिका आली. सगळीकडेच रविवारी सकाळी रस्ते ओस पडू लागले. पुन्हा एकदा सामाजिक वातावरण बदलून टाकले. पौराणिक गोष्टीत ही ताकद आहे! कालांतराने तांत्रिक प्रगती होत असतानाच अनेक पौराणिक मालिका येत राहिल्या. 'घटोत्कच', 'दशावतार', 'कृष्ण और कंस' इत्यादी 'ॲनिमेशनपट' आले. 'व्हीएफएक्स' आले आणि 'आदिपुरुष' वगैरे आले! पौराणिक चित्रपटांचे बजेट अव्वाच्या सव्वा वाढले. त्यात मूळ गोष्टीतील आत्मा हरवला. पूर्वीचे पौराणिकपट साधेच असत आणि प्रेक्षकांच्याही त्यांच्याकडून फार अपेक्षा नसत!

श्रावण भाद्रपद महिन्यात पौराणिक चित्रपट पाह्यला मिळणार याचा विश्वास असे आणि तोच महत्वाचा असतो. थिएटरवरचे पौराणिक चित्रपटाचे देखावे पाहण्यातही आनंद

घेण्याची एक पब्लिक संस्कृती होती. आपल्याकडील चित्रपट संस्कृती अशी सामाजिक सांस्कृतिक भावना जपणारी आहे. आणि त्याला दाद द्यायलाच हवी...!!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ८८

'हेमा मालिनी'.... बहुस्तरीय प्रवास पंचाहत्तरीचा!

'आशा भोसले' यांचे एक वाक्य तुम्हालाही आवडत असेल, 'वय हा माझ्यासाठी फक्त एक आकडा आहे..!' हा अलिखित नियम हेमा मालिनीलाही लागू पडतोय! वय वर्ष फक्त आणि फक्त पंचाहत्तर! (आता तर चक्क सत्त्याहत्तर!) जन्म दिनांक १६ ऑक्टोबर १९४८! एव्हाना तुमच्या डोळ्यासमोर हेमाजींचे अतिशय प्रसन्न दिलखुलास व्यक्तिमत्व आलेच असणार आणि उगाच विचार करत असाल, खरंच हेमाजी अमृत महोत्सवी वयाच्या झाल्या? कोणत्याही अँगलने झालेच, साध्या कल्पनेतही त्यांचे आज

कागदोपत्री असलेले 'वय' दिसत नाही. त्यांनी वयाची सत्तरी गाठली तेव्हा एका मुलाखतीत त्यांना प्रश्न करण्यात आला होता, सत्तर की सतरा? यावर नेहमीप्रमाणेच छान हसत केवळ भावमुद्रेने त्यांनी काही न बोलता प्रतिक्रिया दिली, यात त्यांना या स्तुतीचा आनंद झाल्याचे दिसते. अर्थात, आणखीन पाच-सात वर्षांत तसा काही त्यांच्यात फरक पडला नाही. निदान तसे देव आनंदच्या 'जन्मशताब्दीपूर्ती'च्या जयपूर येथील सोहळ्यात त्यांनी उत्फूर्तपणे भाग घेतला, देव आनंद फॅन्सचा रिस्पॉन्स मिळवला आणि माहौल बदलून टाकला यातून दिसते. हेमा मालिनी म्हणजे सौंदर्य, शालिनता, बुध्दीमत्ता आणि विलक्षण समजूतदारपणा ही एक ओळख. तर आध्यात्मिकता, योगा, नृत्य, व्यायाम, पूर्णपणे शाकाहारी खाणे आणि आपण ठरवेलेल्या खाद्यपदार्थांचे वेळेवर सेवन करणे हे त्यांच्या सौंदर्याचे आणि सतत तजेलदार व्यक्तिमत्वाचे गणित. अध्यात्माने आपल्याला संयम

शिकवला असे त्या सांगतात त्याचा प्रत्यय त्यांच्या कारकिर्दीचा मागोवा घेताना येतो.

देव आनंद शंभरीचा झाला तरी त्याला आपण एकेरीत पाहतो, बोलतो, त्यात एक प्रकारची जवळीक कायम आहे. रेखा सत्तरीत आली तरी तिला 'अहो, जावो' करणं आपल्याला सुचत नाही. आवडणार नाही. ती लांब गेल्यासारखे वाटेल. हाच अलिखित नियम वा सवय आपण 'ड्रीम गर्ल' हेमा मालिनींना लावू शकत नाही. ती महेश कौल दिग्दर्शित 'सपनों का सौदागर' (१९६८) मधून हिंदी चित्रपटसृष्टीत आली तेव्हा ड्रीम गर्ल अशी तिला उपाधी देणं हा एक प्रकारचा 'मार्केटिंग फंडा' होता. तोपर्यंत असा वाक्प्रचार अंमलात आला नव्हता! पण गॉसिप्स मॅगझिन मूळ धरत होती आणि हेमा मालिनी त्यात एक उत्तम 'रोल मॉडेल'!..पहिल्याच चित्रपटात 'अतिशय मोठा कलाकार व माणूस राज कपूर नायक' याचा नवख्या हेमा मालिनीवर केवढा दबाव यायला

हवा. दिग्दर्शक महेश कौल हे वयाने खूप मोठे होते यापेक्षा जास्त समंजस होते. त्यांनी हेमा मालिनीला 'यहाँ वहाँ मत देखो, तुम सिर्फ अपने काम के उपर ध्यान दो!' हा मंत्र दिला. जोडीला आई जया चक्रवर्ती होत्याच. त्या एक प्रकारच्या गुरुच! हेमा मालिनीने आपलं काम व नृत्य यावर पूर्ण 'फोकस' ठेवल्याचे सकारात्मक फळ मिळाले. चित्रपट 'फ्लॉप' झाला तरी ज्यांनी पाहिला, त्यांनी हेमा मालिनीचे कौतुक केलं. हा चित्रपट प्रदर्शित होईपर्यंत हेमा मालिनीला आणखीन काही चित्रपट मिळत होतेच. त्यात 'बिग शॉट' ठरला गुलशन रॉय निर्मित व विजय आनंद दिग्दर्शित 'जॉनी मेरा नाम' (१९७०). अशी झक्कास कुंडली अथवा योग एखाद्याच कलाकाराबाबत येतो. विजय आनंद अर्थात गोल्डीने 'नायिका' म्हणून निवडणे हे भारी प्रमाणपत्र! अख्ख्या चित्रपटसृष्टी, मिडिया व रसिकांचे लक्ष केंद्रित करणारे!

खरं तर आपण दोन वर्ष चित्रपटात काम करु आणि नृत्याच्या शोजवर लक्ष केंद्रित करु असे हेमा मालिनीला वाटत होते. दिल्लीत लहानाची मोठी होताना, शिक्षण घेत असताना आईने नृत्य शाळेत टाकलेले नाव त्याची गोडी वाढवणारे ठरले. नृत्यात नवीन काही शिकावे म्हणून हे चक्रवर्ती कुटुंब चैन्नईत राह्यला आले. येथे नृत्याला सकारात्मक वातावरण होते. नृत्याचे छोटे छोटे कार्यक्रम करता येत होते. आणि तमिळ चित्रपटाच्या निर्मित्यांकडून ऑफरही सुरु झाल्या. मुंबईत आल्यावर हिंदी चित्रपटाच्या ऑफरचा स्वीकार केला आणि 'हेमा मालिनी युग' सुरु झाले. खरं तर याच टप्प्यावर एकिकडे व्यावसायिक चित्रपटात नायिका 'शोभेची बाहुली' ठरत होती तर समांतर चित्रपटाची चळवळ मूळ धरत होती. त्यात हेमा मालिनी मास-अपील चित्रपटात हुकमी नाणं ठरलं.

'अभिनेत्री' म्हटल्यावर तिच्यावर आकृष्ट झालेला कलाकार (संजीवकुमार), जवळपास लग्नाचे ठरल्याची गोष्ट (जितेंद्र) आणि प्रत्यक्षात ज्याच्याशी सूर जुळला तो (धर्मेंद्र) यावरुन 'भलतं सलतं' गॉसिप्स काढलं जातचं. फार वाढतंही. त्यात वाह्यातपणा करणाऱ्यांवर 'गरम धरम'ने हातही उगारला. पण चार मुलांचा (दोन मुलगे, दोन मुली) पिता असलेल्या पत्नीनिष्ठ धर्मेंद्रला 'आपलासा' मानणे आणि यावरुन उमटणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, माध्यम क्षेत्रातील उलटसुलट प्रतिक्रिया पचवणे सोपे नव्हते. एकिकडे हिंदी चित्रपटसृष्टीतील 'नंबर वन' ची तारका, दुसरीकडे खाजगी आयुष्यातील महत्वाचा निर्णय घेणे. अभिनय वेगळा आणि वास्तव जग वेगळे आणि त्याचं भान असणे आणखीनच गुंतागुंतीचे! आपल्या पतीची पहिली पत्नी व मुले स्वीकारतील का हा सर्वात अवघड प्रश्न!

अशा परिस्थितीत (अवघड मानसिकेत म्हणायचं?) आपल्या आईची साथ आणि 'गुरु माँ' इंदिरा देवी यांची साथ महत्वाची ठरलीय! आपल्या आयुष्यातील हे दोन गुरु हे हेमाजींचे म्हणणे!

हळूहळू हेमाजी पहिल्यासारख्याच चित्रपटात रमल्या. त्या विलक्षण श्रीकृष्ण भक्त असल्याने त्यांनी 'भक्त मीरा'च्या आयुष्यावर आधारित एकादा चित्रपट निर्माण करावा असे गुरु माँ इंदिरा देवींनी सुचवले. तेव्हा निर्माते प्रेमजी (त्यांच्या 'दोस्त' या चित्रपटात हेमाजी होत्या) यानी एका अन्य चित्रपटासाठी हेमाजींना करारबद्ध केले असताना त्याऐवजी

'मीरा' या चित्रपटाची निर्मिती करुयात, गुलजार यांना दिग्दर्शन देऊ ही हेमाजींची कल्पना. या चित्रपटाला फारसे यश प्राप्त झाले नसले तरी रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले'तील अखंड प्रचंड बकबक करणारी बसंती ते गुलजार दिग्दर्शित 'मीरा'तील शीर्षक भूमिका असा पट विस्तारला! हेमा मालिनीच्या काही उल्लेखनीय चित्रपटांची नावे सांगायची तर, शोले व मीरासह रमेश सिप्पी दिग्दर्शित 'सीता और गीता', दुलाल गुहा दिग्दर्शित 'प्रतिज्ञा', प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित 'ज्योती', सुखवंत दड्डा दिग्दर्शित 'एक चादर मैली सी', अरुणा राजे दिग्दर्शित 'रिहाई', बासू चटर्जी दिग्दर्शित 'दिल्लगी', बी. आर. चोप्रा दिग्दर्शित 'बागबान'..! पैकी रवि चोप्राने 'बागबान'ची कथा ऐकवली तेव्हा चार मुलांच्या आईची मध्यमवयीन भूमिका साकारण्यास हेमाजी तयार नव्हत्या! शेजारीच बसलेल्या आईने लगेचच सांगितले.. 'ही गोष्ट चांगली आहे. हो म्हण!' काळ जसजसा पुढे सरकला

हेमाजींचे पडद्यावर व प्रत्यक्षातील आयुष्य स्थिर राहिले. दोन मुलींना जन्म! त्यांचे पालनपोषण. दोघींसोबत देश विदेशातील नृत्याचे कार्यक्रम! इशाचे चित्रपटात येणे! कालांतराने दोन्ही मुलींची लग्न! त्यांचे आई होणं. काही काळाने हेमाजी आजी होणं! आपलं खाजगी आयुष्य व्यवस्थित जपण्यास प्राधान्य दिल्याने हेमाजी आनंदीत राहिल्या असे दिसते. एक सर्वसाधारण आयुष्य असावे ही त्यांनी जपलेली भावना! समाजकारणाची आवड असल्याने राजकारणात गेल्या. 'मथुरा लोकसभा मतदारसंघांतून' भारतीय जनता पक्षाच्या त्या २०१४ व २०१९ अशा खासदार झाल्या! 'मै जनता की सेवक हू' हा त्यांचा बाणा आहे! त्यातही त्यांचा एक विशेष दृष्टिकोन आहे. आपण नृत्याचे कार्यक्रम जनतेसाठी करतो, चित्रपटात काम जनतेसाठी करतो तसेच राजकारणाचे आहे, तेही जनतेसाठीच तर आहे!

रुपेरी पडद्यावरील त्यांचे प्रगती पुस्तक अनेक प्रकारचे चित्रपट आणि भूमिका यांनी भरलेले! या मसालेदार मनोरंजक चित्रपटातील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून वाटचाल करताना त्या पठडीतील यश चोप्रा ते मनमोहन देसाई, तर दुसरीकडे निखळ आनंद देणाऱ्या गुलजार ते बासू चटर्जी यांच्या चित्रपटात भूमिका साकारल्या. पण ह्रषिकेश मुखर्जींच्या दिग्दर्शनात योग आला नाही..

हेमाजी व सनी देओल यांच्या योगायोगाने झालेल्या पहिल्या भेटीचा किस्सा प्रसिद्ध आहे. हेमाजींच्या पहिल्याच दिग्दर्शनातील 'दिल आशना है'च्या (१९९३) सिन्नरजवळील शूटिंगच्या वेळेस एका पॅराशूटला झालेल्या अपघातात एकजण मृत्यूमुखी पडल्याचा, त्याच शूटिंगमध्ये सहभागी असलेल्या डिंपल कापडियाला प्रचंड धक्का बसला. तेव्हा तिला सावरण्यासाठी दुसऱ्याच दिवशी सनी देओल शूटिंग स्पॉटवर गेला तेव्हा सनी व हेमाजी यांची पहिली भेट झाली.

एव्हाना दोघांनाही आपल्या नात्याची आणि त्यातील अंतराची कल्पना आली असणारच!

अनिल शर्मा दिग्दर्शित 'गदर एक प्रेमकथा' (२००१)च्या जुहूच्या 'चंदन' थिएटरमध्ये पहिल्या दिवसाचा शेवटचा खेळ हेमाजी आणि इशा देओल यांनी एन्जॉय केला, इशाने तर 'सनीभय्या मारो साले को!..' असे मारहाणीच्या दृश्यात ओरडत प्रोत्साहन दिल्याची बातमी झाली!

काही वर्षांपूर्वी हेमाजींच्या गाडीला भरतपूर ते जयपूर असा प्रवास करताना अपघात झाल्याने त्यांना इस्पितळात दाखल करण्यात आले तेव्हा सर्वात पहिलं त्यांना पाह्यला गेलेली व्यक्ती सनी देओल होती!

सनी देओलचा धाकटा मुलगा करणच्या अलिकडेच पार पडलेल्या अतिशय थाटामाटातील लग्नात हेमाजी आणि इशा व आहना न आल्याची सोशल मिडियात भरपूर उलटसुलट चर्चा रंगली. पण हेमाजी शांत राहिल्या. आपल्या

पतीच्या नातवाच्या लग्नात आपण काही कारणास्तव सहभागी होऊ शकत नाही हा क्षण कसा असतो हे त्या व्यक्तीलाच ठाऊक!

आपल्या 'बियॉण्ड द ड्रीम गर्ल' या आत्मचरित्रात हेमाजींनी आपल्या आयुष्यातील अनेक गोष्टी मांडल्यात. तरी त्यापलिकडे कलाकाराचे आयुष्य असतेच!

हेमा मालिनीचे काही चित्रपट निर्मितीवस्थेत मध्येच न अडकता पडद्यावर यायला हवे होते. गुलजार दिग्दर्शित 'देवदास' त्यात खूपच महत्वाचा. अंधेरीच्या मोहन स्टुडिओत मुहूर्त होत पहिले चित्रीकरण सत्रही पार पडले. धर्मेंद्र 'देवदास', शर्मिला टागोर पारो आणि हेमा मालिनी चंद्रमुखी अशी गुलजार यांची निवड होती! गुलजार दिग्दर्शित 'खुशबू', 'किनारा', 'मीरा' या चित्रपटात भूमिका साकारल्याने तर हेमा मालिनीची चंद्रमुखी विशेष आकर्षण. याशिवाय मनमोहन देसाई दिग्दर्शित 'बाजीराव मस्तानी'! ट्रेड पेपरमधील दोन

पानी जाहिरात अतिशय लक्षवेधक! राजेश खन्ना बाजीराव म्हणून रुबाबात शोभला असता तशीच हेमा मालिनी मस्तानी म्हणून संपूर्ण पडदा व्यापून राहिली असती. पण काशीबाई कोण? रेखा? देव आनंदसोबतचे हेमा मालिनीचे विजय आनंद दिग्दर्शित 'एक दो तीन चार' हा मल्टी स्टार कास्ट चित्रपट (शशी कपूर, राखी वगैरे अनेक स्टार यात होते!), चेतन आनंद दिग्दर्शित 'एक था राजा' आणि सुरेन्द सुरी दिग्दर्शित 'नया जॉनी'. या नावांतील विविधताच हेमा मालिनीच्या अष्टपैलुत्वाला वाव देणारी असती हे नक्कीच!

अभिनेत्री ते खासदार असा हेमाजींनी खूपच मोठा प्रवास करताना स्टारपणाचा कधीच तोरा दाखवला नाही आणि व्यक्तिगत आयुष्यातील चढउतारांची कुठे नाहक चर्चा वाढवू दिली नाही.. यात स्वतःवरचा विश्वास व संयम दिसतो. हेमाजी कायमच मिडिया फ्रेन्डली. स्वाक्षरी देण्यापासून सेल्फी देण्यापर्यंत अनेक बदल पाहिलेत. कधी मुंबईतील

रिक्षातून प्रवास केलाय. हेमाजी विलक्षण कृष्ण भक्त असल्याने रोजच जुहूच्या इस्कॉन मंदिरात जातात. एकदा ड्रायव्हर न आल्याने रिक्षातून गेल्या तेव्हा त्यांच्या लक्षात आले, पैशाचे पाकीट घरीच राहिलयं. हा अनुभव त्यांनीच एका मुलाखतीत सांगितलाय.) आणि ट्रॅफिकला कंटाळून त्यांनी दहिसर ते डी. एन. नगर असा मेट्रोतून केलेला प्रवास चक्क बातमी ठरली. इतरही मराठी हिंदीतील कलाकार अधूनमधून मेट्रोतून प्रवास करतात त्याची बातमी होत नाही.पण हेमाजी मेट्रोतून जातात तेव्हा सहप्रवाशी त्यांच्याशी अदबीने वागत 'सेल्फी' काढतात!

धर्मेंद्रचा वाढदिवस साजरा करीत त्याचे फोटो सोशल मिडियात पोस्ट करणे हीदेखील त्यांची आवड!

हेमा मालिनी असणं हे दिसायला छान आहे, त्यावरुन कधी राजकीय, सामाजिक भाष्यही झाले. पण हेमा मालिनी म्हणून दिलखुलास व्यक्तिमत्वामागे व्यक्तिमत्व आयुष्यातील

अनेक चढउतार अनुभवत संयम राखणे हे अवघड. सत्याहत्तरीच्या निमित्त तेही सांगावेसे वाटले!

(आपल्या सर्वांच्या लाडक्या 'ही-मॅन' धर्मेंद्रजी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. याबाबतीत अनेक पोस्टस् व नानाविध व्हिडिओज सुद्धा आले. ते वगळता आपण सन्मा. हेमाजींची मानसिकता पाहुया! जे वेदनादायक आहे!)

धर्मेंद्र यांच्या निधनानंतर (२४ नोव्हेंबर २०२५) अभिनेत्री व त्यांची पत्नी हेमा मालिनी यांनी '५७ वर्षांच्या सहवासानंतर माझ्यासाठी जगणे कठीण' असल्याचे सांगत,

आपले वैयक्तिक नुकसान शब्दांत मांडता येणार नाही आणि आयुष्यातील मोठी पोकळी कायम राहील, असे भावूकपणे व्यक्त केले. त्यांनी या काळात धीर धरून कामावर परतण्याचा प्रयत्न केला आहे।

धर्मेंद्र यांच्या निधनानंतर हेमा मालिनी यांच्या प्रतिक्रिया व परिस्थिती सांगायची तर.. हेमा मालिनी यांनी धर्मेंद्र यांना 'प्रिय पती', 'मित्र', 'मार्गदर्शक' आणि 'कवी'

असे संबोधत आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. ५७ वर्षांच्या या नात्यात त्यांनी अनेक सुखद आठवणी शेअर केल्या. एका मुलाखतीत हेमा मालिनी म्हणाल्या होत्या की,

"आता हे सहन करणे माझ्यासाठी खूप कठीण आहे. ५७ वर्षे एकत्र राहिल्यानंतर मी माझ्या आयुष्याची कल्पनाही करू शकत नाही, पण मला पुढे जावे लागेल!"

धर्मेंद्र त्यांच्या शेवटच्या दिवसांत लोणावळ्यावरून परतले होते आणि ते कुटुंबासोबत होते, असे सांगत हेमा यांनी त्यांच्या जाण्याने निर्माण झालेला 'शून्य'! आयुष्यभर राहील असे सांगितले. या दुःखातून सावरण्यासाठी आणि धर्मेंद्र यांच्या आठवणींचा आदर करण्यासाठी त्यांनी पुन्हा कामावर रुजू होण्याचा निर्णय घेतला आहे. अशा अनेक "बातम्या" वाचून व ऐकून खरंच प्रत्येकजण

व्यथित झाला.. असो!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ८९

'न दिसलेला' देव आनंद!

देव आनंद हा कायमच देव आनंदच दिसला व आपण पडद्यावर असो, प्रत्यक्षात असो, फिल्मी पार्टीत असो., इव्हेन्टसमध्ये असो. मुलाखत देत असो. कुठेही असो 'आपण देव आनंद आहोत' याच प्रतिमेच्या, शैलीच्या प्रेमात तो कायमच राहिला आणि तो तसाच असावा असा त्याच्या चाहत्यांचाही प्रेमाचा कौल होता, कौतुक राहिलं. अपवाद विजय आनंद दिग्दर्शित 'गाईड' (१९६५)!

असा देव आनंद पुनर्जन्म असेल तर त्यालाही देव आनंद म्हणूनच जन्माला यायला, रमायला, जगायला आवडेल. इतकं त्याच स्वतःवरच 'देव आनंद'चं गारुड होते.

असा देव आनंद २६ सप्टेंबर रोजी शंभरीचा होतोय! भले ३ डिसेंबर २०११ रोजी त्याचा 'जगाच्या पडद्यावरचा प्रवास' थांबला असेल. पण त्याचे चित्रपट, त्याची अभिनय शैली, त्याने पडद्यावर साकारलेली, खुलवलेली गाणी (विशेषत: प्रेम गीते. नायिकेवर प्रेम करताना पहावे तर त्यालाच) अशा अनेक रुपाने तो आजही आपल्यात आहे, उद्याही नक्कीच असेल! असा देव आनंद 'गॉडफादर' म्हणूनही यशस्वी ठरला असता का?

देव आनंदचं असणे आणि गॉडफादरचं जगणं हे एकरुप होऊ शकतो? हिंदी चित्रपटात काहीही घडू/ बिघडू शकतो यावर विश्वास असेल तर हेही शक्य होते. पण तसे पडद्यावर येता येता राहिले. दिग्दर्शक अनिल शर्मा याने

(आज 'गदर २' प्रसिद्ध) या चित्रपटाची घोषणा केली. निर्माते होते के. सी. शर्मा. ट्रेड पेपर्समध्ये जाहिरातही आली. देव आनंदने आपलं विशिष्ट लकबीतील चालणं, बोलणं, पाहणं, ऐकणे, असणं अशा सगळ्याच गुणांसह 'गॉडफादर' साकारलाही असता. 'कलाकार स्वातंत्र्य ' म्हणतात तेच असावे. दुर्दैवाने हा चित्रपट घोषणेवरच थांबला!



'चित्रपट न बनणे' हीसुध्दा चित्रपट निर्मितीतील एक प्रक्रिया आहे. घोषणा होते, मुहूर्त होतो, बातम्या होतात, त्याची जाहिरातही होते. शूटिंगही सुरु होते, गाणीही रेकॉर्ड होतात, काही रिळेही पूर्ण होतात पण 'काही कारणास्तव' चित्रपट

बंद पडतो. सगळ्याच कलाकारांच्या बाबतीत हे घडत आले आहे.

देव आनंदच्या 'बंद पडलेल्या' चित्रपटांबाबत मात्र वेगळीच उत्सुकता आहे. तुम्हालाही माहित्येय, सलिम जावेद यांच्या पटकथेवरील 'जंजीर' (१९७३) मधील इन्स्पेक्टर विजयला गाणीच नाहीत म्हणून देव आनंदने दिग्दर्शक प्रकाश मेहराला नाही म्हटलं हा किस्सा नेहमीच सांगितला जातो. 'गाण्याशिवाय देव आनंद' ही कल्पना तोही करु इच्छित नव्हता याचाच अर्थ आपलं यश कशात आहे याची जाणिव त्याला होती. पण सलिम जावेदच्या पटकथेवर भूमिका साकारण्याची त्याला आणखीन एक संधी होती. तो चित्रपट होता, विजय आनंद दिग्दर्शित 'एक दो तीन चार'. देव आनंद, शशी कपूर, धर्मेंद्र, हेमा मालिनी, राखी, ऋषि कपूर, टीना मुनिम, परवीन बाबी आणि अमजद खान अशी जबरदस्त स्टार कास्ट!

वांद्यातील मेहबूब स्टुडिओत जबरदस्त कलरफुल मुहूर्त. फोटोग्राफर्सची नुसती चंगळ. एकाच वेळेस इतके स्टार एकाच फ्रेममध्ये हा सुखद क्षण. मुहूर्त झाल्यापासून याच चित्रपटाची चर्चा. बरेच दिवस झाले आणि ही चर्चाही बंद झाली आणि अर्थातच चित्रपटही बंद पडला. राहिले फक्त त्याच्या मुहूर्ताचे दुर्मीळ फोटो!

सूरज सनिम हा देव आनंदच्या चित्रपटांचा हुकमी पटकथा लेखक. देव आनंदची वैशिष्ट्ये फोकसमध्ये ठेवून तो चित्रपट लिहायचा. (उदाहरणार्थ, 'देस परदेस' चित्रपट) हा एक चांगला गुण असतो आणि व्यावसायिक चित्रपट निर्मितीत याचे भानही असावे लागते. अशा सूरज सनीम लिखित देव आनंदचे दोन चित्रपट पडद्यावर आले नाहीत. 'हम तीनो' (दिग्दर्शक गोगी आनंद. आणि देव आनंद, हेमा मालिनी, योगिता बाली, मेहमूद, बेबी गीता व राज बब्बर. निर्माता सुनील आनंद. म्हणजे देव आनंदचा मुलगा), 'नया

जॉनी' (दिग्दर्शक सुरींदर सुरी. चित्रपटात देव आनंद, शम्मी कपूर, हेमा मालिनी व टीना मुनिम. निर्माता अमित खन्ना)! दिग्दर्शक राज खोसला आणि देव आनंद हे फार जुने नाते. 'मिलाप' (१९५५) पासूनचे! 'सी. आय. डी.' (१९५६), 'काला पानी' (१९५८), 'बम्बई का बाबू' (१९६०), 'शरीफ बदमाश' (१९७३) अशा चित्रपटासाठी ते एकत्र आले होते. आता मुशीर रियाझ निर्मित 'तिजोरी' नावाच्या चित्रपटासाठी पुन्हा एकत्र आले. गोरेगावच्या फिल्मीस्तान स्टुडिओत शानदार मुहूर्तही झाला. मुशीर रियाझ यांनी 'सफर', 'बैराग', 'मेहबूबा', 'शक्ती' इत्यादी चित्रपटांची निर्मितीही केली होती. पण 'तिजोरी' मात्र बंदच राहिली. तेच दिग्दर्शक ब्रीज यांच्याबाबत म्हणता येईल. 'व्हिक्टोरिया नंबर २०३', 'चोरी मेरा काम', 'एक से बढकर एक' वगैरे मसालेदार मनोरंजक गुन्हेगारीपट देणाऱ्या ब्रीज यांनी 'देव धरम धनराज' अशी देव आनंदला चक्क तिहेरी भूमिका दिली! चित्रपटविषयक साप्ताहिकात पानभर

जाहिरात दिली. साहीर यांच्या गीतांना कल्याणजी आनंदजी यांचे संगीत अशी वेगळीच जोडी जमवली. पण चित्रपट बनलाच नाही! दिग्दर्शक महेश भट्ट व देव आनंद एकत्र येणं तसं आश्चर्याचे. पण कसा कोण जाणे 'अब मेरी बारी' या चित्रपटासाठी तो योग आला. देव आनंदच्या जोडीला ऋषि कपूर, परवीन बाबी, टीना मुनिम, रणजित, डॉ. श्रीराम लागू व अमजद खान यांच्या भूमिका. चित्रपट निर्मितीला सुरुवातही झाली आणि परवीन बाबी देश सोडून गेली. चित्रपट ठप्प! सावनकुमार यांनी कथा, पटकथा व दिग्दर्शन अशी तिहेरी जबाबदाऱ्या स्वीकारत देव आनंदला 'मिस्टर जॉन' या शीर्षक भूमिकेत चमकवण्याचे पाऊल टाकले. चित्रपटात देव आनंदसोबत रेखा, योगिता बाली, बिंदू, अजित आणि पाहुणा कलाकार अनिल धवन. म्हणजेच सावनकुमारचे हुकमी कलाकार. याही चित्रपटाची कुंडली काही जमली नाही. चित्रपटाच्या नावावरुन वाटते, 'जॉनी

मेरा नाम 'च्या यामुळेच 'मिस्टर जॉन' नाव ठेवले असेल. पहिलं नाव रजिस्टर केले मग थीमची जडणघडण असंही कदाचित असेल. पण जमलं नाही! 'जॉनी मेरा नाम' पासून देव आनंद ॲक्शनकडे जरा जास्तच वळला हे विजय आनंद दिग्दर्शित 'छुपा रुस्तम', 'बुलेट', प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित 'वॉरंट', मोहनकुमार दिग्दर्शित 'अमीर गरीब' या चित्रपटातून दिसले आणि अशातच अमिताभ बच्चनचे 'ॲन्ग्री यंग मॅन'चे वादळ आल्यावर तर 'फायटिंग यायलाच हवी' हे जणू अभिनयाचे सूत्र झाले आणि त्यात देव आनंदच्या 'ॲक्शन' भूमिकांचे पेव फुटले आणि त्यातील अनेक चित्रपट बनलेच नाहीत असे दिसतेय. देव आनंदच्या या चित्रपटांची नावेच बघा, चेतन आनंद दिग्दर्शित 'एक था राजा' (नायिका हेमा मालिनी), यश कोहली निर्मित व गोगी आनंद दिग्दर्शित 'टारगेट' (नायिका रेखा. त्याशिवाय शत्रुघ्न सिन्हा, अमजद खान), शंकर मुखर्जी दिग्दर्शित 'पायलट' (या चित्रपटाला

सचिन देव बर्मन यांचे संगीत असणार होते. म्हणजेच हा खूप जुना योग होता.), याशिवाय खुद्द देव आनंद 'प्रिन्स चार्ल्स' हा चित्रपट बनवणार होता. त्यात वास्तव किती असते यापेक्षाही त्यात फिल्मी मसाला कसा पेरलाय हे पाहण्यात रंजकता होती!

हे सगळेच चित्रपट सत्तरच्या दशकात निर्माण झाले असते, पण एव्हाना स्वतःच्या दिग्दर्शनाच्याही प्रेमात असलेल्या देव आनंदला या चित्रपटात अलिप्त राहता आले असते का? देव आनंद व रेखा अशी वेगळीच रोमॅन्टीक जोडी पाहणे रंजक ठरले असते. कल्पनेपेक्षा ते जास्त खुलले असते. देव आनंद दिग्दर्शित 'सेन्सॉर' नावाच्या चित्रपटात रेखाची छोटी भूमिका होती. तोपर्यंत.. तोळामासा तब्येत असूनही देव आनंद हट्टाने चित्रपटात भूमिका साकारत होता. अनेक चित्रपट अनेक कारणास्तव पडद्यावर पोहचू शकत नाहीत.

पण ते पोहचले असते तर त्यात नक्की काय पाह्यला मिळाले असते याची उत्सुकता राहतेच!

देव आनंदचा असाच एक पूर्ण होऊनही प्रदर्शित न झालेला असा एक चित्रपट म्हणजे, विजय आनंद दिग्दर्शित 'जाना ना दिलसे दूर'. या दिग्दर्शक व नायक जोडीचे 'नौ दो ग्यारह', 'काला बाजार', 'ज्वेल थीफ', 'गाईड', 'जॉनी मेरा नाम' असे सुपर हिट चित्रपट पुन्हा सांगायलाच नकोत. विजय आनंदने आपल्या या भावाच्या शैली व क्षमतेचा (आणि मर्यादांचाही) छान वापर करीत दोघांनाही यश प्राप्त केले. पण 'जाना ना दिल से दूर' मध्ये दोघांचाही सूर हरवलाय हे या चित्रपटाच्या 'केतनव डबिंग थिएटर'मधील ट्रायललाच दिसत होते. चित्रपट संपल्यावर आम्हा चित्रपट समीक्षकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास खुद्द देव आनंद हजर होता. पण बोलणार काय?

त्यानंतरही या चित्रपटाच्या अशाच काही ट्रायल होत राहिल्या आणि चित्रपट मागे पडला! विजय आनंद व देव आनंद या जोडीचा चित्रपट

सेन्सॉर संमत असूनही प्रदर्शित झाला नाही असंही घडलयं हा याच गोष्टीचा 'ॲन्टी क्लायमॅक्स'!

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र टाइम्स 'संवाद' पुरवणी)
♥

लेख क्र. ९०

'सिनेमा' आणि 'मैत्री'!!
'पडदा' ते 'सोशल मिडिया'...!!

काळ बदललाय, अधूनमधून सिनेमाही बदलत असतो आणि याच चालीनुसार या क्षेत्राची मैत्रीही बदललीय. ती इतकी व अशी बदललीय की, दोन मित्र वा मैत्रिणी यांची आता 'भावनिक/ वैचारिक' तर झालेच पण 'लैंगिक संबंधाची'ही मैत्री असते. सिनेमातही ते केव्हाच आलय! आणि सेन्सॉर व मल्टिप्लेक्स ऑडियन्स यांनी ते स्वीकारलेही! वेगळ्याच भाषेत सांगायचे तर राज खोसला

दिग्दर्शित 'दोस्ताना' (१९८०) ते त्याचाच 'रिमेक' करण जोहर निर्मित व तरुण मनसुखानी दिग्दर्शित 'दोस्ताना' (२००८) यात बदलत्या काळानुसारच्या मैत्रीचा केवढा तरी मोठाच फरक आहे! त्यातून काळ मैत्रीपेक्षाही खूप पुढे गेला की उलट घडले हे ज्याच्या त्याच्या दृष्टीवर अवलंबून!

दरम्यान, 'मैत्रीवरचे भावनिक सिनेमे' तसेच 'सिनेमातील मैत्रीची गाणी' हा आता 'फ्लॅशबॅक'चाच विषय झालाय. पडद्यावरील मैत्रीतही समाजाचे प्रतिबिंब पडलयं!

कालपरवापर्यंत सिनेमा आणि मैत्री असे म्हटले की म्हटले दोन गोष्टी पक्क्या बांधकामासारख्या सांगता येत! मैत्रीवरचा 'द बेस्ट' सिनेमा म्हणजे राजश्री प्रॉडक्शन्सचा सत्येन बोस दिग्दर्शित 'दोस्ती' (१९६४) आणि मैत्रीतील प्रेमत्रिकोणाचा असाच हुकमाचा एक्का ठरावा असा चित्रपट म्हणजे राज कपूर अभिनित व दिग्दर्शित 'संगम' (१९६४)! (हा आपल्या साने गुरूजींच्या 'तीन मुले' या कादंबरीवर

आधारित होता, वगैरे!) असो! काय योगायोग आहे पहा! दोन्ही चित्रपट एकाच वर्षीचे आणि दोन्हीत मैत्रीच्या भिन्न गोष्टी! पहिल्यात भावुकता भरपूर. एक नेत्रहीन मोहन (सुधीर कुमार) व दुसरा पांगळा



रामू (सुशीलकुमार) अशा दोन घनिष्ठ मित्रांचा जीवनसंघर्ष म्हणजे ही 'दोस्ती'! गीत संगीता मधूनही 'मेरी दोस्ती मेरा प्यार...', 'राही मनवा दुःख की चिंता क्यू सताती है..', 'चाहूंगा मै तुझे..', 'जानेवालो जरा मुडके देखो...' वगैरे सगळीच गाणी लोकप्रिय! राजश्री प्रॉडक्शन्सचा सिनेमा म्हणजे सहकुटुंब

सहपरिवार पाह्यला हवा असा, त्यातच भारतीय जीवनात मैत्री वा दोस्तीला खूप महत्त्व! एक प्रकारची ती लाईफ लाईनच अथवा लाईफ जॅकेट/ सपोर्ट सिस्टम, जशी त्याची व्याख्या करता येईल तशी! त्यामुळेच हा चित्रपट ट्रेण्ड सेटर ठरला. पण त्याच वेळेस दोन मित्रांची एकच मैत्रीण असू शकते. आणि त्यातही त्यातील एकाचे एकतर्फी प्रेम असू शकते. आता राज कपूरचा सिनेमा म्हणजे त्याचा आपला वेगळाच टच हवा! लहानपणापासूनच्या दोन मित्रांची मोठेपणी एकच मैत्रीण. ती एकावर प्रेम करतेय (हे साठचे दशक होते, हे लक्षात घ्या! आपला सिनेमा चौकट मोडणे, काही भलते सलते धाडस करणे शक्यच नव्हते. सेन्सॉर व समाज या दोघांनाही ते रुचले नसते!) आणि ज्याच्यावर प्रेम त्याचेच अपघाती निधन झाल्याचे समजून (होय समजूनच! खात्री करून घेतली तर हाच 'संगम' चक्क दोन मध्यंतरचा मोठा चित्रपट झालाच नसता!) आता नायिकेच्या

(वैजयंतीमाला) आयुष्यात दुसरा नायक (राजेंद्र कुमार) येतो आणि गहिरे प्रेम सुरु होते! ते लांबणार तोच पहिला नायक (राज कपूर) परततो (तो जिवंतच असणार याची खात्री होतीच!) तो येतो, आपलाच जिवलग मित्र आपल्याच प्रेयसीवर अखंड/ प्रचंड प्रेम करतोय हे पाहून उदास होतो आणि आर्त सूरात गातो, 'दोस्त दोस्त ना रहा, प्यार प्यार ना रहा..' राज कपूरचा सिनेमा म्हणजे गाणी कानाला गोड तशीच ती पाह्यलाही भारी. दृश्यसौंदर्याने पडदाच व्यापून टाकणारी. प्रेम त्रिकोण चित्रपटात 'संगम' ट्रेन्ड सेटर! 'दोस्ती' व 'संगम' हे दोन्ही चित्रपट सिल्व्हर ज्युबिली हिट त्यामुळेच फिल्मवाल्याना जणू 'मैत्रीच्या कथे'चा सर्वकालीन जणू हुकमी फॉर्म्युलाच मिळाला. 'मेरी दोस्ती मेरा प्यार' नावाचाही चित्रपट आला. एकीकडे दोस्तीचे विविध प्रकार आले. 'दोस्त' तर झालेच पण 'दोस्ती दुष्मनी' नावाचाही चित्रपट आला. 'आदमी सडक का' मध्येही मैत्रीची गोष्ट होती.

मराठीत याची 'दोस्त असावा तर असा' या नावाने रिमेक झाली. 'दोस्ताना' वगैरे नावातूनच 'मैत्रीची गोष्टी' सांगणारे अनेक चित्रपट त्या काळात आले. रमेश सिप्पीच्या ऑल टाईम हिट 'शोले' (१९७५) च्या सूडकथेतही वीरु (धर्मेंद्र) व जय (अमिताभ बच्चन) यांच्या मैत्रीचा धागा होताच आणि तो 'ये दोस्ती हम नही तोड़ेंगे..' या उत्स्फूर्त गाण्याने कमालीचा बळकट केला. मग सिनेमा व मैत्री असे म्हणताच या गाण्याच्या मुखड्यानेच या विषयाची दखल घेणे सर्वकालीन मोठीच गरज झाले. यातील नाणेफेकीचा कौल म्हणजे मैत्रीवरचा जणू विश्वास! मैत्रीवरचा 'द बेस्ट' सिनेमा म्हणजे 'आरएस जे' कम्बाईन निर्मित व ह्रषिकेश मुखर्जींचा 'नमक हराम' (१९७३). आपला मित्र विकी (अमिताभ) याचे पिता आजारी असतानाच्या काळात त्यांच्या कारखान्याची जबाबदारी पार पाडतोय तर त्याला तेथील खबरी/ कामगारांच्या गोष्टी समजाव्यात म्हणून त्याचा मित्र चंदर

(राजेश खन्ना) सोमू असे नाव धारण करून नोकरीला लागतो. त्यांची सुखदुःखे समजावून घेतो, त्याना सहानुभूती दाखवतो. त्यांच्या समस्या विकीने जाणून घेऊन सोडवाव्यात हे चंदर त्याला समजावून सांगतो हे विकीच्या पित्याला (ओम शिवपुरी) पटत नाही. ते एक तर कट रचून चंदर हा कामगारांचा हितचिंतक नसून मालिक का चमचा है असे घडवून आणण्यात यशस्वी ठरतात त्यात त्याला असंतुष्ट कामगारांकडून बेदम चोप मिळतो म्हणून विकी खवळतो व 'कौन है वो माई का लाल जिसने मेरे सोमू पे हाथ उठाया...' असे ललकारत आपण मालकपुत्र आहोत हे विसरुन मित्रावरील अन्यायाविरुद्ध कामगार वस्तीत शिरुन आवाज देतो... अखेरीस चंदरचा खातमा हीच या मैत्रीचा शेवट असे मालक मानतो व त्याचा अपघाती मृत्यू

घडवून आणतो. याला आपण जबाबदार आहोत

असे विकी मानतो व शिक्षा भोगतो. अशी देखील मैत्री असू शकते हे सांगणारा हा दर्जेदार चित्रपट होय. 'दिए जलते है फूल खिलते है...' मैत्रीची चांगली व्याख्या करणारे यातील गाणे प्रत्यक्षातही अनेकांना आपलेसे वाटते. या चित्रपटातील सगळ्या गाण्यात हे अधिकच भारावून टाकणारे आणि विशेष म्हणजेच याच मैत्रीच्या गाण्याने हा चित्रपट सतत पुढील पिढीत नेला. हेदेखील उल्लेखनीय! मैत्रीतील प्रेम त्रिकोणाचेही चित्रपट अनेक. खास उल्लेख करायला हवाच तो रमेश सिप्पी दिग्दर्शित 'सागर' (१९८५)चा. कोळीवस्तीत एकत्रपणे खेळत मोठे झालेल्या एका मैत्रीत (कमल हासन व डिंपल खन्ना) आता विदेशात शिकून आलेला व गावातील प्रशस्त बंगल्यात राहणारा युवक (ऋषि कपूर) जोडला जातो. आता तिहेरी मैत्रीही आहे आणि दोन मित्रांचे एकाच मैत्रीणीवर प्रेमही आहे. फरक इतकाच की लहानपणापासूनचा मित्र ते व्यक्त करत नाही. पण त्याचेही

प्रेम खरेच आहे हे दुसरा मित्र ओळखतो. (येथे दिग्दर्शक दिसतो म्हणायचे!) अखेरीस अर्थात एका मित्राला प्रेम त्याग करावाच लागतो. त्या काळात असे दोन मित्र व एकच प्रेयसी असा सुनील हिंगोरानी दिग्दर्शित 'राम अवतार' (अनिल कपूर, सनी देओल व श्रीदेवी) प्रेम त्रिकोण अथवा दोन मैत्रीणी (पद्मिनी कोल्हापूरे व अनिता राज) व एकच प्रियकर (अनिल कपूर) असा प्रेम त्रिकोण (प्यार किया है प्यार करेंगे) असे चित्रपट येत- जात. याच साच्यात बरेच चित्रपट आले. येथे फ्लॅशबॅक संपतोय...!!!!

पारंपरिक लोकप्रिय मनोरंजन चित्रपटाच्या बदलास 'दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे' (१९९५) पासून सुरुवात झाली. तत्पूर्वीची चित्रपटसृष्टी व त्याच्या चालीरीती मागेच ठेवून अथवा त्याच्या प्रभावाखाली न राहता, आपल्या चित्रपट संस्कृतीची परंपरा जपतच जमेल तसे/ तितके काही वेगळे करण्याची काही दिग्दर्शकांनी दृष्टी व वृत्ती दाखवली. एव्हाना

देशात जागतिकीकरण व खुली अर्थव्यवस्था, उदारीकरण यांचे वारे रुजत होते. याच टप्प्यावर चित्रपट बदलणे स्वाभाविक होते. प्रेक्षकही बदलत होता. मग 'सत्या', 'लगान' असे काही चित्रपट आले, त्याचे प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. फरहान अख्तर दिग्दर्शित 'दिल चाहता है' (२००१) हा नवीन पिढीतील मैत्रीची भाषा, रंगढंग, दृष्टिकोण, जीवनशैली दाखवणारा चित्रपट होता. नवीन युगातील मैत्रीचा गंध त्यात होता. एव्हाना मैत्री, दोस्ती या पारंपरिक शब्दांची जागा 'फ्रेन्डशीप'ने घेतली होती. विदेशातील 'फ्रेन्डशीप डे' साजरे करण्याचे वारे आपल्याकडेही रुजत चालले होते. झोया अख्तर दिग्दर्शित 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' (२०११) ने आपल्याकडील चित्रपटातील फ्रेडशीपला आणखीन व्यापक केला. तसा हा प्रवासी चित्रपट होय. तीन मित्र (हृतिक रोशन, फरहान अख्तर व अभय देओल) युरोपात प्रवासाला निघतात. तेथील काही साहसी खेळात

सहभाग घेतात. आणखीन काही मौज मजा मस्तीही करतात. त्यातच इतरही काही नातेसंबंध उलगडतात. या दोस्तीत एकाच वेळेस तरलता व धटींगपणा होता. हा समतोल छान साधलाय! पण समाजातील विविध घटकांतील मैत्रीच्या स्टोरीज (बदलत्या काळानुसारचा शब्द) येणे आवश्यक होतेच. त्यातूनच चित्रपटसृष्टीचा व्यापक दृष्टिकोन दिसत असतो. मीरा नायर दिग्दर्शित 'फायर' मध्ये दोन स्त्रियांच्या वेगळ्याच मैत्रीची कथा होती. दोन स्त्रियांतील (शबाना आझमी व नंदिता दास) यांच्या शारिरीक संबंधाची गरज व त्याची गोष्ट परंपरावाद्याना जोरदार सांस्कृतिक धक्काच देणारी. विदेशात (खास करून अमेरिकेत) असे काही भलतेसलते चालत असेल पण हिन्दुस्तानात हे खपवून घेणार नाही असे म्हणतच 'फायर' विरोधात मोठेच आंदोलन झाले. मैत्री फक्त सुखदुःखात साथ देण्यात, कौटुंबिक जीवनात सोबत करण्यात, सहलीला धमाल करण्यास आणि ती जस

जशी जुनी होईल वा मुरत जाईल तशी उमाळ्याने जुन्या आठवणीत रमण्यास, लहान- मोठ्या संकटात पटकन मदतीला धावून येण्यास यापुरती असतेच पण काही काही माणसाच्या आणखीनही काही गरजा असतात. आणि त्या गरजांची पूर्तता हीच फ्रेन्डशीप अधिकच घट्ट व विश्वासाची झाल्यावर होते. दोन मित्र एकमेकांची लैंगिक गरज भागवतात (होमो सेक्सुअल, गे), तशाच दोन मैत्रीणीही आपले संबंध जपतात (लेस्बियन). यातच मेट्रोसेक्युअल, बायसेक्सुअल प्रकार आहेत. परंपरा, मूल्ये, सभ्यता, संस्कृती जपणारे/ मानणारे म्हणतीलच, ही कसली फ्रेन्डशीप? चित्रपटातून अशाही फ्रेन्डशीपचा सहभाग अपेक्षित व स्वाभाविक होताच. तो विविध स्तरावर आलाय. मधुर भांडारकर दिग्दर्शित 'पेज थ्री'ची रिपोर्टर (कोंकणा सेन शर्मा) आपल्या मित्राला आपल्याच बॉयफ्रेडसोबत प्रणयात रंगलेल्या स्थितीत पाहते. 'माय ब्रदर निखिल', 'मेरी गोल्ड',

'बुढ्ढा मर गया', 'झूम बराबर झूम', 'हनिमून ट्रॅव्हल्स प्रा. लि.' अशा अनेक चित्रपटातून अशी फ्रेन्डशीप दिसली. अभिषेक बच्चन व जॉन अब्राहम यांचाही 'दोस्ताना' असाच मोकळा ढाकळा. पण त्यात गंमत होती. चित्रपटसृष्टीतील दोस्तीच्या गोष्टी म्हटलं की काही हुकमी नावे येतातच. राज कपूर व राजेंद्र कुमार यांची खूप गहरी दोस्ती होती. तर राजेंद्र कुमार व सुनील दत्त यांच्या दोस्तीला पैलू अनेक. ही दोस्ती नात्यात परावर्तित झाली. राजेंद्र कुमारच्या मुलाशी म्हणजेच कुमार गौरवशी सुनील दत्तच्या मुलीचे म्हणजेच नम्रताशी लग्न झाले. त्यानंतर संजय दत्त मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील मुख्य आरोपी ठरला, दत्त कुटुंबावर वादळ आले, सुनील दत्त खासदार असूनही पुत्राला वाचवण्यासाठी त्याला प्रचंड धडपड करावी लागली, संजय दत्त गजाआड गेला त्या सगळ्याच कठीण दिवसात राजेंद्र कुमारने अगदी जवळच्या मित्राची साथ देत सुनील दत्तसोबत सावलीसारखा वावर

केला. तेव्हाच्या बातम्यात या दोस्तीचे दर्शन होई. (राजकुमार हिरानीने 'संजू' मध्ये राजेंद्र कुमारची व्यक्तीरेखा व वस्तुस्थितीच डावलली.) जितेन्द्र, ऋषि कपूर, राकेश रोशन व विनोद मेहरा ही सत्तरच्या दशकात जमलेली दोस्ती आजही तशीच आहे. विनोद मेहरा, ऋषि कपूर चे मात्र निधन झालेय. पण हे तीन मित्र जेव्हा जेव्हा शनिवार सायंकाळ ते सोमवार सकाळ जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमधील सूटमध्ये एकत्र जमायचे. 'कहो ना... प्यार है' च्या गाण्याच्या ध्वनिफितीचे प्रकाशन जितेंद्र व राकेश रोशन यांच्या हस्ते झाल्याचे आश्चर्य वाटले नाही. ते अपेक्षितच होते. ही दोस्ती अगदी उघडपणे दिसली. राजेश खन्नाची किशोरकुमार व राहुल देव बर्मन यांच्याशी असलेल्या खास दोस्तीचे काही किस्से, दंतकथा प्रसिद्ध आहेत. आर. डी. बर्मन आपल्या या मित्रासाठी खास चाली बाजूला ठेवायचा. पण एस्सेल स्टुडिओतील राजेश खन्नानेच निर्माण केलेल्या व शक्ती

सामंता दिग्दर्शित 'अलग अलग' च्या मुहूर्ताचा क्षण आजही ठळकपणे आठवतोय. राजेश खन्नाचा मूड अधिक झकास होता. तो आम्हा उपस्थित सिनेपत्रकारांशी छान गप्पा करताना म्हणाला, माझा जिवलग मित्र किशोरकुमार माझ्या या चित्रपटातील एक गाणे मोफत गाणार आहे.... आणि तसा तो गायलाही. ही खरी मैत्री. पण तो काळही भावूक होता. चित्रपटसृष्टी तद्दन फिल्मी झाली नव्हती. प्रीती झिंटा व रानी मुखर्जी यांची छान मैत्री असल्याचे किस्से गाजले. तरी चित्रपटसृष्टीचा आवाका (की पसारा?) पाहता येथे कलाकारांच्या मैत्रीची उदाहरणे तशी फारच कमी. एक तर येथे प्रत्येकालाच पुढे जायचयं, पुढे गेलेल्याला स्थान टिकवाचेय, मागे पडलेल्याला टिकून राहण्याचा संघर्ष आहे. यात नितळ/ निखळ मैत्री करणार ती कधी व कशी? आता तर कमालीचे व्यावसायिक वातावरण आहे. एकादा चित्रपट खणखणीत यशस्वी ठरून करियरला शिडी सापडेल हे

सांगता येत नाही , तसेच दोन तीन चित्रपट फ्लॉप ठरताच सापाच्या तोंडातून एकदमच खाली येण्याची भीती. सापशिडीच्या खेळाच्या धास्तीत मैत्री करणार कशी? तरी एकाद्या इव्हेंट्समध्ये मोठे स्टार्स आपण अमक्या स्टार्सचे खूप चांगले मित्र आहोत असे म्हणतात त्याला 'इव्हेंट मॅनर्स ' म्हणतात. आशा पारेखच्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात सलमान खानने आपल्या भाषणात आजच्या पिढीतील तारकाना एक टोला लगावलाच. सोहळ्यास उपस्थित असलेल्या वहिदा रेहमान, हेलन, शम्मी यांजकडे म्हणत तो म्हणाला, मागील पिढीतील या अभिनेत्रीची त्या काळापासूनच चांगली मैत्री आहे. त्याना कधीच एकमेकींबद्दल असुरक्षित वाटले नाही. कामाशिवायही त्या एकमेकीना भेटत. एकमेकींच्या सुखदुःखात सहभागी होत. आजच्या अभिनेत्रींनी यापासून काही शिकायला हरकत नाही... सलमानचा मुद्दा व गुद्दा पटण्यासारखा अथवा एका

चांगल्या बातमीला जन्म देणारा असला तरी आजच्या एकूणच गतिमान, स्पर्धात्मक युगात ते स्वीकारणे अवघड आहे. काळानुसार जगण्याचेही अनेक संदर्भ बदललेत.

आता फेसबुक/ इंस्टाग्राम फ्रेन्डशीपचे युग आहे. त्यात सोशल मिडियावर कधीही कोणालाही भेटता येते, एकादा मित्र/ मैत्रिण नकोशी झालीच तर ब्लॉक करता येते. पण यात मैत्रीच्या व्याख्या/ भावना/ शपथा असे इमोशनल काहीही नाही. ही तांत्रिक मैत्री आहे. त्यात आपणही कोणत्या तरी लहान मोठ्या स्टार्सचे मित्र आहोत याचाच आपल्याला आनंद. ऐवीतेवी मैत्रीत आनंदच तर

हवा असतो. मैत्रीचे चित्रपट तोच धडा देतात. तरी एक महत्त्वपूर्ण प्रश्न, विशेषतः मराठी कलाकारांना सोशल मिडियात जेवढे फ्रेन्ड्स आहेत, त्यांची संख्याही वाढतेय, लाईक्स वाढतात तेवढा त्यांच्या चित्रपटाला प्रेक्षक का मिळत नाही? याचे कारण, या माध्यमातील मैत्री वेगळी आणि

चित्रपट पाहण्यासाठी वेळ काढणे यात आजचा चित्रपट रसिक गल्लत करीत नाहीत. मैत्री एका जागी आणि आवड एका जागी असाच हा प्रकार आहे. पूर्णपणे फोकस व व्यावसायिक. सोशल मिडियात अनेक स्टार्स आपल्या चाहत्यांचे फ्रेन्ड्स असल्याने एकच चांगली गोष्ट साध्य झालीय, ती म्हणजे, या स्टार्सना आपले अपडेट पोस्ट करता येतात. आपले नवीन फोटो शूट, काही गोष्टी, बातम्या, आठवणी आपल्या फ्रेन्डस् ना सतत सांगता येतात. आता 'मित्राची गोष्ट' म्हणून लगेचच लाईक्स करणे वा एकादी कॉमेन्टस करणे हक्काने आलेय....!

मैत्री दोघा- चौघात होते, कुठे मित्र मैत्रिणींचा ग्रुप

असतो ही परंपरा कायम असतानाच आता सोशल मिडियात अनलिमिटेड फ्रेन्ड्स लाभण्याचे युग आलेय. एकाच वेळेस अनेक मित्र/ मैत्रिणी. व्वाह व्वाह! याही मैत्रीचे ओझे वाटत नाही.

"सुपर डुपर हिट्स" (भाग ५)♥© दिलीप ठाकूर

इतके सगळेच बदल होत गेले असले तरी फ्रेन्डशीप डेच्या दिवशी उपग्रह वाहिन्या, डिजिटल चॅनलवर पहिले हुकमी गाणे दिसते..

'ये दोस्ती हम नही तोड़ेंगे.. तोड़ेंगे दम मगर तेरा साथ ना तोड़ेंगे ..... '

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र टाईम्स (नाशिक आवृत्ती) दिवाळी अंक)

♥

विशेष आभार : लेखक : डॉ. अनंत पावसकर,
(निर्मिती/ संरचना/ मुखपृष्ठ/ ले-आऊट)

♥

♥

"सुपर डुपर हिट्स" (भाग ६)
लवकरच तुमच्या भेटीला!!

♥

"सुपर डुपर हिट्स" (भाग ५)♥© दिलीप ठाकूर